CMYK

सोलापूर तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

धाराशिव | गुरुवार, ६ नोव्हेंबर २०२५ | वर्ष ३ रे अंक २४६ | पाने १२ | किंमत रु. ६/- | ■ RNI No. MAHMAR/2023/86468 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026. | dainiktarunbharat.com | epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



नि संस्कार ग्रहण करण्यासाठी स्वाध्याय आणि सत्संग हे सक्षम उपाय आहेत. त्यात कधी लक्ष्यप्राप्तीची अन्त:प्रेरणा दाबून टाकली जात नाही. विवेचनशीलताही बोथट केली जात नाही. भारताची गुरू संकल्पना याच तत्त्वावर आधारित आहे. भारतात अशी मान्यता आहे, ''गुरू तोच की जो शिष्याच्या मनात पसरलेल्या अंधाराला दूर करतो आणि शिष्याला आपल्याच स्वत:च्या अन्त:प्रकाशाने पुढे जाण्याच्या मार्गावर उभा करतो.''

**- रंगा हरी**
रा. स्व. संघाचे पूर्व अ. भा. बौद्धिक प्रमुख

## महत्त्वाचे

### यूपीआयचे एक महिन्यात २७ लाख कोटींचे व्यवहार

**नवी दिल्ली :** सणासुदीच्या काळात खरेदीसाठी यूपीआयचा सर्वाधिक वापर झाल्यामुळे ऑक्टोबरमध्ये विक्रमी २७.२८ लाख कोटी रुपये मूल्याचे व्यवहार झाले. या कालावधीत एकूण २०.७ अब्ज व्यवहार झाले आहेत. गेल्या वर्षी याच महिन्यात २३.४९ लाख कोटी रुपये मूल्याचे व्यवहार झाले होते. नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडियाने ही आकडेवारी जाहीर केली. याआधी मे महिन्यात २५.१४ लाख कोटी रुपये विक्री मूल्याची नोंद झाली होती, तर जुलैमध्ये उच्चांकी १९.४७ अब्ज व्यवहारांची नोंद झाली होती. सप्टेंबर महिन्यात १९.६३ अब्ज यूपीआय व्यवहार झाले. त्यांचे मूल्य २४.९० लाख कोटी रुपये होते. मासिक तुलनेत ऑक्टोबरमध्ये मूल्यातील वाढ ९.५ टक्के आहे.

### बालिकेवर अत्याचार करणाऱ्या नराधमास जन्मठेप

**वाशीम :** पंचशील नगर येथील ८ वर्षीय बालिकेवर अत्याचार करणाऱ्या नराधमास अतिरिक्त व जिल्हा सत्र न्यायालयाने पोक्सो कायद्यान्वये आजन्म कारावास आणि २० हजार रुपये दंड व दंड न भरल्यास ३ महिने साधा कारावास, कलम ३६३ च्या गुन्ह्यात ५ वर्षे कारावास आणि ५ हजार रुपये दंड तसेच दंड न भरल्यास १ महिना साधा कारावास अशी शिक्षा सुनावली. १ जून २०२४ रोजी वाशीम शहरातील पंचशील नगर येथील ८ वर्षीय चिमुरडी आई-वडिलांसह शेजारी हळदीच्या कार्यक्रमास गेली असता, विजय बरखम याने संधीचा फायदा घेत बालिकेचे अपहरण केले आणि स्वतःच्या घरात तिच्यावर अत्याचार केला व नंतर तिची गळा आवळून हत्या करण्याचा प्रयत्न केला होता. सरकारी पक्षाने पीडिता, साक्षीदार, वैद्यकीय अहवाल, न्यायवैद्यक अहवाल आणि पुरावे तपासून आरोपीवरील दोषारोप सिद्ध झाल्याने जन्मठेपेची शिक्षा सुनावली.

### वर्षातील सर्वात मोठा चंद्र दिसला

नवी दिल्ली : बुधवारी रात्री जगभरातून वर्षातील सर्वात मोठा चंद्र, सुपरमून दिसला. हा वर्षातील दुसरा सुपरमून आहे. या काळात, चंद्र समोरून सुमारे १४ पट मोठा आणि ३0% जास्त तेजस्वी दिसला. जेव्हा पृथ्वी आणि चंद्रातील अंतर सर्वात कमी असते तेव्हा सुपरमून होतो. यामुळे चंद्र मोठा आणि उजळ दिसतो. सुपरमून दरम्यान पाहिल्यास तो पृथ्वीच्या जवळ येत असल्याचे दिसते. ५ नोव्हेंबर रोजी चंद्र पृथ्वीपासून अंदाजे ३,५७,000 किलोमीटर अंतरावर आहे. हे सामान्य पौर्णिमेपेक्षा अंदाजे २७,000 किलोमीटर जवळ आहे. चंद्र सामान्यतः त्याच्या सर्वात दूरच्या बिंदूवर, ४0५,000 किलोमीटरवर आणि त्याच्या सर्वात जवळच्या बिंदूवर, ३,६३,१0४ किलोमीटरवर असतो. सुपरमून ही एक खगोलीय घटना आहे ज्यामध्ये चंद्र त्याच्या सामान्य आकारापेक्षा मोठा दिसतो. वर्षातून तीन ते चार वेळा सुपरमून दिसतात. सुपरमून दिसण्याचे कारण खूपच मनोरंजक आहे. या काळात, चंद्र पृथ्वीभोवती फिरत असताना त्याच्या अगदी जवळ येतो. या अवस्थेला पेरिजी म्हणतात. दरम्यान, जेव्हा चंद्र पृथ्वीपासून दूर जातो तेव्हा त्याला अपोजी म्हणतात. ज्योतिषी रिचर्ड नोले यांनी पहिल्यांदा १९७९ मध्ये सुपरमून हा शब्द वापरला.



# 'मतचोरी'वरून आरोप प्रत्यारोपांच्या फैरी

◆ **नवी दिल्ली, ५ नोव्हेंबर**

**लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी बुधवारी मतचोरीच्या मुद्यावरून पुन्हा एकदा भारतीय जनता पक्षावर आरोपांची राळ उडविली. कर्नाटक, महाराष्ट्रातील लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत मतचोरी केल्याचा आरोप करीत बिहारातील मतदारयादी सघन पुनरीक्षण प्रक्रियेवरही आक्षेप घेतला. त्यांच्या या आरोपांना भारतीय जनता पक्ष आणि निवडणूक आयोगानेही प्रत्युत्तर दिले. एकापेक्षा जास्त व्यक्ती मतदान करीत असताना मतदार केंद्रावरील काँग्रेसचे एजंट काय करीत होते, असा प्रश्न निवडणूक आयोगाने विचारला तर राहुल गांधी यांचा बॉम्ब कधीच फुटत नाही, असा टोला भारतीय जनता पक्षाने लगावला.**

**राहुल म्हणाले-**

## हरयाणाप्रमाणे बिहारमध्ये ऑपरेशन सरकार चोरी

◆ **नवी दिल्ली, ५ नोव्हेंबर**

काँग्रेस खासदार आणि विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी बुधवारी दिल्लीतील काँग्रेस मुख्यालयात मतदार पडताळणीसंदर्भात पत्रकार परिषद घेतली. त्यांनी २०२४च्या हरियाणा विधानसभा निवडणुकीत २५ लाख मते चोरीला गेल्याचा आरोप करत स्क्रीनवर सादरीकरण केले.

राहुल गांधी यांनी आरोप केला की जे हरयाणात घडले ते बिहारमध्येही घडेल. त्यांनी असा दावा केला की बिहारमधील मतदार याद्यांमध्येही घोटाळे झाले आहेत. त्यांनी असा दावा केला की मतदारयादी त्यांना शेवटच्या क्षणी देण्यात आली.

त्यांनी बिहारमधील पाच मतदारांना मंचावर बोलावले आणि दावा केला की त्यांची नावे मतदार यादीतून वगळण्यात आली आहेत. बिहारमध्ये लाखो लोकांची नावेही वगळण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. (वृत्तसंस्था)

> **मतदारयादीत एका महिलेचा फोटो २२३ वेळा आला**
>
> **मतदारयादीत ब्राझिलियन मुलीचे नाव असून तिने स्वीटी, सीमा, सरस्वती, अशा नावांनी मतदान केले. तसेच काही लोकांचे वय त्यांच्या फोटोपेक्षा आहे तर एका महिलेचा फोटो २२३ वेळा दिसतो, असा आरोप राहुल यांनी केला. त्यांनी यापूर्वी ७ ऑगस्ट आणि १८ सप्टेंबर रोजी पत्रकार परिषदा घेतल्या होत्या.**

**निवडणूक आयोग**

## काँग्रेसचे बूथ एजंट काय करत होते?



◆ **नवी दिल्ली, ५ नोव्हेंबर**

हरयाणातील निवडणूक प्रक्रियेत मतचोरीचा प्रकार घडल्याचा आरोप करणाऱ्यांना राहुल गांधींचे सर्व मुद्दे खोडून काढत निवडणूक आयोगाने त्यांना चोख प्रत्युत्तर दिले आहे. जर एक व्यक्ती एकापेक्षा जास्त वेळा मतदान करत होती तेव्हा मतदान केंद्रावर असणारे काँग्रेसचे बूथ एजंट काय करत होते, अशा शब्दात आयोगाने राहुल यांना सुनावले आहे.

निवडणूक आयोगाने राहुल गांधींच्या आरोपांवर १५ मुद्यांमध्ये सविस्तर स्पष्टीकरण देत सर्व दावे पूर्णपणे निराधार असल्याचे म्हटले आहे. आयोगाने एक्सवर पोस्ट करून राहुल गांधींचे दावे फेटाळले आणि सविस्तर माहिती दिली. आयोगाने स्पष्ट केले की, राहुल गांधींचे आरोप तथ्यहीन आहेत. निवडणुकीतील प्रत्येक प्रक्रिया (मतदार यादी तयार करणे, पडताळणी, आणि निकाल जाहीर करणे) पूर्णपणे पारदर्शक पद्धतीने आणि सर्व पक्षांच्या देखरेखीखाली झाली आहे.

आयोगाने म्हटले की, मतदार यादी २ ऑगस्ट २०२४ रोजी प्रकाशित करण्यात आली आणि सर्व राजकीय पक्षांसोबत शेअर करण्यात आली. एसएसआर दरम्यान प्राप्त झालेल्या दाव्यांची आणि हरकतींची एकूण संख्या ४१६,४०८ होती. बीएलओंची एकूण संख्या: २०,६२९ होती. अंतिम मतदार यादी २७ ऑगस्ट २०२४ रोजी प्रकाशित करण्यात आली आणि सर्व मान्यताप्राप्त राजकीय पक्षांसोबत शेअर करण्यात आली. त्यानंतर जिल्हा दंडाधिकाऱ्यांकडे ईआरओ विरुद्ध दाखल केलेल्या अपिलांची संख्या शून्य होती. जिल्हा दंडाधिकाऱ्यांच्या आदेशांविरुद्ध सीईओकडे दाखल केलेल्या दुसऱ्या अपिलांची संख्याही शून्य होती. (वृत्तसंस्था)

> **मतदारयादीवर आक्षेप घेतला नाही**
>
> **सर्वात महत्त्वाचे म्हणजे, मतदानानंतरच्या दिवशी छाननी दरम्यान उमेदवारांनी उपस्थित केलेल्या आक्षेपांची संख्या देखील शून्य होती. एवढेच नाही तर निवडणुकीला आव्हान देणाऱ्या निवडणूक याचिकांची संख्या २३ होती. यापैकी कोणीही मतदार यादीवर आक्षेप नोंदवला नव्हता, असे आयोगाने स्पष्ट केले.**

**भाजपाचे प्रत्युत्तर**

## राहुल गांधींचा बॉम्ब कधीच फुटत नाही




◆ **नवी दिल्ली, ५ नोव्हेंबर**

काँग्रेस खासदार आणि विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी बुधवारी पत्रकार परिषदेत भाजपा आणि निवडणूक आयोगावर मतदार यादीत अनियमिततेचा आरोप केला. केंद्रीय मंत्री किरेन रिजिजू यांनी राहुल यांच्या आरोपांना प्रत्युत्तर दिले.

रिजिजू म्हणाले, राहुल यांनी दिलेले सादरीकरण खोटे होते. राहुल गांधींनी त्यांच्या पत्रकार परिषदेत काही परदेशी महिलांची नावे सांगितली. संसदेचे अधिवेशन सुरू असताना ते परदेशात जातात. ते गुप्तपणे थायलंड आणि कंबोडियाला जातात. परदेशातून मिळणाऱ्या प्रेरणेवर आधारित ते लोकांचा वेळ वाया घालवतात.

केंद्रीय मंत्री म्हणाले, आम्हीही अनेक निवडणुका गमावल्या आहेत, पण आम्ही कधीही तक्रार केली नाही. आम्ही कधीही निवडणूक आयोगाचा गैरवापर केला नाही. आम्ही नेहमीच निकालांचे स्वागत केले. बिहारमध्ये उद्या निवडणुका आहेत. लक्ष विचलित करण्यासाठी ते हा मुद्दा उपस्थित करत आहेत. राहुल म्हणतात की अणुबॉम्ब फुटणार आहे. त्यांचा अणुबॉम्ब कधीच का फुटत नाही? (वृत्तसंस्था)



स्टारलिंकच्या उपाध्यक्ष लॉरेन ड्रेयर यांचे स्वागत करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस. सोबत मंत्री आशिष शेलार

## आता ग्रामीण भागात गतिमान इंटरनेट

**● स्टारलिंकशी करार ● महाराष्ट्र ठरले पहिले राज्य**

◆ **मुंबई, ५ नोव्हेंबर**

जागतिक उद्योजक एलन मस्क यांच्या मालकीच्या स्टारलिंक सॅटेलाईट कम्युनिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेड कंपनीसोबत महाराष्ट्र सरकारने महत्त्वाचा सामंजस्य करार केला आहे. महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान विभाग आणि स्टारलिंक यांच्यातील या करारामुळे राज्यात अत्याधुनिक तंत्रज्ञान उपलब्ध होणार असून, राज्यातील दुर्गम आणि अल्पसेवित भागांपर्यंत उपग्रहाधारित इंटरनेट सेवा पोहोचवण्याची दिशा स्पष्ट झाली आहे, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत या सामंजस्य करारावर स्टारलिंकच्या उपाध्यक्ष लॉरेन ड्रेयर आणि महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान विभागाचे सचिव विरेंद्र सिंह यांनी स्वाक्षरी केली. या करारामुळे स्टारलिंकसोबत औपचारिक भागीदारी करणारे महाराष्ट्र हे भारतातील पहिले राज्य ठरले आहे. याबद्दल बोलताना फडणवीस यांनी विश्वास व्यक्त केला की, स्टारलिंक महाराष्ट्राशी भागीदारी करत असल्याने आपण राज्यातील शेवटच्या गावापर्यंत डिजिटल दरी मिटवत आहोत. कितीही दुर्गम असले तरी, प्रत्येक शाळा, प्रत्येक आरोग्य केंद्र आणि प्रत्येक गाव आता डिजिटल संपर्कात येणार आहे. (तभा वृत्तसेवा)

## बिहारमध्ये आज पहिल्या टप्प्याचे मतदान




◆ **पाटणा, ५ नोव्हेंबर**

बिहार विधानसभा निवडणुकीसाठीचे पहिल्या टप्प्यातील मतदान गुरुवार ६ नोव्हेंबर रोजी होत असून एकूण १२१ मतदारसंघासाठी मतदार आपला मताधिकार बजावणार आहेत.

पहिल्या टप्प्यासाठी उमेदवारांनी १७ ऑक्टोबरपर्यंत उमेदवारी अर्ज दाखल केले. त्यांची छाननी १८ ऑक्टोबरला झाली. अर्ज मागे घेण्यासाठी २० ऑक्टोबरची मुदत देण्यात आली होती. एकूण १३१४ उमेदवार पहिल्या टप्प्यात आपले नशीब अजमावत आहेत. दुसरीकडे, पहिल्या टप्प्यातील उमेदवारांसाठी राज्यातील सुमारे ७.४ कोटी मतदार आपला मताधिकार बजावतील. त्यापैकी १४ लाख नवमतदार आहेत. दुसऱ्या टप्प्यातील मतदान ११ नोव्हेंबर रोजी तर मतमोजणी १४ नोव्हेंबरला होणार आहे. (वृत्तसंस्था)



विश्वविजेता ठरलेल्या भारतीय महिला क्रिकेट संघातील खेळाडूंनी बुधवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची त्यांच्या निवासस्थानी भेट घेतली. पंतप्रधानांनी सर्व खेळाडूंचे अभिनंदन करीत त्यांच्याशी मनमोकळा संवाद साधला. याप्रसंगी संघाचे प्रशिक्षक अमोल मुझुमदार आणि बीसीसीआयचे अध्यक्ष मिथुन मिन्हास उपस्थित होते

**महिला डॉक्टर आत्महत्या प्रकरण**

## पीएसआय गोपाल बदने बडतर्फ

◆ **सातारा, ५ नोव्हेंबर**

फलटण येथील महिला डॉक्टरच्या आत्महत्या प्रकरणी अटकेत असलेला पोलिस उपनिरीक्षक गोपाल बदने यास कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलिस निरीक्षक सुनील फुलारी यांनी शासकीय सेवेतून बडतर्फ केले आहे.



बदनेने पदाचा व अधिकाराचा दुरुपयोग यासह समाजामध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण करण्याची वर्तणूक केली. पोलिस उपनिरीक्षक पदाला अशोभनीय ठरेल असे वर्तन केले. म्हणून त्यास पोलिस खात्यात पदावर ठेवणे लोकहितार्थ दृष्टिकोनातून उचित होणार नाही म्हणून त्याला शासकीय सेवेतून ४ नोव्हेंबर २०२५ पासून बडतर्फ केल्याचे प्रसिद्धी पत्रक सातारा पोलिस अधीक्षकांनी काढले आहे. (वृत्तसंस्था)

## आता पदवीधर पोलिस कर्मचाऱ्यांना मिळणार तपासाचे अधिकार

**● महिनाभराचे प्रशिक्षण ● पहिल्या टप्प्यात २६७५ कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण**

**अनिल कांबळे**

◆ **नागपूर, ५ नोव्हेंबर**

राज्य पोलिस दलात तपास अधिकाऱ्यांची कमतरता असून, शेकडो प्रकरणे प्रलंबित आहेत. मात्र, त्यावर तोडगा म्हणून पोलिस दलात पदवीधर आणि सेवेत किमान सात वर्षे पूर्ण झालेल्या पोलिस कर्मचाऱ्यांना तपासाचे अधिकार देण्यात येणार आहेत. त्यासाठी पोलिस महासंचालक कार्यालयाकडून चार आठवड्यांचा प्रशिक्षण कार्यक्रम सुरू करण्यात आला आहे.

सध्या राज्यात गुन्हेगारी वाढत असून, गुन्हे दाखल होण्याचे प्रमाण वाढले आहे. गुन्हे दाखल झाल्यानंतर सक्षम तपासी अधिकाऱ्यांना कागदपत्रे तपासासाठी द्यावे लागतात. नियमानुसार, गंभीर गुन्ह्यांचा तपास पोलिस उपनिरीक्षक दर्जाच्या अधिकाऱ्यापासून ते सहायक पोलिस आयुक्तांपर्यंत देता येतो. मात्र, पोलिस शिपाई दर्जाच्या कोणत्याही कर्मचाऱ्याला कोणत्याही गुन्ह्याचा तपास करण्याचा अधिकार नसतो. बहुधा पोलिस उपनिरीक्षक, सहायक निरीक्षक आणि पोलिस निरीक्षक यांच्याकडेच तपास दिले जातात. परंतु, राज्यभरात पोलिस अधिकाऱ्यांची कमतरता आहे. त्यामुळे एकाच पोलिस अधिकाऱ्याकडे क्षमतेपेक्षा जास्त गुन्हे तपासासाठी असतात. परिणामतः प्रलंबित गुन्ह्यांचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे राज्य पोलिस दलात पोलिस शिपाई म्हणून रुजू होऊन सात वर्षांचा सेवाकाळ पूर्ण केलेल्या आणि किमान पदवीधर असलेल्या पोलिस कर्मचाऱ्यांना तपासाचे अधिकार देण्यात येणार आहेत. राज्यात वाढती गुन्हेगारी आणि प्रलंबित प्रकरणांच्या पृष्ठभूमीवर गृहविभागाने हा महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. मात्र, हा अधिकार मिळविण्यासाठी संबंधितांना विशेष प्रशिक्षण घ्यावे लागणार आहे, असे आदेश राज्य पोलिस दलाच्या विशेष पोलिस महानिरीक्षकांनी दिले आहेत.

राज्यभरातून तपास अधिकाऱ्यांच्या प्रशिक्षणासाठी पहिल्या टप्प्यात २६७५ पोलिस अंमलदार पात्र ठरले आहेत. त्यांना चार आठवड्यांचे प्रशिक्षण अकोला, धुळे, तुरची, नानवीज आणि नाशिक येथील पोलिस प्रशिक्षण केंद्रांत देण्यात येत आहे. सध्या पुरुष कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात येत आहे.

> **प्रशिक्षणानंतर होणार परीक्षा**
>
> राज्य सरकारने घेतलेल्या निर्णयानुसार पोलिस अंमलदारांना गुन्ह्याच्या तपासाचा अधिकार मिळण्यासाठी आता चार आठवड्यांचे प्रशिक्षण आणि परीक्षा अनिवार्य करण्यात आली आहे. अनुत्तीर्ण अंमलदारांकडे तपास सोपविला जाणार नाही, असे अप्पर महासंचालक कार्यालयाने स्पष्ट केले आहे. त्यामुळे अंमलदारांना प्रशिक्षणात उत्तीर्ण होणे आवश्यक असणार आहे. मात्र, प्रशिक्षणाचा कालावधी आणि पद्धत याबाबत संभ्रम निर्माण झाला असला तरी पोलिस कर्मचारी वर्गात आनंदाचे वातावरण आहे.



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### नरभक्षक बिबट्याला गोळ्या घालून केले ठार

**पुणे** : महाराष्ट्रातील पुणे जिल्ह्यात शार्पशूटर्सच्या पथकाने एका नरभक्षक बिबट्याला ठार मारले, अशी माहिती वन अधिकाऱ्यांनी बुधवारी दिली. मागील एका महिन्यात जिल्ह्यातील शिरूर तहसीलमधील मौजे पिंपरखेड भागात बिबट्याच्या हल्ल्यात दोन अल्पवयीन आणि एका वृद्धाचा मृत्यू झाला. या घटनांमुळे जुन्नर, शिरूर, आंबेगाव आणि खेड तालुक्यात मोठ्या प्रमाणात जनक्षोभ निर्माण झाला आहे. येथे बिबट्याच्या हल्ल्यांमध्ये वाढ झाली आहे. रविवारी बिबट्याच्या हल्ल्यात एका लहान मुलाचा मृत्यू झाल्यानंतर, संतप्त स्थानिकांनी वन विभागाचे वाहन पेटवून दिले. सोमवारी वन अधिकाऱ्यांनी या प्राण्याला पकडण्याचे आणि ठार करण्याचे आदेश दिले. मंगळवारी रात्री हल्ला करणारा बिबट्या ४०० ते ५०० मीटर अंतरावर दिसला. शार्पशूटर्सच्या पथकाने शांत करणारा डार्ट डाग मारला, पण तो अयशस्वी झाला. बिबट्या आक्रमक झाला व हल्ला करण्यासाठी त्यांच्याकडे येत असताना, रात्री १०.३० च्या सुमारास गोळीबार करून बिबट्याला ठार मारले, असे अधिकाऱ्याने सांगितले.

# मुस्लिम पुरुषाला दुसऱ्या लग्नाआधी पहिल्या पत्नीची संमती आवश्यक

### केरळ उच्च न्यायालयाचा ऐतिहासिक निर्णय
### धर्म गौण, घटनात्मक अधिकार सर्वोच्च

◆ **तिरुवनन्तपुरम्, ५ नोव्हेंबर**

मुस्लिम पुरुषाने पहिला विवाह झालेला असतानाच दुसरा विवाह करायचा असल्यास, तो विवाह करण्यापूर्वी पहिल्या पत्नीचे मत जाणून घेणे आवश्यक आहे, असा ऐतिहासिक निकाल केरळ उच्च न्यायालयाने दिला आहे. न्यायमूर्ती पी. व्ही. कुन्हीकृष्णन यांनी हा निर्णय देताना सांगितले की ''धर्म गौण आहे आणि संवैधानिक अधिकार सर्वोच्च आहेत.''

न्यायालयाने आदेश दिला की दुसऱ्या विवाहाच्या नोंदणीपूर्वी पहिल्या पत्नीला मत मांडण्याची संधी देणे आवश्यक आहे. जर ती विवाहाला हरकत घेत असेल आणि तो विवाह अवैध असल्याचे सांगत असेल, तर दोन्ही पक्षांनी नागरी न्यायालयात जाऊन त्या विवाहाची वैधता सिद्ध करावी. न्यायमूर्ती कुन्ही कृष्णन म्हणाले, ९९.९९ टक्के मुस्लिम महिला आपल्या पतीच्या दुसऱ्या विवाहाला विरोध करतील.



न्यायमूर्ती कुन्हीकृष्णन यांनी निर्णयात म्हटले की, मुस्लिम महिलांनाही त्यांच्या पतीने दुसरे लग्न करताना, किमान नोंदणीच्या टप्प्यावर तरी, त्यांचे मत ऐकले जाण्याचा अधिकार मिळायला हवा.

### विशिष्ट परिस्थितीतच दुसरा विवाह वैध

हा निर्णय अशा प्रकरणात देण्यात आला ज्यात एका मुस्लिम पुरुषाने आपल्या दुसऱ्या पत्नीबरोबर विवाह करण्यासाठी न्यायालयात याचिका दाखल केली होती. मात्र, त्याची पहिली पत्नी या प्रकरणातील पक्षकार नव्हती, म्हणूनच न्यायालयाने ही याचिका फेटाळून लावली. न्यायालयाने सांगितले की मुस्लिम कायद्यानुसार दुसरा विवाह शक्य असला तरी तो काही विशिष्ट परिस्थितींमध्येच वैध ठरतो. पहिल्या पत्नीला न विचारता विवाह करणे न्याय्य नाही.

### रुढीपेक्षा कायद्याला महत्त्व

न्यायालयाने निरीक्षण नोंदवले की दुसऱ्या विवाहाच्या नोंदणीसंदर्भात धार्मिक रूढींपेक्षा कायद्याला प्राधान्य दिले पाहिजे. न्यायमूर्ती कुन्हीकृष्णन म्हणाले, कुराण किंवा मुस्लिम कायदा अशा परिस्थितीत दुसऱ्या स्त्रीशी लग्न करण्यास परवानगी देत नाही, जेव्हा पहिली पत्नी जिवंत आहे. संविधानिक अधिकार हेच अंतिम आहेत, धार्मिक प्रथा नाहीत.

त्यामुळे न्यायालयाने पुरुष आणि त्याच्या दुसऱ्या पत्नीची याचिका फेटाळून लावली, आणि महिलांच्या संविधानिक हक्कांचे रक्षण करणारा हा निर्णय दिला. (वृत्तसंस्था)

# सैन्याला धर्म-जात नसते : संरक्षणमंत्री

### राहुल गांधींना जोरदार प्रत्युत्तर

◆ **पाटणा, ५ नोव्हेंबर**

काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी भारतीय लष्करावर केवळ १० टक्के लोकांचे नियंत्रण असल्याचे वक्तव्य केले आहे , यावरून देशाचे संरक्षण मंत्री राजनाथसिंह यांनी बुधवारी त्यांच्यावर टीका केली. संरक्षण मंत्र्यांनी काँग्रेसचे खासदार राहुल गांधी यांच्यावर भारतीय लष्कराला विभागण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप केला. यावेळी त्यांनी , सैन्याला कोणताही धर्म किंवा जात नसते, असेही स्पष्ट केले आहे.

प्रचार सभेत बोलताना संरक्षण मंत्री राजनाथसिंह यांनीकाँग्रेस नेतेराहुल गांधी यांच्यावर सडकून टीका केली. राहुल गांधी हे संरक्षण दलांमध्ये आरक्षणाची मागणी करून देशात अराजकता निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहेत. सिंह यांनी राहुल गांधी यांच्यावर लष्कराला राजकारणात ओढण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप केला आणि लष्करात विविध समाजांसाठी आरक्षणाची मागणी केल्याबद्दल त्यांच्यावर टीका देखील केली.



राजनाथसिंह म्हणाले की, आरक्षण असले पाहिजे. आरक्षणाच्या बाजूने आम्ही देखील आहोत. आमचा पक्ष देखील आहे. जेवढे गरीब आहेत त्या सर्वांना आरक्षण दिले. पण लष्करात जाती-पातीच्या आधारावर आरक्षण हा प्रकार राजकारणाचा विषय ठरू नये. मला वाटतं की याची चर्चा देखील व्हायला नको. आपल्या सैन्याच्या जवानांचा एकच धर्म असतो आणि तो म्हणजे 'सैन्य धर्म', त्याव्यतिरिक्त इतर कोणताही धर्म नसतो.

मी काँग्रेसला सांगू इच्छितो की किमान आपल्या लष्कराला राजकारणात ओढू नका. जेव्हा जेव्हा या देशासमोर कोणतेही संकट आले आहे, तेव्हा आपल्या सैनिकांनी शौर्य आणि पराक्रम दाखवून भारताची मान उंचावली आहे. जात-पंथ आणि धर्माच्या राजकारणाने आपल्या देशाचे प्रचंड नुकसान केले आहे. आमचा विचार आहे की समाजाच्या सर्वच वर्गांची प्रगती झाली पाहिजे, असेही संरक्षणमंत्री म्हणाले. (वृत्तसंस्था)

### मेहली मिस्त्रींचा टाटा ट्रस्टच्या विश्वस्तपदाचा राजीनामा

**मुंबई** : रतन टाटा यांचे जवळचे सहकारी मेहली मिस्री यांनी सर रतन टाटा ट्रस्ट, सर दोराबजी टाटा ट्रस्ट आणि बाई हिराबाई जे.एन. टाटा नवसारी चॅरिटेबल इन्स्टिट्यूशन ट्रस्ट या तीन टाटा ट्रस्टमधून राजीनामा दिला आहे. त्यांनी ४ नोव्हेंबर रोजी लिहिलेल्या पत्रात ही घोषणा केली. अलिकडेच, मुख्य धर्मादाय शाखा असलेल्या टाटा ट्रस्टमध्ये मिस्त्री यांच्या पुनर्नियुक्तीबाबत मतदान झाले. तीन विश्वस्त - नोएल टाटा, वेणू श्रीनिवासन आणि विजय सिंग - यांनी त्यांच्या पुनर्नियुक्तीच्या विरोधात मतदान केले. मिस्त्री यांचा कार्यकाळ २८ ऑक्टोबर रोजी संपणार होता.

### छत्तीसगड ट्रेन अपघातात, मृतांचा आकडा ११

**बिलासपूर** : छत्तीसगडमधील बिलासपूर रेल्वे स्थानकाजवळ मालगाडी आणि प्रवासी ट्रेनच्या धडकेत मृतांचा आकडा ११ वर पोहोचला आहे, असे अधिकाऱ्यांनी बुधवारी सांगितले. मंगळवारी दुपारी ४ वाजताच्या सुमारास मेमू (मेनलाइन इलेक्ट्रिक मल्टिपल युनिट) पॅसेंजर ट्रेन गेवरा येथून बिलासपूरला जात असताना ही घटना घडली. या अपघातात ११ जणांचा मृत्यू झाला आहे. यात २० जण जखमी झाले आहेत, असे रेल्वेने जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे.

रेल्वे प्रशासनाने तातडीने मदत आणि बचाव कार्य सुरू केले आहे. जखमींना जवळच्या रुग्णालयात योग्य वैद्यकीय उपचार देण्यात येत आहेत, असे त्यात म्हटले आहे. जखमी प्रवाशांना बिलासपूर येथील अपोलो हॉस्पिटल आणि छत्तीसगड इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस (सीआयएमएस) येथे हलवण्यात आले आहे. लाल सिग्नल ओलांडून प्रवासी ट्रेनने ताशी ६० ते ७० किमी वेगाने मागून मालगाडीला धडक दिली. मालगाडी दृश्यमान अंतरावर असतानाही लोको पायलटने लाल सिग्नल का उडी मारला आणि वेळेवर आपत्कालीन ब्रेक का लावला नाही हे आता तपासाचा विषय आहे, असे अधिकाऱ्याने सांगितले. अपघातात मृत्युमुखी पडलेल्यांमध्ये पॅसेंजर ट्रेनची लोको पायलट विद्या सागर आणि सहाय्यक लोको पायलट रश्मी राज यांचा समावेश आहे.

# भारत-अमेरिका संबंधांच्या भविष्याबद्दल ट्रम्प सकारात्मक

◆ **न्यू यॉर्क/वॉशिंग्टन, ५ नोव्हेंबर**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प भारत-अमेरिका संबंधांच्या भविष्याबद्दल खूप सकारात्मक व दृढ आहेर, असे व्हाईट हाऊसच्या प्रेस सेक्रेटरी कॅरोलिन लेविट यांनी म्हटले आहे.

ट्रम्प यांना भारत-अमेरिका संबंधाबद्दल खूप सकारात्मक व दृढ वाटते. काही आठवड्यांपूर्वी त्यांनी भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी थेट चर्चा केली होती, तेव्हा त्यांनी व्हाईट हाऊसमधील अनेक उच्चपदस्थ भारतीय-अमेरिकन अधिकाऱ्यांसोबत ओव्हल ऑफिसमध्ये दिवाळी साजरी केली होती, असे लेविट यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

सर्जियो गोरमध्ये अमेरिकेचे भारतात एक राजदूत आहेत, ते



वॉशिंग्टनचे खूप चांगले प्रतिनिधित्व करतील, असेही त्या म्हणाल्या.

ट्रम्प व त्यांची व्यापारी चमू त्या विषयाबाबत भारताशी खूप गंभीर चर्चा करत आहेत. ट्रम्प यांना पंतप्रधान मोदींबद्दल खूप आदर आहे व ते त्यांच्याशी सतत संवाद साधतात, असेही त्यांनी सांगितले.

गत महिन्यात ट्रम्प यांनी ओव्हल ऑफिसमध्ये दिवाळी उत्सवाचे आयोजन केले होते. या उत्सवात अमेरिकेतील भारतीय राजदूत विनय क्वात्रा व अनेक प्रमुख भारतीय-अमेरिकन व्यावसायिक नेते व व्यक्ती उपस्थित होते.

ट्रम्प यांनी पंतप्रधान मोदींना फोनवरून दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या. भारत व अमेरिका दोघेही जगाला आशेने 'प्रकाशित' करीत राहतील व दहशतवादाविरुद्ध एकजूट राहतील, अशी अपेक्षा ट्रम्प यांनी व्यक्त केली.

राष्ट्रपती ट्रम्प, तुमच्या फोन कॉलबद्दल आणि दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छांबद्दल धन्यवाद. प्रकाशाच्या या सणानिमित्त, आपल्या दोन महान लोकशाही जगाला आशेने प्रकाशित करीत राहतील आणि सर्व प्रकारच्या दहशतवादाविरुद्ध एकजूट राहतील, असे मोदींनी एक्सवर म्हटले. (वृत्तसंस्था)



प्रभू श्रीराम यांची नगरी अयोध्येत कार्तिक पौर्णिमेनिमित्त जवळपास २५ लाख भाविकांनी पवित्र शरयू नदीत स्नान केले. तसेच रामलल्लाचे दर्शन घेतले



सोलापूर : येथील ग्रामदैवत श्री. सिद्धेश्वर मंदिरात कार्तिकी त्रिपुरारी पौर्णिमेनिमित्त भक्तांच्या वतीने योग समाधीला चंद्राच्या साक्षीने दीपोत्सवाने उजळून टाकले. त्यावेळी टिपलेले छायाचित्र. (छायाचित्र : केवल तिवारी)

# नवजात बाळांना नदीत सोडण्याची प्रथा

### भैसदेहीत कार्तिक पौर्णिमेपासून यात्रेला सुरुवात

**मारुती पाटणकर**

◆ **चुरणी, ५ नोव्हेंबर**

जगाबरोबरच देशही विज्ञानाच्या क्षेत्रात दिवसेंदिवस प्रगती करत आहे, पण परंपरांना फारसा फरक पडत नाही. शहर असो वा गाव आजही अनेक कुटुंबांमध्ये प्रथा व परंपरा पाळल्या जात आहेत. राज्याच्या सीमेपासून चाळीस किलोमीटर अंतरावर बैतुल जिल्ह्यातील भैसदेहीमध्ये नदीच्या पाण्यात काळजाचा तुकडा टाकण्याची अनोखी परंपरा पाळली जात आहे. ही परंपरा किती जुनी आहे, हे स्पष्ट झाले नसले तरी अनेक वर्षांपासून ती सुरू असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

भैसदेहीच्या पूर्णा नदीवर कार्तिक पौर्णिमेपासून १५ दिवस चालणाऱ्या या जत्रेत शेकडो नवजात बाळांना नदीच्या प्रवाहाच्या मध्यभागी पाण्यामध्ये सोडले जाते आणि काहीवेळाने बाहेर काढले



नवस पूर्ण करण्यासाठी बाळाला नदीच्या प्रवाहात सोडताना दाम्पत्य

जाते. यामागील तर्क असा आहे की, येथे नवस केल्याने अपत्यप्राप्ती होते. यासाठी ही परंपरा अनेक काळापासून सुरू आहे. दरवर्षी कार्तिक पौर्णिमेला मोठी यात्रा भरते. मेळ्यात मध्यप्रदेश, महाराष्ट्र आणि छत्तीसगडमधून अपत्यहीन जोडपी नवसाची प्रार्थना करण्यासाठी येतात आणि नवस पूर्ण झाल्यानंतर तो फेडायला येतात. नरेश आणि राणी हे महाराष्ट्रातील जोडपे सांगतात की, त्यांना पूर्णा मातेकडून मुलाची इच्छा होती. नवस केल्यानंतर त्यांच्या अंगणात समृद्धी आली आणि आता त्यांची इच्छा पूर्ण झाली आहे.

बाळाला पाळण्यातून नदीच्या पाण्यात सोडताना भीती वाटत होती का? या प्रश्नावर ते म्हणाले की पूर्णा माईच्या कृपेने मला मुलाचा आशीर्वाद मिळाला. त्यामुळे त्यांच्या मनात कोणत्याही प्रकारची भीती नाही. मुलाची इच्छा पूर्ण झाल्यावर लोक येथे येतात. मॉ पूर्णा नदी भैसदेही जवळ आहे. बैतुल जिल्हा मुख्यालयापासून सुमारे ६५ किमीवर पूर्णा नदी असून तिला चंद्रपुत्री म्हणजेच चंद्राची कन्या म्हणतात. ती भैसदेही शहराजवळ उगम पावते. कार्तिक महिन्यातील पौर्णिमेच्या दिवशी अपत्यहीन जोडपी आणि लोक सुख-समृद्धीच्या आशेने जत्रेत येतात. चंद्रपुत्री नावाच्या पूर्णा नदीच्या उगमामागे अनेक पौराणिक कथा आहेत. काहींच्या मते हे सप्तऋषींच्या उपासनेचे फलित आहे तर काहींच्या मते या भागात दुष्काळ पडल्यानंतर एका राजाच्या तपश्चर्येमुळे भगवान शिवाने पूर्णाचा अवतार घेतला होता. एकेकाळी नदी दुधाच्या प्रवाहाप्रमाणे वाहत असेही सांगितले जाते.

# कंटेनर-कारचा भीषण अपघात, तिघांचा मृत्यू

### १ गंभीर : एकुर्ली फाट्याजवळील घटना

◆ **अल्लीपूर, ५ नोव्हेंबर**

अल्लीपूर-धोत्रा महामार्गावरील एकुर्ली फाट्याजवळ मंगळवारी रात्री ११ वाजताच्या सुमारास झालेल्या भीषण अपघातात तीन तरुणांचा जागीच मृत्यू तर १ गंभीर जखमी झाला. विरुद्ध दिशेने येणाऱ्या एका वेगवान कंटेनरने कारला जोरदार धडक दिल्याने हा अपघात घडला.



अपघातात चेंदामेंदा झालेली कार

मृतांमध्ये अलमडोह येथील गौरव गावंडे, चानकी येथील निशांत वैद्य आणि अल्लीपूर येथील वैभव शिवणकर यांचा समावेश आहे. तर अल्लीपूर येथील भूषण वडनेरकर हा गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर सावंगी मेघे येथील रुग्णालयात उपचार सुरू आहे.

गौरव गावंडे हा मुंबईहून आपल्या गावी आला होता. त्याला घेण्यासाठी भूषण वडनेरकर आपल्या एम. एच. ४९ यू. ०२७५ क्रमांकाच्या कारने धोत्रा चौकात गेला. त्याच्यासोबत निशांत वैद्य आणि वैभव शिवणकर हे सुद्धा होते. मित्रांसह ते कारने अल्लीपूरच्या दिशेने निघाले. कार एकुर्ली फाट्याजवळ आली असता विरुद्ध दिशेने येणाऱ्या एम. एच. ३२ ए. के. ६१११ क्रमांकाच्या ट्रेलरने कारला जोरदार धडक दिली. या अपघातात गौरव व निशांत यांचा जागीच मृत्यू झाला. जखमी भूषणने स्वत:ला सावरत आपल्या वडिलांना फोन करून अपघाताची माहिती दिली. त्यानंतर भूषणचे वडील शिवदास वडनेरकर आणि त्यांचा मुलगा मयूर सोबत घटनास्थळ गाठले. मयूरने भूषण आणि वैभवला सावंगी रुग्णालयात दाखल केले असता उपचारादरम्यान वैभवचाही मृत्यू झाला. भूषणच्या छाती, पाय आणि डोक्याला गंभीर दुखापत असून त्याच्यावर सावंगी मेघे येथील रुग्णालयात उपचार सुरू आहेत. अपघाताची माहिती मिळताच अल्लीपूर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. पंचनामा करून मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी शासकीय रुग्णालयात पाठविले. या प्रकरणी अल्लीपूर पोलिस ठाण्यात कंटेनर चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**कारचा चेंदामेंदा**

दोन वाहनांतील धडक इतकी भीषण होती की धडकेनंतर प्रचंड आवाज झाला. अपघातात कारचा अक्षरशः चेंदामेंदा झाला. मृतकांमध्ये दोघे फोटोग्राफर असल्याचे समजते. (तभा वृत्तसेवा)

# तभा तुळशी विवाहात माहेरची भगवी अन् सासरची पांढरी टोपी

**• नाचणगावच्या विठ्ठल रुक्मिणी मंदिरात जल्लोष • तुळशी अन् कृष्णाचे आई-वडील, मामाही उभे**

**अविनाश भोपे**

◆ **पुलगाव, ५ नोव्हेंबर**

कोणतेही काम हाती घेतले की, ते पूर्णत्वास नेण्याची विठ्ठल रुक्मिणी मंदिराचे अध्यक्ष केशवराव दांडेकर यांची हातोटी! तरुण भारतने तुळशी लावा अभियान राबवले आणि विठ्ठल मंदिराच्या विश्वस्तांमध्ये उत्साह संचारला होता... आज कार्तिकी पौर्णिमेला तुळशी विवाहासाठी तर डबल उत्साह होता. या विवाहात काय नव्हते. तुळशी नवरी होती, कृष्ण नवरदेव होता. पंढरपूरची वारी करणारे पांढऱ्या टोपीतील वारकरी वरपक्ष, तर भगव्या टोपीतील गावकरी वधूपक्षात सहकारी होते. खऱ्या खुऱ्या लग्नातील सर्व सोपस्कार तुळशी विवाहात नाचणगावकरांनी पार पाडले.

आज सकाळी १०.४५ च्या मुहूर्तावर नाचणगाव येथील विठ्ठल मंदिरात 'तुळशीमाय आणि भगवान कृष्णा'वर अक्षदा पडल्या. विठ्ठल रुक्मिणी देवस्थानात चातुर्मासानिमित्त चार महिने धार्मिक कार्यक्रमाचे



नाचणगावच्या विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात तुळशी विवाह

आयोजन करण्यात आले होते. आज कार्तिक पौर्णिमेला चातुर्मासाची समाप्ती आणि तुळशी विवाहाचे आयोजन करण्यात आले होते. पहाटे ५ वाजता काकड आरतीला नागरिक एकत्र आले. काकड आरतीनंतर मंदिराची केळीचे खांब व फुग्यांची सजावट करण्यात आली. सकाळी ९ वाजतापासून लग्नघरी असते तशी लगबग सुरू झाली. हळूहळू गावातील वऱ्हाडी जमा होऊ लागले. पालखी सजवल्या गेली. १० वाजता वाजंत्री आले. दिंड्या, पताका, मंगलवाद्यासह पालखी शोभायात्रेला सुरुवात झाली.

पालखीची ग्राम प्रदक्षिणा झाल्यानंतर मंदिरात परत आलेल्या पांढऱ्या टोपीतील वरपक्षाचे भगव्या टोपीतील वधू पक्षातील लोकांनी पाय धुवून, हार घालून गुलाल लावत स्वागत केले. त्यानंतर वरपक्ष सभामंडपात आले. आकर्षक सजवलेल्या पितळी भगवान श्रीकृष्णाला मारोतीहून वधू माता पिता पुरुषोत्तम व मंगला चेडे यांनी आणले. त्यानंतर मुलीचे मामा सुधाकर सुरेसे यांनी विठ्ठल रुक्मिणीच्या गाभाऱ्यातून आकर्षक सजवलेली वधू तुळशी आणली. अक्षदा वाटल्या गेल्या. पाच मंगलाष्टकं झाली आणि सावधान म्हणताच फटाक्यांची आतषबाजी झाली, बॅण्ड वाजला. सुलग्नासाठी गावात लागते तशी भलीमोठी रांग लागली. काल्याचे कीर्तन झाले. दुपारी १२ नंतर जेवनाच्या पंगती उठल्या.

### १११ तुळशीचे रिटर्न गिफ्ट

नाचणगाव येथील चेडे दाम्पत्यांना तुळशीचे रोपटे वाटण्याचा छंद आहे. तुळशी लावा अभियानात त्यांनी तुळशी दान दिल्या होत्या. आजच्या तुळशी विवाहात चेडे दाम्पत्याने वर माता पित्याची भूमिका पार पाडली. लग्नासाठी आलेल्या वऱ्हाड्यांना १११ तुळशीचे रोपटे रिटर्न गिफ्ट देण्यात आले.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# हिंदू यात्रेकरूंना परत पाठविले

◆ **जालंधर, ५ नोव्हेंबर**

गुरु नानक देव जी यांच्या जयंतीच्या पूर्वसंध्येला, वाघा सीमा ओलांडूनही पाकिस्तानात जाण्यापासून रोखण्यात आल्यामुळे यात्रेकरूंच्या एका गटाचा आनंद मावळला. सर्व इमिग्रेशन औपचारिकता पूर्ण करूनही पाकिस्तानी अधिकाऱ्यांनी शीख गटासह पाकिस्तानात प्रवेश करणाऱ्या हिंदू यात्रेकरूंना अचानक रोखले.

दिल्ली आणि लखनऊमधील कुटुंबांसह हिंदू यात्रेकरूंना अपमानास्पदरीत्या परतण्यास भाग पाडण्यात आले. पाकिस्तानी अधिकाऱ्यांनी जाहीर केले की ज्यांच्या प्रवास कागदपत्रांवर शीख लिहिले आहे त्यांनाच नानकाना साहिबमधील पवित्र तीर्थस्थळी जाण्यासाठी बसने परवानगी दिली जाईल. एका यात्रेकरूने सांगितले की, त्यांनी आम्हाला सांगितले की, तुम्ही हिंदू आहात, तुम्ही शीख गटासोबत जाऊ शकत नाही.

पाकिस्तानी अधिकाऱ्यांनी भारतीय यात्रेकरूंसाठी एकूण २,१०० हून अधिक व्हिसा मंजूर केले होते, परंतु अधिकृत शीख गटाचा भाग म्हणून केवळ १,७९६ जण सीमा ओलांडू शकले. कथित प्रक्रियात्मक त्रुटींमुळे शीख आणि हिंदू अशा सुमारे ३०० यात्रेकरूंना प्रवेश नाकारण्यात आला. तथापि, हिंदूंचा दावा आहे की त्यांच्या प्रवास कागदपत्रांमध्ये त्यांच्या धार्मिक ओळखीवरून त्यांना वेगळे करण्यात आले होते.

सरकारी सूत्रांनुसार, प्रवेश नाकारण्याचा निर्णय पाकिस्तानच्या सार्वभौम अधिकारक्षेत्रात येतो आणि भारत या संदर्भात अधिकृतपणे कोणताही आक्षेप घेऊ शकत नाही. ज्या हिंदूंना परत पाठवण्यात आले त्यांच्यासाठी ही घटना अत्यंत निराशाजनक होती. दिल्लीतील यात्रेकरू अमर चंद यांनी त्यांच्या कुटुंबाने सीमा ओलांडली, इमिग्रेशन पूर्ण केले आणि बस तिकिटे कशी खरेदी केली याचे वर्णन केले आहे, परंतु शेवटच्या क्षणी त्यांना थांबवण्यात आले आणि परत येण्यास सांगितले गेले. कुटुंब गुरु नानक देव जी यांच्या पवित्र तीर्थस्थळांवर श्रद्धांजली वाहण्यासाठी शीख यात्रेकरूंमध्ये सामील होण्याची आशा करत होते. ◂(वृत्तसंस्था)

### पाकिस्तानचा धर्मवेडेपणा, शीख भाविकांनाच दिला प्रवेश



### व्हिसा तीर्थयात्रेसाठी नव्हता?

» सरकारी सूत्रांनी सांगितले की थांबवण्यात आलेल्या काही व्यक्ती पूर्वी पाकिस्तानात राहत होत्या आणि नंतर त्यांनी भारतीय नागरिकत्व घेतले होते. सूत्रांनी पुढे सांगितले की ते तीर्थयात्रेसाठी नव्हे तर ओळखीच्या लोकांना भेटण्यासाठी पाकिस्तानला जात होते, जसे त्यांनी भारतीय एजन्सींना सांगितले होते. ■



गुरुनानक जयंतीनिमित्त अमृतसर येथील सुवर्ण मंदिरात बुधवारी विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. गुरू ग्रंथसाहिब यांच्या दर्शनसाठी भाविकांनी मोठी गर्दी केली. येथील पवित्र सरोवरात मंगलस्नान करताना भाविक

# कॅनडाने फेटाळले ७४ टक्के व्हिसा अर्ज

### भारतीय विद्यार्थ्यांचे नुकसान

◆ **ओटावा, ५ नोव्हेंबर**

कॅनडाच्या सरकारने ७४ टक्के भारतीय विद्यार्थ्यांचे व्हिसा अर्ज नाकारले आहेत. अधिकृत आकडेवारीनुसार, २०२५ च्या ऑगस्ट महिन्यात भारतातून आलेल्या बहुतेक स्टडी परमिट अर्जांना मंजुरी मिळाली नाही. चीनमधील केवळ २४ टक्के अर्जांना नकार देण्यात आला. या आकड्यांवरून कॅनडाने भारतावरील व्हिसा धोरण अधिक कठोर केल्याचे स्पष्ट होते.

कॅनडामधील विद्यार्थी व्हिसांवरील निर्बंध मागील काही महिन्यांपासून अधिक कडक करण्यात आले आहेत. शिक्षणाच्या नावाखाली होत असलेल्या फसवणुकीवर आणि तात्पुरत्या स्थलांतरावर नियंत्रण ठेवण्यासाठी हे पाऊल उचलल्याचे कॅनडाच्या सरकारचे म्हणणे आहे. पण त्याचा सर्वाधिक परिणाम भारतीय विद्यार्थ्यांवर होत आहे. कॅनडाच्या इमिग्रेशन विभागाच्या अहवालानुसार, एकूण अभ्यास परवान्यांपैकी जवळपास ४० टक्के अर्ज नाकारले गेले आहेत. एवढेच नव्हे तर, देशात राहणाऱ्या महिला विद्यार्थ्यांवर नजर ठेवण्यासाठीही सरकारने विशेष तपास मोहीम सुरू केली आहे. यामुळे वैयक्तिक स्वातंत्र्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. भारत आणि कॅनडा यांच्यातील संबंध आधीच तणावपूर्ण आहेत.

२०२३ मध्ये तत्कालीन पंतप्रधान जस्टिन ट्रुडो यांनी एका कॅनेडियन नागरिकाच्या हत्येत भारताच्या सहभागाचा आरोप केला होता. ◂(वृत्तसंस्था)

# आतापर्यंत पाकिस्तानचे ११०० पेक्षा जास्त सैनिक ठार

**● २०२५ वर्ष ठरले वाईट ● गुप्तचर यंत्रणेची आकडेवारी**

◆ **नवी दिल्ली, ५ नोव्हेंबर**

पाकिस्तानच्या लष्करी आणि सुरक्षा यंत्रणेसाठी २०२५ हे वर्ष सर्वात वाईट वर्ष ठरले आहे. १९७१ च्या भारत- पाकिस्तान युद्धानंतर पहिल्यांदाच इतक्या प्रमाणात सैनिक मारले गेले. गुप्तचर यंत्रणेच्या आकडेवारीनुसार, जानेवारी ते ऑक्टोबर या कालावधीत ११०० पेक्षा अधिक सैनिक, पोलिस आणि गुप्तचर अधिकारी मारले गेले. २००९ नंतरचा हा सर्वाधिक आकडा आहे. बलुच बंडखोर आणि तालिबान सारख्या गटांच्या हल्ल्यांमुळे पाकिस्तानचे सैन्य हतबल झाले आहे.

पाकिस्तानला स्वतःचेच प्रदेश अंतर्गदृष्ट्या पोखरत आहेत. बलुचिस्तानमध्ये विद्रोही गट विशेष सक्रिय आहेत. ते वेगळे राज्य स्थापन करण्याच्या प्रयत्नात असू ते सतत पाकिस्तानी लष्करावर सतत हल्ले करत आहेत. २०२५ च्या पाहिल्या पाच महिन्यांमध्ये केवळ बलुचिस्तानमध्ये ३५० मोठे हल्ले आणि २० किरकोळ हल्ले झाले. यात सैनिक, पोलिस आणि नागरिकांचा मृत्यू झाला. ही माहिती गुप्तचर अहवालात दिली आहे. पश्चिम सीमेवर अफगाणिस्तानातून तालिबान आणि पश्तून गटांचे हल्ले वाढले आहेत. तहरीक-ए-तालिबान पाकिस्तान ही दहशतवादी संघटना अफगाणिस्तानातून घुसखोरी करत हल्ले करते. जानेवारी ते ऑक्टोबर या काळात हल्ल्यांमध्ये १९५ सुरक्षा कर्मचारी मारले गेले. केवळ ऑक्टोबरमध्ये १९५ सैनिक मारले गेले. १०९ जखमी झाले आणि १५ जण बेपत्ता किंवा युद्धकैदी झाले. यात एक पोलिस अधीक्षक, एक लेफ्टनंट कर्नल, तीन मेजर, एक कनिष्ठ आयुक्त अधिकारी आणि एक कॅप्टन अशा आठ अधिकाऱ्यांचही समावेश आहे.

मागील आठवड्यात सहा सैनिक मारले गेले. यात दोन एसएसजी कमांडोंचाही समावेश होता. डिसेंबरपर्यंत एकूण मारले गेलेल्या सैनिकांची संख्या १३०० ते १४०० होती. थोडक्यात १.६ दहतवाद्यांमागे एक पाकिस्तानी सुरक्षा कर्मचारी मारला गेला असल्याचा अंदाज गुप्तचर संस्थांने दिला आहे. या आकडेवारीत ऑपरेशन सिंदूर दरम्यान मारले गेलेले सैनिक वगळण्यात आले आहेत. ◂(वृत्तसंस्था)



### ऑपरेशन सिंदूरमध्ये १०० हून अधिक सैनिक ठार

» २०२५ मध्ये झालेल्या ऑपरेशन सिंदूरमध्ये १०० पेक्षा अधिक सैनिक ठार झाले. या हल्ल्यात पाकिस्तानी लष्कर आणि हवाई दलाचे १३ जवान मारले गेले. नियंत्रण रेषेवरील कारवाईदरम्यान ३५ ते ४० सुरक्षा कर्मचारी मृत्युमुखी पडले. एकूणच, ऑपरेशन सिंदूरमध्ये ५० हून अधिक पाकिस्तानी सैनिकांचे बळी गेले, तर ३५ गंभीर जखमी झाले. ■

### मिर्झापूरमध्ये ट्रेनने सहा महिलांना चिरडले

◆ **मिर्झापूर, ५ नोव्हेंबर**

बुधवारी उत्तरप्रदेशातील मिर्झापूर येथे कालका एक्सप्रेस ट्रेनने अनेक यात्रेकरूंना चिरडले. रेल्वेने सहा महिलांच्या मृत्यूची पुष्टी केली आहे. मृतांचा आकडा वाढू शकतो. अनेक लोक जखमी झाले आहेत. या घटनेमुळे स्टेशनवर घबराट पसरली. चुनार रेल्वे स्टेशनवर सकाळी ९:३० वाजता हा अपघात झाला.

जखमींना जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले. अपघातात मृत्युमुखी पडलेले बहुतेक यात्रेकरू वाराणसीतील कार्तिक पौर्णिमा तीर्थस्थळी जात होते. चुनार रेल्वे स्थानकावर हा अपघात झाला. सांगण्यात येत आहे की- चोपनहून येणारी पॅसेंजर ट्रेन प्लॅटफॉर्म ४ वर आली. भाविक तिथे उतरले आणि रुळ ओलांडू लागले. ते प्लॅटफॉर्म ३ ओलांडून रुळावर येताच कालका एक्सप्रेस तिथून गेली. तिला थांबा नव्हता. भाविक निघून जाण्यापूर्वीच त्यांना ट्रेनने धडक दिली. ◂(वृत्तसंस्था)

## चित्रपट वार्ता

### सोनाक्षी म्हणते, मी १६ महिन्यांपासून गरोदर

**मुंबई** : एखाद्या अभिनेत्रीचे लग्न झाल्यानंतर तिच्याविषयीच्या बातम्यांना ऊत येतो. हाच प्रकार सोनाक्षीच्या बाबतीतही घडला. ती गरोदर असल्याच्या असंख्य बातम्या मागील वर्षभरात आल्या. याविषयी सोनाक्षीने एका पॉडकास्टमध्ये सांगितले की, मी गेल्या १६ महिन्यांपासून गरोदर आहे, असे सांगण्यात येत आहे. माझे लग्न झाल्यानंतर बाबांसोबत काही तपासण्यासाठी हॉस्पिटलला गेले असताना तेव्हापासूनच मी गरोदर असल्याचे बोलले जात आहे. लग्नाच्या दुसऱ्या दिवशीपासूनच मी गरोदर होते, असे यांचे म्हणणे आहे. प्रत्यक्षात माझ्याकडे बाळाच्या आगमनाची बातमी असेल तेव्हा मी ती गोष्ट लपवून ठेवणार नाही. ■



### रश्मिकाने दाखवली साखरपुड्याची अंगठी

**हैदराबाद** : रश्मिका मंदाना सध्या तिच्या वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत आहे. अलिकडेच, ती तिच्या आगामी चित्रपट 'गर्लफ्रेंड' च्या प्रमोशनसाठी अभिनेता जगपती बाबूच्या 'जयम्मू निश्चयामु रा' या टॉक शोमध्ये आली होती. या कार्यक्रमाचा एक व्हिडिओ समोर आला आहे, ज्यामध्ये ती अंगठी दाखवताना दिसत आहे. चाहत्यांना वाटते की ती तिची साखरपुड्याची अंगठी असू शकते. प्रोमो व्हिडिओमध्ये, जगपती रश्मिकाला विचारतो, विजय देवरकोंडा सोबतचे मैत्री, विजय सेतुपतीचे चाहते आणि थलपथी विजयचे सर्वकालीन चाहते? त्यामुळे असे दिसते की तुम्ही विजयम (यश) आणि विजयाचे मालक आहात. काही वृत्तवाहिन्यांनी असा दावा केला होता की रश्मिका आणि विजय देवरकोंडा यांनी साखरपुडा केला आहे. हा साखरपुडा दोन्ही कुटुंबांच्या आणि अभिनेत्यांच्या जवळच्या मित्रांच्या उपस्थितीत पार पडला. दोघांनी अजूनही याची अधिकृत घोषणा केलेली नाही. ■



### 'बॉर्डर २'मधील वरुण धवनची पहिली झलक



**मुंबई** : सनी देओलच्या पोस्टरनंतर 'बॉर्डर २' चित्रपटाचे आणखी एक पोस्टर रिलीज झाले आहे. बुधवारी, चित्रपटाचे निर्माते, टी-सीरिज आणि जेपी फिल्म्स यांनी वरुण धवनचा पहिला लूक समोर आणला. यात त्याची अनोखी आणि शक्तिशाली शैली दिसून येते. पोस्टरमध्ये वरुण एका भारतीय सैनिकाच्या भूमिकेत दिसत आहे, जो लष्कराचा गणवेश परिधान करून हातात बंदूक धरलेला आहे. त्याच्या चेहऱ्यावर आक्रमकता आणि जोश स्पष्टपणे दिसतो. हा लूक त्याच्या व्यक्तिरेखेतील शौर्य आणि उत्साह दर्शवितो. यापूर्वी, स्वातंत्र्यदिनी, निर्मात्यांनी चित्रपटाचे पहिले पोस्टर रिलीज केले होते. पोस्टरमध्ये सनी देओल योद्ध्याच्या कणखर अवतारात दिसत होता. ■




बिहार विधानसभेसाठी गुरुवारी पहिल्या टप्प्यासाठी मतदान होणार आहे. मतदान सुरळीत पार पडावे म्हणून राज्यात चोख सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात आली. नियोजित मतदान केंद्रावर साहित्यासह जाताना सुरक्षा जवान आणि निवडणूक कर्मचारी

### तिहेरी बॉम्बस्फोट प्रकरणातील आरोपीला जामीन मंजूर

◆ **मुंबई, ५ नोव्हेंबर**

२०११ मध्ये झालेल्या तिहेरी बॉम्बस्फोटांप्रकरणी अटक केलेल्या एकाला मुंबई उच्च न्यायालयाने मंगळवारी जामीन मंजूर केला. या बॉम्बस्फोटात २७ जणांचा मृत्यू झाला होता आणि १२० हून अधिक जण जखमी झाले होते.

न्या. ए. एस. गडकरी आणि आर. आर. भोसले यांच्या खंडपीठाने कफील अहमद मोहम्मद अयुब यांना एक लाख रुपयांच्या जामिनावर जामीन मंजूर केला. बिहारचा रहिवासी अयुब सध्या मुंबई मध्यवर्ती कारागृहात आहे. त्याला फेब्रुवारी २०१२ मध्ये अटक करण्यात आली होती आणि तेव्हापासून तो कोठडीत आहे. ◂(वृत्तसंस्था)

# पुण्यात चार तालुक्यांत १२०० बिबट्यांचा मुक्तसंचार

◆ **पुणे, ५ नोव्हेंबर**

पुणे जिल्ह्यातील जुन्नर, आंबेगाव, शिरूर आणि खेड या चार तालुक्यांमध्ये तब्बल १२०० हून अधिक बिबटे मुक्तसंचार करत आहेत. इतक्या मोठ्या प्रमाणावर बिबट्यांची उपस्थिती महाराष्ट्रात अन्यत्र कुठेच आढळत नाही. शेतात, माळरानावर, नदीकिनारी, गोठ्याजवळ आणि अगदी रस्त्यांवरही बिबटे सहज दिसतात. त्यामुळे ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

अलीकडेच शिरूर तालुक्यातील पिंपरखेड येथे रोहन विलास बोंबे याचा बिबट्याच्या हल्ल्यात मृत्यू झाला. या घटनेनंतर संतप्त ग्रामस्थांनी पुणे- नाशिक महामार्ग अडवून धरला होता. मागील काही महिन्यांतच जुन्नर, आंबेगाव आणि शिरूर भागात बिबट्यांच्या हल्ल्यांमुळे १२ पेक्षा अधिक नागरिकांचा मृत्यू झाला आहे. या चार तालुक्यांमध्ये एवढे बिबटे आले तरी कुठून, हा प्रश्न आहे. ही परिस्थिती अचानक निर्माण झालेली नाही, तर मागील काही वर्षांपासूनच्या पर्यावरणीय आणि मानवनिर्मित कारणांचा तो परिणाम आहे. पुणे जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर ऊसाची शेती आहे. घनदाट उसाच्या शेतांमध्ये बिबट्यांना आश्रय, प्रजननासाठी जागा आणि शिकार दोन्ही मिळतात. त्यामुळे हे भाग बिबट्यांसाठी अत्यंत सुरक्षित ठरतात. एका चौरस शंभर किलोमीटरमध्ये सहा ते सात बिबटे आढळतात. ही घनता देशातील काही अभयारण्यांपेक्षाही जास्त आहे.

पश्चिम घाटातील जंगलांमधील जैवविविधतेचा ऱ्हास, जंगली शिकार प्राण्यांची संख्या कमी होणे आणि मानवी वस्तीचा सतत वाढता विस्तार यामुळे बिबटे मानवी परिसराकडे आकर्षित झाले आहेत. ते आता गावांजवळील कुत्रे, गुरे आणि कचरा यावरही जगतात. याशिवाय सिंचन प्रकल्पांमुळे या भागात वर्षभर पाण्याची उपलब्धता राहते, त्यामुळे बिबट्यांना जगण्यासाठी अनुकूल वातावरण मिळते, असे तज्ज्ञ सांगतात. ◂(वृत्तसंस्था)



### पश्चिमी विक्षोभ सक्रिय; देशभरात वाढणार थंडीचा जोर

◆ **नवी दिल्ली, ५ नोव्हेंबर**

देशभरात पुन्हा थंडीचा जोर वाढण्याची शक्यता आहे. भारतीय हवामान खात्याने दिलेल्या माहितीनुसार, ४ नोव्हेंबरपासून एक नवीन पश्चिमी विक्षोभ सक्रिय झाले आहे. याचा परिणाम थेट हिमाचल प्रदेश, उत्तराखंड आणि जम्मू-काश्मीर या पर्वतीय राज्यांवर दिसून येईल. या विक्षोभामुळे या राज्यांत पाऊस, बर्फवृष्टी आणि गारपीट होण्याची शक्यता आहे.

हवामान विभागानुसार, बंगालच्या उपसागराच्या मध्य आणि पूर्व भागात तसेच म्यानमारच्या किनाऱ्याजवळ कमी दाबाचे क्षेत्र निर्माण झाले आहे. या हवामान बदलामुळे दक्षिणेकडील राज्यांमध्ये ढगाळ वातावरण आणि विजांच्या कडकडाटासह हलका ते मध्यम पाऊस होण्याची शक्यता आहे. दरम्यान कोकण, गोवा तसेच मध्य महाराष्ट्रातही पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

दक्षिण भारतात हवामानात बदल जाणवणार असून ६ नोव्हेंबरदरम्यान तामिळनाडू, किनारी आंध्र प्रदेश, यानम, रायलसीमा आणि किनारी कर्नाटक या भागांमध्ये हलका ते मध्यम पाऊस पडू शकतो. हवामान खात्याचा निष्कर्ष स्पष्ट आहे हिवाळ्याची चाहूल लागली असून, नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात देशभरात तापमान कमी होईल आणि थंडीची लाट तीव्र होणार आहे. ◂(वृत्तसंस्था)


# पाकिस्तानी नागरिकाला ४० वर्षांची शिक्षा

◆ **न्यू यॉर्क, ५ नोव्हेंबर**

इराणनिर्मित प्रगत पारंपारिक शस्त्रे वाहतूक केल्याच्या आरोपाखाली अमेरिकेतील एका पाकिस्तानी नागरिकाला ४० वर्षांची शिक्षा सुनावण्यात आली आहे. मुहम्मद पहलवान असे या आरोपीचे नाव आहे.

मुहम्मद पहलवानला या वर्षी जूनमध्ये दहशतवाद्यांना भौतिक मदत आणि संसाधने पुरवणे आणि हूथींना स्फोटक उपकरणे वाहतूक करण्याचा कट रचल्याबद्दल दोषी ठरवण्यात आले होते. या आरोपांसाठी त्याला गत महिन्यात ४० वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा सुनावण्यात आली. खटल्यादरम्यान सादर केलेल्या न्यायालयीन नोंदी व पुराव्यांनुसार, ११ जानेवारी २०२४ च्या रात्री अमेरिकेचे सेंट्रल कमांड नेव्ही फोर्स सोमालियाच्या किनाऱ्याजवळ अरबी समुद्रात एका ध्वज नसलेल्या डाऊ या एका लहान जहाजावर चढले. अमेरिकन बोर्डिंग टीमला पहलवानसह जहाजावर १४ वैयक्तिक नाविक आढळले. तपासादरम्यान जहाजात बॅलिस्टिक क्षेपणास्त्र घटक, जहाजविरोधी क्रूझ क्षेपणास्त्र, पारंपारिक शस्त्रे आढळली व ती जप्त केली. ◂(वृत्तसंस्था)

# समुद्राच्या तळाशी दोन तुकड्यांत विभागते आहे पृथ्वी




### लुईझियाना विद्यापीठातील भूगर्भतज्ज्ञांचा इशारा

◆ **वॉशिंग्टन, ५ नोव्हेंबर**

पृथ्वीचा पृष्ठभाग म्हणजे एकसंध खडक नसून, ती अनेक विशाल तुकड्यांनी म्हणजेच टेक्टोनिक प्लेट्सनी बनलेली आहे. या प्लेट्स हळूहळू सरकतात, एकमेकांवर आदळतात किंवा विभक्त होतात. पण अलीकडे शास्त्रज्ञांनी एक असा शोध लावला आहे ज्याने संपूर्ण भूगर्भशास्त्राच्या अभ्यासाला हादरा दिला आहे.

कॅनडातील व्हँकुव्हर बेटाजवळ, पॅसिफिक महासागराच्या खोल भागात असलेली एक टेक्टोनिक प्लेट आता दोन तुकड्यांमध्ये फाटत आहे. या भागाला कॅस्केडिया सबडक्शन झोन म्हणून ओळखले जाते आणि आता ती प्लेट हळूहळू तुटत असल्याची पुष्टी वैज्ञानिकांनी केली आहे. या भूगर्भीय हालचालींचा मागोवा घेताना संशोधकांना समुद्राखाली जवळपास ७५ किलोमीटर लांबीची तडे गेलेली रेषा आढळली आहे. या झोनमधील 'एक्सप्लोरर प्लेट' आता ताणामुळे फुटू लागली आहे. ही प्लेट जुआन डी फुका, पॅसिफिक आणि उत्तर अमेरिकन या इतर प्लेट्सशी जोडलेली आहे. येथे सतत प्रचंड दाब आणि ताण निर्माण होत असून, ती स्थिती म्हणजे जणू एखादा ताणलेला रबरबँड तुटण्याच्या अगदी क्षणावर आहे. समुद्रतळाखालून पाठवलेल्या ध्वनीतरंगांच्या आणि भूकंपीय लहरींच्या साहाय्याने केलेल्या इमेजिंगमध्ये हे स्पष्ट दिसले.

लुईझियाना विद्यापीठातील भूगर्भतज्ज्ञ ब्रँडन शक यांनी या घटनेचे वर्णन अत्यंत प्रभावी शब्दांत केले सबडक्शन झोन म्हणजे टेकडीवर धावणाऱ्या रेल्वेसारखा असतो. एकदा तो सुरू झाला की, थांबवणे अशक्यप्राय असते. संशोधकांच्या मते, ही प्रक्रिया तातडीने आपत्ती निर्माण करेल असे नाही. या फाटण्याची गती अत्यंत मंद आहे आणि ती लाखो वर्षांच्या कालावधीत घडते. मात्र, यामुळे लहान-मोठे भूकंप होण्याची शक्यता कायम राहते. ◂(वृत्तसंस्था)

### पृथ्वीचा अंत नाही

» **ही घटना पृथ्वीचा अंत नाही, तर तिच्या नव्या अध्यायाची सुरुवात आहे. पृथ्वी सतत बदलते आहे आणि पॅसिफिकच्या खोल गर्भात घडणारी ही हालचाल आपल्याला तिच्या जिवंतपणाची आठवण करून देते. म्हणूनच सध्या घाबरण्याचे कारण नाही, पण लक्ष ठेवणे अत्यावश्यक आहे. या महासागराखाली सुरू असलेली ही अदृश्य हालचाल एक दिवस आपल्या ग्रहाच्या भविष्यातील भूगोलाचे रूपच बदलू शकते, असे ब्रँडन शक म्हणतात.** ■

### इतिहास घडून गेली आहे घटना

» **इ.स. १७०० मध्ये या भागात ९ तीव्रतेचा महाभूकंप झाला होता. यामुळे जपानच्या किनाऱ्यांपर्यंत त्सुनामी पोहोचली होती. त्यामुळे या क्षेत्रातील हालचाली भविष्यात पुन्हा भूकंप किंवा त्सुनामीसारख्या नैसर्गिक आपत्तीचे कारण ठरू शकतात. शास्त्रज्ञ हे पृथ्वीच्या उत्क्रांतीतील नैसर्गिक टप्पा मानतात.** ■

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख...

# लोकतंत्राचा जागर होत राहावा...

दोन-अडीच वर्षांच्या प्रतीक्षेनंतर महाराष्ट्रातील नगर पालिका आणि नगर पंचायतीच्या निवडणुकांचा बिगुल अखेर वाजला आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानंतर राज्य निवडणूक आयोगाने ही प्रक्रिया सुरू केली असून, राज्यातील २४६ नगरपरिषदा आणि ४२ नगरपंचायतींच्या निवडणुकांची घोषणा झाली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी, नागरिकांसाठी आणि एकूणच लोकतांत्रिक व्यवस्थेसाठी हा महत्त्वाचा प्रसंग आहे. स्थानिक स्वराज्य संस्था व तेथील सदस्यांचा संबंध सर्वसामान्य नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी थेट असतो. कोरोनाची भयंकर साथ गेली आणि या निवडणुका रेंगाळत राहिल्या. बऱ्याच मोठ्या कालावधीत नागरी समस्यांचा डोंगरही वाढत गेला. जनता-प्रशासन-स्थानिक राजकीय नेतृत्व यांच्यातील संवाद-सेतू तुटत गेला.

मागील दोन-अडीच वर्षांच्या कालावधीत स्थानिक स्वराज्य संस्थांवर प्रशासकीय राजवट होती. शहरातील स्वच्छता, पाणीपुरवठा, रस्त्यांची दुरवस्था, कचरा व्यवस्थापन, विविध प्रकारच्या परवानग्या आणि सार्वजनिक आरोग्य यासारख्या मूलभूत नागरी गरजांकडे प्रशासकीय अधिकाऱ्यांचा दृष्टिकोन काहीसा उदासीन दिसला. कारण ते स्थानिक नव्हते आणि लोकप्रतिनिधींएवढे जबाबदार नव्हते. परिणामी, एक ना धड भाराभर चिंध्या, असे अनेक योजनांचे झाले. जनतेने निवडून दिलेले निर्वाचित लोकप्रतिनिधीच नसल्याने लोकांचा आवाज, त्यांचे प्रश्न मांडण्याची सोयच नव्हती. नगरपरिषद, नगरपंचायतींची सत्ता प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या हाती एकवटली होती. त्याचा दुरुपयोगही मोठ्या प्रमाणात झाला. त्यांना हवे होते ते त्यांनी या काळात आपल्या पदरात पाडून घेतले. सामान्य नागरिक आणि प्रशासकीय यंत्रणा तसेच पर्यायाने सरकार यांच्यात मोठी दरी या काळात निर्माण झाली आणि ही दरी भरून काढण्याचे आव्हान आता या निवडणुकीच्या निमित्ताने सर्वपक्षीय स्थानिक नेत्यांपुढे उभे ठाकले आहे. खासदार-आमदार-मंत्र्यांना त्यांच्या पक्षाचे स्थान या निमशहरी भागांत मजबूत करायचे आहे. ही निवडणूक त्यांची नाही, पण त्यांच्या पाठीराख्यांची आहेच. त्या साऱ्या नेत्यांची प्रतिष्ठा आता या निवडणुकीत पणाला लागणार आहे. त्यांना थेट जनतेत जाऊन आपल्या पक्षाच्या उमेदवारांना निवडून आणावे लागणार आहे. ही निवडणूक केवळ नगरसेवकांची नाही, तर स्थानिक नेतृत्वाच्या ताकदीची, त्यांच्या विश्वासार्हतेचीही परीक्षा घेणारी आहे. गेल्या वर्षी कार्यकर्त्यांनी या नेत्यांना निवडून आणले, आता नेत्यांना त्यांच्या कार्यकर्त्यांना विजयी करण्यासाठी झटावे लागणार आहे. या वेळीही नगराध्यक्ष थेट जनतेतून निवडला जाणार आहे. मागच्या निवडणुकीपासून ही पद्धत सुरू झाली असली तरी ती अद्याप पूर्णपणे रुळली, असे म्हणता येणार नाही. या पद्धतीमुळे नगराध्यक्षाला अधिक अधिकार प्राप्त होतात हे खरे आहे. पण, त्याचबरोबर नगरसेवकांसोबत सामंजस्य टिकवून ठेवण्याचे व कामे पुढे नेण्याचे आव्हानही त्यांच्यासमोर असते. नगराध्यक्ष एका पक्षाचा असेल आणि नगरसेवकांचे बहुमत इतर पक्षाचे असेल तर शहराच्या विकासाचे आवश्यक निर्णय घेताना राजकीय संघर्ष उद्‌भवण्याची शक्यता बळावते. त्यामुळे निवडून येणारा नगराध्यक्ष कार्यक्षम आणि नगरसेवकांशी सलोखा असलेला व लोकभावनेची उत्तम जाण असणारा असावा, अशी तिहेरी अपेक्षा मतदाराला असेल. त्याचसोबत सत्ता स्थापनेतील 'घोडेबाजार' टाळण्याचा हा योग्य प्रसंग असेल आणि नव्या नेतृत्वाला उद्याची संधी देणाराही हा काळ असेल, यात वाद नाही.

मध्यंतरीच्या काळात या ना त्या कारणामुळे निवडणुका पुढे ढकलल्या जात राहिल्या. नगराच्या सरकारी अधिकारी व कर्मचाऱ्यांना भेटण्यासाठी लोक ताटकळत राहिले. त्यांचा आवाज स्थानिक स्वराज्य संस्थेत पोहचवणारे (मुदत संपल्याबरोबर माजी झालेले) नगरसेवकही पुढ्यात निवडणुका नव्हत्या म्हणून टाळाटाळ करू लागले होते. त्यामुळे लोकांच्या समस्या प्रलंबितच राहिल्या. काही अपवाद वगळता बहुतेक ठिकाणी नोकरशाहीवर अजिबातच अंकुश नव्हता. आता या साऱ्या अनिष्टाला छेद देत नव्या स्थानिक लोकतंत्राचा जागर होणार आहे. लोकशाहीचा तिसरा स्तर फार मोठ्या अवकाशानंतर पुन: अस्तित्वात येत आहे. आपल्या देशात त्रि-स्तरीय लोकशाही आहे. याचाच अर्थ, शासनाचे अधिकार आणि जबाबदाऱ्या तीन स्तरांत विभागल्या आहेत. केंद्रीय सरकार हा पहिला स्तर, दुसरा राज्य सरकार आणि तिसरा स्तर स्थानिक स्वराज्य संस्था. भारतीय संविधानातील ७३ आणि ७४ व्या घटनादुरुस्तीच्या माध्यमातून हा तिसरा स्तर जोडला गेला. त्यामुळे लोकशाहीचे विकेंद्रीकरण झाले आणि स्थानिक स्वराज्य संस्थांना बळकटी मिळाली. हा सर्वांत खालचा स्तर असला तरी लोकांच्या सर्वांत जवळचा आहे. अशी ही व्यवस्था आता बऱ्याच कालावधीनंतर पुन्हा अस्तित्वात येत असल्याने नागरिक व ग्रामस्थांमध्ये चैतन्य आहे. राजकीय पक्षांचे कार्यकर्तेही मोठ्या उत्साहात आहेत. निवडणूक हा आपल्याकडे उत्सवच असतो. यावेळी तो तिसऱ्या पण महत्त्वाच्या स्तरातील लोकशाहीचा आहे याचा आनंद सर्वांनाच झाला आहे. या निवडणुकीच्या पृष्ठभूमीवर उठलेले मतदारयाद्यांवरील शंका-कुशंकांचे सावट कायम आहे. निर्दोष मतदारयाद्या, भरपूर मतदार आणि भरपूर मतदान हा लोकशाहीच्या बळकटीचा आधार असतो. मतदारयाद्यांमध्ये अनेक पात्र मतदारांची नावे वगळली जाणे, एकाच मतदाराचे नाव अनेकदा समाविष्ट असणे किंवा स्थलांतरित झालेल्या मतदारांचे नाव काढले न जाणे अशा अनेक त्रुटी असल्याबाबतचे गंभीर प्रश्न उपस्थित केले जात आहेत. काँग्रेस नेते राहुल गांधी ते अगदी राज्य व जिल्हा स्तरावरील विरोधी नेते बोंबा ठोकत आहेतच. अशा काही तक्रारी असल्यास त्या सुयोग्य व विधायक मार्गाने मांडण्याचा पूर्ण अधिकार विरोधकांनाच नव्हे, तर नागरिकांना देखील आहे आणि म्हणूनच निवडणूक आयोगाने सुद्धा 'एसआयआर'ची घोषणा केली आहे. मतदारयाद्यांचे पुनरीक्षण हे लोकशाहीच्या सबलीकरणाचे स्वागतार्ह पाऊल ठरणार आहे. जवळपास ५१ कोटी मतदारांची या माध्यमातून फेरतपासणी केली जात आहे. खरे तर, निवडणूक ही प्रक्रिया समाजातील मते-मतांतरे, सहमती-असहमतीची दखल घेण्यासाठी आणि जनतेच्या मनात काय आहे, हे स्पष्ट करण्यासाठीच पार पाडली जाते. निवडणूक म्हणजे लोकशाहीचे अमृतमंथन आहे. या मंथनातून जे काही बाहेर येईल ते जनतेसाठी, त्यांच्या कल्याणासाठी व लोकशाहीच्या बळकटीकरणासाठीही फायदेशीर ठरत असते. त्यामुळे मतदारयाद्यांच्या फेरतपासणीबद्दलचे हेत्वारोप निरर्थक ठरतात. निवडणुका मुक्त व निष्पक्ष वातावरणात निर्विघ्नपणे पार पाडण्यासाठी निवडणूक आयोगाने अपार काळजी घ्यावी, अशी अपेक्षा आहे. तसे झाले तर हेत्वारोपांची दुमदुम आपसूक थंडावेल. महाराष्ट्रातील अर्धनागरी भागातील लोकशाहीसाठी ही निवडणूक एक नवी पहाट घेऊन आली आहे. या संधीचे सोने करण्याची जबाबदारी जशी निवडणूक आयोगाची आहे, तशीच ती राजकीय पक्षांची आणि नागरिकांचीही आहे. राजकीय पक्ष आणि नेत्यांनी केवळ सत्तेसाठी आश्वासनांची खैरात वाटू नये. त्यांनी शहराच्या सर्वांगीण विकासाचा आराखडा घेऊन जनतेसमोर जावे. खऱ्या स्थानिक प्रश्नांची जाण असणे आणि त्यावर दीर्घकालीन उपाययोजना कशी करणार, हे जनतेसमोर सिद्ध करावे. आपल्या पक्षाच्या उमेदवारांची निवड करताना नैतिकता, कार्यक्षमता आणि स्वच्छ चारित्र्य या गुणांना प्राधान्य द्यावे. मतदारांनी देखील भावनिक आवाहनांना न भूलता आपल्या मताधिकाराचा शहराच्या विकासासाठी उपयोग करावा. उमेदवाराची गुणवत्ता, पक्षाची नीतिमत्ता व इतिहास आणि शहराच्या विकासासाठी असलेली निष्ठाही मतदारांना तपासावी लागेल. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये निवडून आलेले लोकप्रतिनिधी आपल्या घराच्या, आपल्या गल्लीच्या आणि आपल्या शहराच्या प्रश्नांची सोडवणूक करणारा असतो. जबाबदार नागरिक म्हणून फक्त मतदानापुरते जागे न राहता, आपल्या लोकप्रतिनिधींवर सतत दबाव आणि देखरेख ठेवणे हेही आपले कर्तव्य समजले पाहिजे. या निवडणुकीतून कार्यक्षम आणि दूरदृष्टी असलेले नवे नेतृत्व उदयास येईल आणि तुटलेला 'संवाद-सेतू' पुन्हा बांधून नागरिकांच्या अपेक्षांची पूर्तता केली जाईल, अशी आशा करू या. निवडणुकीचा बिगुल वाजला, असे आपण म्हणतो तेव्हा जनसेवेचा अर्थात लोकतंत्राचाच जागर केला जात असतो, हे साऱ्यांनी लक्षात ठेवले पाहिजे. तो सतत होत राहावा, हीच सर्व लोकशाहीवादी नागरिकांची अपेक्षा आहे.

## तंत्रवेध

### डॉ. दीपक शिकारपूर

# अजेंटिक एआयची वेधक वाट

कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) हा सध्याचा परवलीचा शब्द आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रातील झेप नजीकच्या काळात अनेक क्षेत्रांवर आपला प्रभाव दाखवायला सुरुवात करेल. अनेक क्षेत्रे या तंत्रज्ञानामुळे आमूलाग्र बदलतील. गेल्या काही वर्षांमध्ये जेन आय टूल्स (उदा जेमिनी, चॅटजीपीटी)चा वापर वाढला. झटपट ज्ञानप्राप्तीसाठी अनेक विद्यार्थी आज त्यांचा वापर करतात. त्यामुळे माहितीची (अगदी चित्र, ध्वनी, व्हिडीओसकट) निर्मिती करणे सुलभ व सुपरफास्ट झाले. आता पुढचा टप्पा गाठायची वेळ आली आहे. त्यासाठी अजेंटिक एआय समजून घेणे महत्वाचे आहे. अजेंटिक एआय केवळ 'स्मार्ट' नाही, तर 'स्वायत्त' आहे. म्हणजेच, हे एआय स्वतः विचार करून कृती करू शकते. त्यामुळे डिजिटल सहकार्याचे रूप बदलू शकते. स्मार्ट म्हणजे मानवी उत्पादकता वाढवणाऱ्या प्रणाली आणि उत्पादने. अजेंटिक ही त्याच्या पुढची पायरी आहे. अजेंटिक एआय म्हणजे कृत्रिम बुद्धिमत्ता प्रणाली, जी विशिष्ट उद्दिष्टे साध्य करण्यासाठी स्वायत्तपणे कार्य करू शकते, निर्णय घेऊ शकते आणि मर्यादित मानवी देखरेखीसह कृती करू शकते. हे पारंपरिक एआयच्या पलीकडे जाणारे एक पाऊल आहे. अजेंटिक एआय सिस्टिममध्ये अनुभवातून शिकण्याची, गतिमान वातावरणाशी जुळवून घेण्याची आणि जटिल उद्दिष्टे साध्य करण्यासाठी इतर एआय सिस्टिमशी सहयोग करण्याची क्षमता अशी अनेक वैशिष्ट्ये आहेत. हे थोडेफार मानवी मेंदूसारखे आहे. यामुळे एआय अधिक प्रभावीपणे मानवासारखा विचार आणि सहयोग करू शकते.

अजेंटिक एआय एजंट म्हणजे अशी एआय प्रणाली, जी आपल्या माहितीजालातून माहिती गोळा करते, स्वतः शिकलेल्या अनुभवांवर आधारित तर्क करते आणि मानवी हस्तक्षेपाशिवाय बहु-टप्प्यांची कार्ये पूर्ण करते. हे एजंट्स जटिल समस्यांना लहान उप-कार्यांमध्ये विभागतात, साधने वापरतात आणि अंतिम ध्येय गाठेपर्यंत सतत स्वतःच्या कृतींचे मूल्यांकन करतात. थोडक्यात, हे एजंट्स जनरेटिव्ह एआयच्या निर्मितीक्षमतेचा वापर करून, त्याला कार्यान्वित करणारी एक निर्णायक शक्ती प्रदान करतात. यात मानवी हस्तक्षेप मर्यादित असतो. पारंपरिक एआयच्या तुलनेत अधिक कार्यक्षम असणारी अजेंटिक एआय स्वतंत्रपणे काम करू शकते. ही यंत्रणा अनुकूलता पूर्व-परिभाषित नियमांचे पालन करत अनुभवातून शिकते आणि बदलांशी जुळवून घेते. स्वतंत्र निर्णय घेऊ शकते. गुंतागुंतीची तसेच सोपी कामे आणि कार्यप्रवाह हाताळते. जटिल, बहु-चरणीय कार्ये हाताळते. अजेंटिक एआयचा उद्योगक्षेत्रात मोठा प्रभाव पडत आहे. भविष्यात हा प्रभाव अधिक वाढणार आहे. याचा वापर करून उद्योग अधिक कार्यक्षम,



उत्पादक आणि स्पर्धात्मक बनू शकतात. शिक्षणक्षेत्रात हे तंत्र महत्त्वाची कामगिरी बजावू शकते. शिक्षक एआयकडे एक सहयोगी म्हणून पाहतील. सध्या पारंपरिक शिक्षणव्यवस्थेमध्ये शिक्षकांना अनेकदा अशैक्षणिक (कारकुनी) काम मोठ्या प्रमाणावर करावे लागते. हे काम अजेंटिक एआय करू शकते. त्यामुळे शिक्षकांची शैक्षणिक उत्पादकता अनेक पटींनी वाढेल.

अजेंटिक एआय विशेषतः विज्ञान आणि अभियांत्रिकी अभ्यासक्रमांमध्ये व्हर्च्युअल लॅब्ज आणि इमर्सिव्ह लर्निंग वातावरणाची निर्मिती करेल. यामुळे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभवासारखे शिक्षण मिळेल. अनेकदा प्रात्यक्षिकांसाठी उद्योगांमध्ये प्रत्यक्ष भेट आवश्यक ठरते. आता त्याची गरज राहणार नाही. आपल्या संगणकावर आणि पडद्यावर आपण उन्नत अनुभव घेऊ शकू. एआय-आधारित मूल्यांकन प्रणाली अधिक अचूक, जलद आणि वैयक्तिककृत अभिप्राय देतील. परीक्षा पद्धतींमध्ये बदल करून विद्यार्थ्यांच्या प्रत्यक्ष कौशल्यांचे मूल्यांकन करण्यावर भर दिला जाईल; केवळ स्मरणशक्तीवर भिस्त राहणार नाही. ही पद्धत सरावासाठी मागील काही वर्षांच्या प्रश्नपत्रिकेचे पृथक्करण करून विद्यार्थ्यांना अपेक्षित प्रश्न आणि नंतर अचूक उत्तरे सांगू शकते. त्यामुळे विद्यार्थी परीक्षेसाठी अधिक चांगल्या प्रकारे सज्ज होतील तसेच आपल्या उत्तरांचे पृथक्करण करून कुठे जास्त अभ्यासाची गरज आहे हे समजून घेतील. पारंपरिक गाईड्सना याचा मोठा धोका आहे. कसा अभ्यास करून जास्त गुण मिळवता येऊ शकतील याचे मार्गदर्शन अजेंटिक एआय विद्यार्थी आणि शिक्षकांना देईल. याचा मोठा फायदा ग्रामीण आणि निमशहरी भागातील शैक्षणिक संस्थांना होईल कारण अशा ठिकाणी चांगले शिक्षक मिळणे अवघड असते.

अजेंटिक एआय एजंट या नव्या पिढीतील स्वायत्त प्रोग्राममुळे कार्यप्रणाली अधिक स्मार्ट, वेगवान आणि व्यक्तिगत बनली आहे. अजेंटिक एआय एजंट वैयक्तिक डिजिटल शिक्षणात विद्यार्थ्यांसाठी हवे तसे मार्गदर्शन करून देतील. हे एजंट विद्यार्थ्यांची क्षमता आणि कमतरता ओळखून शिकण्याचा रास्त मार्ग निवडतात. शिक्षकांना वेळ वाचवण्यासाठी हे एजंट्स परीक्षा तपासणी, उपस्थिती मापन, गृहपाठ मदत व निकालवर्धन असे फायदे देतात. विज्ञान व अभियांत्रिकी अभ्यासक्रमामध्ये व्हर्च्युअल लॅब्ज, इमर्सिव्ह लर्निंग अनुभव देत ग्रामीण आणि निमशहरी संस्थांसाठी शिक्षणाची दारे खुली करतात. साधनसंपत्तींची कमतरता असलेल्या शाळा तसेच महाविद्यालयांसाठी हे फारच उपयुक्त आहे. शिकण्याचे नवे क्षितिज खुले होत असताना डेटाची गोपनीयता आणि तंत्रज्ञानाचा समावेश ग्रामीण भागात वाढवण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. अजेंटिक एआय टूल्स केवळ प्रयोगशाळांपुरती मर्यादित नाहीत. अशी टूल्स आता व्यवसाय आणि शिक्षणक्षेत्रात प्रत्यक्षात वापरली जात आहेत एकंदरीत, अजेंटिक एआयमुळे भारतातील उद्योग आणि शिक्षणक्षेत्रात मोठ्या संधी निर्माण होतील. उत्पादकतेत वाढ, नवीन नोकऱ्यांची निर्मिती आणि शिक्षणात क्रांती घडवून आणण्याची क्षमता यात आहे. मात्र, यासोबतच कौशल्य अंतर, डेटा गोपनीयता आणि नैतिक वापर यांसारख्या आव्हानांवर मात करणे आवश्यक आहे; जेणेकरून भारताला या तंत्रज्ञानाचा जास्तीत जास्त फायदा घेता येईल. भविष्यात, हे एजंट्स अधिक चतुर आणि संवादात्मक बनतील. येत्या काही वर्षांमध्ये हे एजंट्स उद्योगांची कार्यक्षमता वाढवून आणि मानवी कामाचे स्वरूप बदलवतील.

'एआय २०३० इंडिया' उपक्रम ही सरकार-समर्थित योजना आहे. भारताला २०३० पर्यंत कृत्रिम बुद्धिमत्तेमध्ये जागतिक नेता म्हणून स्थान देणे हा याचा उद्देश आहे. नैतिक अंमलबजावणी आणि सामाजिक प्रभावावर जोरदार भर देऊन भारतीय अर्थव्यवस्थेच्या विविध क्षेत्रांमध्ये सर्वसमावेशक आणि जबाबदार एआय अवलंब करण्यावर लक्ष केंद्रित करणे, हे या तंत्राचे ध्येय मानले गेले आहे. इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालय, प्रमुख वैज्ञानिक सल्लागार कार्यालय, नॅसकॉम आणि वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमचे सेंटर फॉर द फोर्थ इंडस्ट्रियल रिव्होल्यूशन इंडिया याचे नेतृत्व करत आहे. आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) हे एकविसाव्या शतकातील सर्वांत प्रभावी तंत्रज्ञान आहे आणि भारताने याचा उपयोग करून सामाजिक आणि आर्थिक विकासाला गती देण्याचा निर्धार केला आहे. 'एआय फॉर इंडिया २०३०' धोरण भारताच्या डिजिटल परिवर्तनाच्या दिशेने एक महत्त्वाचा टप्पा आहे.

(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

## वेध

### नंदकिशोर काथवटे

# बालसुरक्षेची घंटा

गडचिरोली जिल्ह्याच्या अहेरी तालुक्यातील नागेपल्ली येथील आशीर्वाद वसतिगृहवर जिल्हा प्रशासनाने केलेली ऐतिहासिक कारवाई म्हणजे केवळ एक प्रशासकीय कृती नव्हे, तर बालसुरक्षेच्या दिशेने उचललेले धाडसी आणि संवेदनशील पाऊल आहे. तब्बल ११ वर्षांपासून विना परवानगी सुरू असलेले हे वसतिगृह म्हणजे मुलांच्या भवितव्याशी झालेला थेट खेळच म्हणावा लागेल. बाल न्याय अधिनियम २०१५ आणि २०२१ च्या तरतुदींचे उल्लंघन करून अशा संस्थेचा कारभार सुरू ठेवणे, हा फक्त कायद्याचा भंग नाही, तर समाजाच्या नैतिक जबाबदारीलाही एक मोठा धक्का आहे. ही कारवाई जिल्हाधिकारी अविश्यांत पंडा यांच्या मार्गदर्शनाखाली आणि उपविभागीय अधिकारी कुशल जैन, तहसीलदार बालाजी सोमवंशी तसेच महिला व बाल विकास विभागाच्या संयुक्त पथकाने पार पाडली. या कारवाईत ९१ निराधार बालकांची सुटका करून त्यांना शासकीय संरक्षणाखाली सुरक्षित स्थळी हलविण्यात आले. ही कारवाई केवळ एका संस्थेपुरती मर्यादित नसून जिल्ह्यात किंवा राज्यभरातील अशा सर्व विनापरवाना संस्थांसाठी तो एक गंभीर इशारा आहे.

मुलं ही कोणत्याही समाजाची पायाभूत संपत्ती असतात. त्यांच्या सुरक्षिततेची आणि संगोपनाची जबाबदारी केवळ पालकांची किंवा सरकारची नसून संपूर्ण समाजाची आहे. नागेपल्लीसारख्या गावात, प्रशासनाच्या नावाखाली तब्बल ११ वर्षांपासून अनधिकृतपणे वसतिगृह चालवले जात होते, हे अत्यंत चिंताजनक आहे. या संस्थेत मुलं आणि मुली दोघांनाही एकत्र ठेवण्यात आले होते, हीच बाब अधिक धोकादायक ठरते. कारण अशा ठिकाणी लैंगिक, मानसिक आणि शारीरिक शोषणाची भीती नेहमीच निर्माण होते. यामुळे अशा संस्थांच्या नियमित तपासण्या आणि नोंदणी प्रक्रियेवर प्रशासनाने अधिक काटेकोर लक्ष ठेवणे आवश्यक आहे. या वसतिगृहात ख्रिश्चन धर्मप्रचाराशी संबंधित साहित्य आढळल्याचेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे. मुलांच्या संगोपनाच्या नावाखाली कोणत्याही धर्माचा प्रसार करणे हे कायद्याने गुन्हा आहे. धर्मप्रसाराच्या आडून गरीब व निराधार मुलांना मानसिकदृष्ट्या प्रभावित करण्याचा प्रयत्न करणे म्हणजे त्यांच्या निरागसतेचा गैरफायदा घेणे होय. शिक्षण, अन्न व निवारा या मूलभूत गरजांच्या आडून जर धर्मांतराचे बीज पेरले जात असेल, तर तो समाजासाठी एक गंभीर धोका आहे. प्रशासनाने या प्रकरणात दाखवलेली तत्परता कौतुकास्पद आहे; परंतु प्रश्न असा उभा राहतो की, ११ वर्षे हा प्रकार सुरू असताना कोणाच्या नजरेस का आला नाही? तालुका प्रशासन, स्थानिक पोलिस, ग्रामपंचायत, शाळा आणि समाजातील नागरिक सगळेच कुठे ना कुठे बेफिकीर होते का? बालकांचे रक्षण हा केवळ कागदोपत्री कार्यक्रम राहिला आहे का, असा प्रश्न यानिमित्ताने विचारायलाच हवा. एखाद्या जिल्ह्यात किंवा तालुक्यात जर कोणतेही बालगृह, वसतिगृह किंवा अनाथालय चालवले जात असेल, तर त्या संस्थेची नोंदणी असणे बंधनकारक आहे. त्या संस्थांवर नियमित तपासणी होणे, आर्थिक लेखापरीक्षण पारदर्शक असणे तसेच बालकांच्या आरोग्य, शिक्षण व मानसिक स्थितीवर सातत्याने लक्ष ठेवले जाणे आवश्यक आहे; प्रत्यक्षात हे होत नाही. एकदा संस्था सुरू झाली की, तिच्यावर कोणी लक्ष देत नाही.

आज प्रशासनाने धाडस दाखवून ही कारवाई केली, पण उद्या अशाच स्वरूपाचे अजून किती आशीर्वाद होस्टेल आपल्याकडे कार्यरत आहेत, हे तपासणेही तितकेच महत्त्वाचे ठरते. बालकांवर होणाऱ्या अत्याचारांचे अनेक प्रकार समाजात दिसतात. शारीरिक छळ, कामाला लावणे, शिक्षणापासून वंचित ठेवणे, लैंगिक अत्याचार, मानसिक त्रास... हे सगळं थांबवायचं असेल तर प्रणाली मजबूत करावी लागेल. अनेकदा अशा संस्थांमधून बालकांना धार्मिक शिक्षण, आर्थिक मदत किंवा शिक्षणाच्या नावाखाली वेगवेगळ्या ठिकाणी हलवले जाते आणि त्यानंतर त्यांचा मागमूसही लागत नाही. हे केवळ गडचिरोली किंवा अहेरीपुरते मर्यादित नाही, तर संपूर्ण महाराष्ट्रातील ग्रामीण भागात अशा संस्था अस्तित्वात आहेत. या संस्थांच्या मागे कोणते नेटवर्क आहे, कोण निधी पुरवतो आणि या संस्थांमध्ये बालकांची निवड कशी केली जाते, यावर स्वतंत्र चौकशी समिती नेमणे अत्यावश्यक आहे. गडचिरोली जिल्ह्यात झालेल्या या कारवाईने नक्कीच संपूर्ण राज्यातील अनधिकृत संस्थांना इशारा मिळाला आहे. मात्र या इशाऱ्याचे रूपांतर कायमस्वरूपी सुधारण्यात होण्यासाठी सातत्याची आवश्यकता आहे. आज गरज आहे ती 'बाल संरक्षण संस्कृती' रुजविण्याची. बालकांवरील अत्याचारांविरोधात शून्य सहिष्णुतेची भूमिका घेतली पाहिजे. कारण भविष्यातील भारत या बालकांच्या हातात आहे आणि त्यांचे हात सुरक्षित ठेवणे हीच खरी देशसेवा ठरेल.

९९२२९९९५८८

## दिल्ली वार्तापत्र

### श्यामकांत जहागीरदार

# कोण होणार बिहारचा नवा मुख्यमंत्री?

बिहार विधानसभेच्या पहिल्या टप्प्यातील १२१ जागांसाठी गुरुवार, ६ नोव्हेंबरला मतदान होत आहे. दुसऱ्या टप्प्यातील १२२ जागांसाठी मंगळवार, ११ नोव्हेंबरला मतदान होणार आहे. दोन्ही टप्प्यांतील निवडणुकांची मतमोजणी शुक्रवार, १४ नोव्हेंबरला होणार आहे. त्यानंतर बिहारच्या नवा मुख्यमंत्री कोण, याचा निर्णय होणार आहे. महाआघाडीने राजद नेते तेजस्वी यादव यांचे नाव मुख्यमंत्रिपदाचे उमेदवार म्हणून पुढे केले आहे. त्यामुळे यदाकदा महाआघाडीला बहुमत मिळाले तर तेजस्वी यादव मुख्यमंत्री होणार, हे नक्की. रालोआला बहुमत मिळाले तर मुख्यमंत्री कोण होणार, याची सर्वांना उत्सुकता आहे.

विद्यमान मुख्यमंत्री जदयुचे नितीशकुमार यांच्या नेतृत्वात रालोआ विधानसभेची निवडणूक लढवत आहे. भाजपाने तसे जाहीरही केले आहे. निवडणुकीनंतर नितीशकुमारच मुख्यमंत्री होतील, असे जदयुने वारंवार स्पष्ट केले. नितीशकुमार यांच्या मुख्यमंत्रिपदाला लोजपा रामविलासचे नेते केंद्रीय मंत्री चिराग पासवान यांनीही पाठिंबा जाहीर केला आहे. २०२० ची विधानसभा निवडणूक चिराग पासवान यांनी स्वबळावर लढवली होती; स्वबळावर लढवली म्हणण्यापेक्षा जदयुच्या विरोधात लढवली होती. १३१ जागा लढवणाऱ्या लोजपाला फक्त एक जागा जिंकता आली. मात्र, त्याने अनेक मतदारसंघात जदयुचा पराभव केला. त्यामुळे जदयुचे संख्याबळ कमी झाले. ८० जागांवरून हा पक्ष ४३ जागापर्यंत खाली घसरला. त्यामुळे यावेळी चिराग पासवान यांची नितीशकुमार यांच्या मुख्यमंत्रिपदाला पाठिंबा द्यावा, याचे महत्त्व जदयु आणि नितीशकुमार यांच्यासाठी अनन्यसाधारण आहे. यावेळी लोजपा रामविलास रालोआचा घटक पक्ष म्हणून विधानसभेची निवडणूक लढवत आहे. जागावाटपात या पक्षाला २९ जागा मिळाल्या. लोजपा रालोआत आल्याचा सर्वांत मोठा फायदा जदयुला मिळणार आहे. लोजपा जदयुची मते खाणार नसल्यामुळे यावेळी जदयुचे जास्त म्हणजे मागील विधानसभा निवडणुकीत जिंकले त्यापेक्षा जास्त उमेदवार निवडून येण्याची शक्यता नाकारता येत नाही.

रालोआ ही निवडणूक मुख्यमंत्री नितीशकुमार यांच्या नेतृत्वात लढवत आहे. त्यामुळे मुख्यमंत्रिपदाची खुर्ची रिकामी नाही, असे भाजपा नेते वारंवार सांगत आहे. या निवडणुकीत रालोआला बहुमत मिळणार, याबद्दल कोणाच्याच मनात शंका नसली, तरी मुख्यमंत्री कोण होणार, याबद्दल मात्र उत्सुकता आहे. नितीशकुमार पुन्हा मुख्यमंत्री होण्याची शक्यता सर्वांत जास्त असली, तरी राजकारणात कधी काय होईल, हे कोणीच सांगू शकत नाही.



देशात बिहार हे एकमेव असे राज्य म्हणावे लागेल, ज्यात जवळपास २० वर्षांपासून सत्तेवर असला तरी भाजपाला मुख्यमंत्रिपद कधी मिळाले नाही. २० वर्षांपासून भाजपाला उपमुख्यमंत्रिपदावरच समाधान मानावे लागते. सुरुवातीला भाजपाला एक उपमुख्यमंत्री मिळत होता. २०२० च्या विधानसभा निवडणुकीनंतर दोन उपमुख्यमंत्री मिळत आहेत. पण दोन उपमुख्यमंत्री मिळून एक मुख्यमंत्री होत नाही. मुख्यमंत्री हा मुख्यमंत्रीच असतो. त्यामुळे यावेळी तरी किमान आपला मुख्यमंत्री व्हावा, असे त्या राज्यातील भाजपाच्या नेत्यांना आणि कार्यकर्त्यांना वाटणे स्वाभाविक आहे. भाजपाला मुख्यमंत्रिपदाचा निर्णय घाईगर्दीत घेता येणार नाही. राजकारणातील सर्व शक्यता पडताळूनच भाजपाला बिहारच्या मुख्यमंत्रिपदाचा निर्णय घ्यावा लागेल. कारण भाजपाच्या या निर्णयाचा परिणाम फक्त बिहारमध्येच नाही तर राष्ट्रीय राजकारणावरही होण्याची शक्यता आहे. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपाला स्वबळावर स्पष्ट आणि निर्विवाद बहुमत मिळाले नाही. भाजपाचा विजयरथ २४० जागांवर अडला. भाजपाला बहुमतासाठी ३२ जागा कमी पडल्या. त्यामुळे केंद्रातील मोदी सरकारला चंद्राबाबू नायडू यांच्या तेलगू देसमचा आणि नितीशकुमार यांचा जनता दल संयुक्तचा पाठिंबा घ्यावा लागला. तेलगू देसमचे लोकसभेत १६ आणि जदयुचे १२ खासदार आहेत. केंद्रातील मोदी सरकार नितीशकुमार यांच्या जदयुवर बऱ्यापैकी अवलंबून आहे. त्यामुळे नितीशकुमार यांना दुखावणे भाजपाला तसे परवडणारे नाही.

गेल्या काही वर्षांत नितीशकुमार यांची प्रकृती ठीक राहात नाही, चालताना आणि बोलताना त्यांचा तोल जातो, स्मरणशक्तीही पहिलेसारखी राहिली नाही. तरीसुद्धा नितीशकुमार यांना मुख्यमंत्रिपदाचा मोह सुटत नाही. नितीशकुमार यांचा मुख्यमंत्रिपदाचा कार्यकाळ देशात सर्वांत जास्त नसला, तरी देशात सर्वांत जास्त वेळा मुख्यमंत्रिपदाची शपथ घेणारे म्हणून त्यांचे नाव नोंदले गेले आहे. यावेळी नितीशकुमार मुख्यमंत्री झाले तर दहाव्यांदा ते मुख्यमंत्रिपदाची शपथ घेणार आहे. बिहार विधानसभा निवडणुकीत कोणत्या पक्षाला किती जागा मिळतील, त्यावरही राज्यातील पुढील राजकीय समीकरणे अवलंबून राहणार आहेत. भाजपा राज्यात सर्वांत जास्त जागा जिंकणारा पक्ष राहील, दुसऱ्या क्रमांकासाठी जदयु आणि राजदमध्ये टक्कर होईल. राजद दुसऱ्या क्रमांकावर आला तर जदयु तिसऱ्या क्रमांकावर जाईल आणि जदयु दुसऱ्या क्रमांकावर आला, तर राजद तिसऱ्या क्रमांकावर जाईल. काँग्रेस चौथ्या स्थानावर राहील. म्हणजे भाजपा आणि काँग्रेस यांचे बिहारच्या राजकारणातील स्थान पक्के आहे.

जदयु आणि राजद यांच्या आमदारांची बेरीज १०० च्या वर जात असेल तर भाजपाला आपल्या व्यूहरचनेचा फेरविचार करावा लागेल. कारण भाजपाने नितीशकुमार यांना डावलून आपला मुख्यमंत्री करण्याचा निर्णय घेतला तर नितीशकुमार भाजपाला धक्का देऊ शकतात. नितीशकुमार भाजपाला धक्का देतीलच असे नाही, पण धक्का देण्याची शक्यता नाकारता येत नाही. कारण याच्या आधी दोन वेळा नितीशकुमार भाजपाची साथ सोडून राजदसोबत गेले होते आणि त्यांनी सरकारही स्थापन केले होते. नितीशकुमार कधी कोणती भूमिका घेतील, हे सांगता येत नाही. राजकारणात कोणीच कोणाचा कायमचा मित्र नसतो, तसाच शत्रूही नसतो. नितीशकुमार ज्यावेळी भाजपाचे मित्र होतात, तेव्हा राजदला शत्रू समजतात आणि राजदचे मित्र होतात, तेव्हा भाजपाला शत्रू समजतात. नितीशकुमार यांच्या शत्रू आणि मित्राच्या भूमिकेतील बदल अतिशय जलदगतीने होत असतो. नितीशकुमार यांचे राजकारण अनाकलनीय म्हणावे लागेल.

२०२० च्या विधानसभा निवडणुकीत भाजपापेक्षा जदयुच्या जागा कमी होत्या, तरीसुद्धा भाजपाने मुख्यमंत्रिपद नितीशकुमार यांना दिले होते. यावेळीही त्याच इतिहासाची पुनरावृत्ती होण्याची शक्यता नाकारत येत नाही. जदयुला भाजपापेक्षा जास्त जागा मिळाल्या तर मुख्यमंत्रिपद नितीशकुमार यांच्याकडे जाईल आणि भाजपापेक्षा जदयुच्या जागा कमी असल्या, तरी नितीशकुमारच मुख्यमंत्री होतील. विधानसभा निवडणुकीनंतर वर्षभर तरी नितीशकुमार रालोआचे मुख्यमंत्री असतील. नितीशकुमार यांचा जन्म मुख्यमंत्रिपदासाठीच झाला, असे म्हणावे लागेल. कधी नितीशकुमार मुख्यमंत्रिपदाच्या मागे धावतात तर कधी मुख्यमंत्रिपद नितीशकुमार यांच्या मागे धावत येते.

९८८१७१७८१७

## सत्याजवळ सदैव परमेश्वराचा वास

सत्य मार्ग, सत्य बोली, सत्य वर्तन, सत्चारित्र्य, सत्य वचन, सत्य सत्संग या सर्व बाबी विधायक गुणात्मक असून मानवी जीवनात अत्यंत महत्त्वपूर्ण आहेत. सत्याचा मार्ग म्हणजे धर्माचा मार्ग, सत्य म्हणजेच धर्म होय. सत्याजवळ सदैव परमेश्वराचा वास असतो हे त्रिकालाबाधित सत्य आहे. असत्य, अनीती, अविचार, कुसंगती हे मार्ग व्यक्तीच्या जीवनात अत्यंत घातक व मारक असतात.

या मार्गावर चालणारी व्यक्ती अशा वर्तनाने काही काळ सुखावेल पण अनंत काळासाठी दुःखी व असमाधानी राहते हे विसरता कामा नये. असत्य मार्ग सदैव वाईटच असतो. या मार्गाचा अवलंब केल्यास अनंत काळापर्यंत दुःखद यातना भोगाव्या लागतात. यामुळे माणूस दुःखाच्या खाईत लोटला जातो. सत्य मार्ग स्वीकारणाऱ्याचा कैवारी निश्चितपणे ईश्वर असतो. सत्याचे आचरण केल्याने माणसाचे हितच होय, तर असत्य मार्गाचे फळ दुःखदायक व पीडादायक होय.

**धोंडीरामसिंह राजपूत**/९४२१३१२२४४

## वाचक पत्रे

### देव-देवतांची दिवाळी

कार्तिक शुक्ल एकादशी ते पौर्णिमा असे पाच दिवस ही दिवाळी असते. कार्तिक शुद्ध एकादशी म्हणजे प्रबोधिनी एकादशी. या दिवशी श्री विष्णू झोपेतून जागे होतात आणि चातुर्मास संपतो. या दिवशी बळीच्या राज्यातून श्रीविष्णू आपल्या मूळ स्थानी परत आले अशीही मान्यता आहे. या दिवसात बाळकृष्ण आणि तुळशीचा विवाह करतात. त्यानंतर लग्नाचे मुहूर्त निघायला लागतात. या महिन्यात तुळशीची लागवड करतात.



कार्तिक पौर्णिमेला दिव्यांचा उत्सव साजरा केला जातो. देव दीपावलीच्या दिवशी वाराणसीत गंगेच्या तीरावर लाखो दिवे प्रज्वलित केले जातात. पुण्य संचय करण्यासाठी या दिवशी गंगा नदीत स्नान करतात आणि संध्याकाळी नदीत दीपदान करतात. तेव्हा जणू सर्व देवता आकाशातून पृथ्वीवर अवतरल्या आहेत असा भास निर्माण होतो. या दिवशी वाराणसीचे सर्व घाट दिव्यांनी उजळलेले दिसतात, हे रम्य दृश्य पाहण्यासाठी दरवर्षी देश-विदेशातून लोक वाराणसीला येतात.

देव दीपावळीला त्रिपुरारी पौर्णिमा असेही म्हणतात. कारण प्राचीन काळी भगवान शिवाने या तिथीला त्रिपुरासुर नावाच्या राक्षसाचा वध केला होता. त्याचे प्रतीक म्हणून त्रिपूर जाळून काकडा लावून आरती करतात. देव दीपावलीचा संबंध केवळ भगवान शिव यांच्यासोबत नसून भगवान विष्णूशीही आहे. असे मानले जाते की कार्तिक पौर्णिमेला भगवान विष्णूने मत्स्यावतार घेतला होता. या दिवशी भगवान कृष्णाने दिव्य रासलीला केली होती अशी मान्यता आहे. या शुभ दिवशी रासलीला कार्यक्रम आयोजित केले जातात. या उत्सवासाठी पुरीचे जगन्नाथ मंदिर, आणि इतर सर्व राधाकृष्ण मंदिरांमध्ये, संपूर्ण कार्तिक महिन्यात पवित्र व्रत पाळले जाते. भगवंताची निस्सीम भक्ती करून त्याच्याशी एकरूप होता येत, असे शिकवणारी रासलीला आहे.

**पल्लवी देशपांडे**/दुर्ग, छत्तीसगड

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल अॅड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१
या व्हॉट्स अॅप क्रमांकावर पाठवावा.

## आजचे संघगीत-३४

गुरुवार, ६ नोव्हेंबर २०२५

### माघार न जन्मात, सारखे होउ देत आघात

माघार न जन्मात; सारखे होउ देत आघात ॥धृ.॥

देशाचे भवितव्य दिव्य अति घडवू,
हो रात्रंदिन निश्चिति असे वसत हृदयात ॥१॥

सान ज्योत फुंकरली जाई साथ परी
वणव्याते देई भयाण झंझावात ॥२॥

ध्येयसाधना अमुचे जीवन हर्षित हृदये
स्वार्थविसर्जन पशुतेवरही मात ॥३॥

होता मारा कटु शब्दांचा तोल न जाइल
कधी मनाचा करु धैर्याने मात ॥४॥

परंपरेची ज्वलंत प्रीती घडविल या
राष्ट्राची प्रगती विकसन हे अभिजात ॥५॥

भेद बेगडी निपटू आता शुद्ध मनाने
करू एकता हीच यशाची वाट ॥६॥

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# मनपा निवडणुकांसाठी मतदार यादी सुधारित कार्यक्रम जाहीर

### १४ नोव्हेंबर रोजी प्रारूप, ६ डिसेंबरला अंतिम मतदार यादी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ नोव्हेंबर-**

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांनी सोलापूर महापालिकेसह राज्यातील २९ महानगरपालिकांच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकांच्या पार्श्वभूमिवर मतदार यादी सुधारित कार्यक्रम-२०२५ जाहीर केला आहे. राज्य निवडणूक आयोगाने १४ ऑक्टोबर २०२४ रोजी प्रसिद्ध केलेल्या मतदार यादीनुसार खालीलप्रमाणे सुधारित कार्यक्रम निश्चित करण्यात आला.

राज्य निवडणूक आयोगाने अधिसूचित केलेल्या तारखेस विधानसभेच्या मतदार यादी वरून महानगपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूक करीता तयार केलेली प्रारूप मतदार यादी हरकती व सूचना मागविण्याकरीता प्रसिद्ध करण्यासाठी दि.१४ नोव्हेंबर २०२५ , प्रारूप मतदार यादीवर हरकती व सूचना दाखल करण्याचा अंतिम दि. २२ नोव्हेंबर २०२५, प्रारूप मतदार याडीवरून दाखल हरकतीवर निर्णय घेऊन प्रभाग निहाय अंतिम मतदार याद्या आधिप्रामाणित करून प्रसिद्ध करणे ६ डिसेंबर २०२५, मतदान केंद्राच्या ठिकाणी यादी प्रसिद्ध करणे ८ डिसेंबर २०२५, मतदान केंद्रनिहाय मतदार यादी प्रसिद्ध करणे - १२ डिसेंबर २०२५ याप्रमाणे राज्य निवडणूक आयोगाचे सचिव सुरेश काकाणी यांनी सर्व महानगरपालिका आयुक्तांना या कार्यक्रमानुसार कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत.

# कार्तिक पौर्णिमेनिमित्त शिवछत्रपतींच्या चरणी दीपोत्सव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ नोव्हेंबर-**

शिवभक्तांची लगबग, मिणमिणत्या शेकडो पणत्या अन छत्रपती श्री शिवरायांचा जयघोष अशा वातावरणात बुधवारी दीपोत्सव झाला. निमित्त होते कार्तिकी पौर्णिमा म्हणजेच त्रिपुरारी पौर्णिमेनिमित्त श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान सोलापूर विभागातर्फे आयोजिलेल्या दीपोत्सवाचे.



**सोलापूर : कार्तिक पौर्णिमेनिमित्त छत्रपती श्री शिवाजी महाराज उद्यानात श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानतर्फे बुधवारी दीपोत्सव करण्यात आला.**

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती श्री शिवाजी महाराज यांनी तिरुमलाई येथील शिव मंदिराचा कार्तिक पौर्णिमेला जीर्णोद्धार केला. तसेच दीपोत्सवही केला. त्या स्मृती निमित्त श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानतर्फे दरवर्षीप्रमाणे बुधवारी रंगभवन येथील छत्रपती श्री शिवाजी महाराज उद्यानात हा दीपोत्सव करण्यात आला. यावेळी संपूर्ण उद्यानात विविध ठिकाणी शेकडो पणत्या शिवभक्तांनी प्रज्वलित केल्या. प्रेरणामंत्राने कार्यक्रमाची सुरुवात झाली.

प्रारंभी हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती श्री शिवाजी महाराजांच्या मूर्तीचे पूजन करण्यात आले. त्यानंतर छत्रपती श्री शिवाजी महाराजांच्या मूर्तीच्या परिसरात शेकडो पणत्या प्रज्वलित करून अत्यंत उत्साहात दीपोत्सव साजरा झाला. एकाचवेळी शेकडो पणत्या प्रज्वलित केल्यामुळे छत्रपती श्री शिवाजी महाराजांची मूर्ती आणि परिसर या दिव्यांच्या प्रकाशात उजळून निघाला. यावेळी कार्यक्रमाच्यास्थळी आकर्षक रांगोळी रेखाटली होती. ध्येयमंत्राने कार्यक्रमाची सांगता झाली. यावेळी श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान सोलापूर विभागाचे धारकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


**सोलापूर : शहरातील हिंगुलांबिका देवी मंदिरात भाविकांनी कार्तिक पौर्णिमेनिमित्त दीपोत्सव साजरा केला.**


## MANODAYA NEUROPSYCHIATRIC CENTRE

Neuropsychiatry Hospital and De-Addiction Centre

मनोविकार तज्ज्ञ डॉ.दिलीप बुरटे व डॉ.निहार बुरटे यांचे दि. ०४/११/२०२२ या आधीचे बाह्यरुग्ण विभाग (ओ.पी.डी.) रेकॉर्ड नष्ट करण्यात येणार आहे.

यासंबंधी कोणास माहिति हवी असेल तर संबंधितांनी योग्य त्या कागदपत्राबरोबर खालील ठिकाणी मंगळवार दि. १८/११/२०२५ पर्यंत संपर्क साधावा.

**मनोदय न्यूरोसायॅकट्रिक सेंटर**
७११४/२/३, घर नं. ९३६ बी,
उत्तर सदर बझार, रिमांड होम जवळ, सोलापूर, ४१३००३
**फोन नं. ०२१७-२३१४४३३ मो. ७०८३०६९४९६**

**Consultant Psychiatrists**

Dr.Dilip Burte and Dr.Nihar Burte have decided to destroy OPD (Case-Papers) Record dated 04/11/2022 and before.
If Concerned individuals want any information they have to contact with necesary documents before Tuesday 18/11/2025 on following address
**Manodaya Neuropsychiatric Centre**
7114/2/3 House No.936 B, North Sadar Bazar, Near Remand Home, Solapur 413003
**Phone : 0217-2314433 Mo7083069496**


# टीजेएसबी बँकेच्या मोठागाव आणि ठाकुर्लीत दोन नवीन शाखा कार्यरत

### बँकेच्या शाखांची संख्या झाली १६२

**तभा वृत्तसेवा,**
**ठाणे, दि. ५ नोव्हेंबर-**

टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड या देशातील नागरी सहकारी क्षेत्रातील अग्रगण्य बहुराज्यीय बँकेने आपल्या सातत्यपूर्ण प्रगतीच्या मार्गावर आणखी एक पाऊल टाकले आहे. टीजेएसबी बँकेने सोमवारी तीन नोव्हेंबर रोजी डोंबिवली (पश्चिम) येथील मोठागाव आणि ठाकुर्ली येथे दोन नवीन शाखांचे उदघाटन केले. या दोन नवीन शाखांमुळे टीजेएसबी बँकेच्या शाखांची संख्या आता १६२ झाली आहे.

मोठागाव शाखा डोंबिवली पश्चिमेतील वाढती निवासी संख्या लक्षात घेऊन सुरु करण्यात आली आहे. स्थानिक रहिवाश्यांची गरज लक्षात घेऊन शाखा कार्यरत झाली आहे. या परिसरात नजीकच्या काळात वाढणाऱ्या दळणवळणाचा अंदाज घेऊन स्थानिकांना बँकिंग व्यवहार सुलभपणे करता यावे यासाठी सदर शाखेची स्थापना करण्यात आली आहे.

मोठागाव येथील बँकेच्या नव्या शाखेमुळे परिसरातील रहिवाशांना आधुनिक बँकिंग सेवांचा लाभ घेता येईल. डोंबिवली पश्चिम भागातील टीजेएसबी बँकेचा प्रभाव अधिक विस्तारण्यास मदत होईल. तसेच, मध्य रेल्वे मार्गावरील ऐतिहासिक रेल्वे वसाहतीच्या वारशासाठी ओळखले जाणारे ठाकुर्लीची ओळख आता व्यावसायिक आणि निवासी अशी होत आहे. येथील बँकिंग गरज लक्षात घेऊन शाखा सुरु केली आहे. या दोन नवीन शाखांमुळे टीजेएसबी बँक ठाणे जिल्ह्यासह एमएमआरडीए क्षेत्रात अधिक सक्षम झाली आहे. टीजेएसबी सहकारी बँकेच्या शाखांचे जाळे महाराष्ट्र, गोवा, गुजरात, कर्नाटक आणि मध्य प्रदेश या राज्यांमध्ये १६२ शाखांपर्यंत विस्तारलेले आहे.

उदघाटनप्रसंगी बँकेचे संचालक भाऊसाहेब गायकवाड, डोंबिवलीचे येथील उज्वल चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष किरण पिंगळे, बँकेचे संचालक पवनकुमार माहेश्वरी, शिवाजीराव जोंधळे शैक्षणिक ट्रस्टचे अध्यक्ष देवेंद्र शिवाजीराव जोंधळे, कडोंमपाचे मोठागाव प्रभागाचे नगरसेवक जयेश म्हात्रे, शिवसेना कल्याण जिल्हा प्रमुख आणि नगरसेवक दीपेश पुंडलिक, शिवाजीराव जोंधळे शैक्षणिक ट्रस्टच्या संस्थापक आणि अध्यक्ष वैशालीताई शिवाजीराव जोंधळे, बँकेचे अध्यक्ष शरद गांगल, बँकेचे उपाध्यक्ष वैभव सिंघवी, कल्याण ग्रामीण मतदार संघाचे आमदार राजेश मोरे, बँकेचे व्यवस्थापकीय संचालक, मुख्य कार्यकारी अधिकारी निखिल आरेकर आदी उपस्थित होते.



### सहकार चळवळ अधिक बळकट होण्यास मदत

बँकेचे अध्यक्ष शरद गांगल म्हणाले, टीजेएसबी बँकेचे ध्येय अधिकाधिक ग्राहकांपर्यंत पोहोचणे आणि आमच्या सेवामध्ये सतत सुधारणा करणे हे आहे. मोठागाव आणि ठाकुर्ली शाखांमुळे सहकार चळवळ अधिक बळकट होण्यास मदत होईल. ग्राहकांसाठी बँकिंग सुविधा त्यांच्या थेट दारापर्यंत नेण्याचा हा प्रयत्न आहे.

### ग्राहकांच्या आर्थिक सबलीकरणाचे द्योतक

बँकेचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी निखिल आरेकर म्हणाले, या नवीन शाखा म्हणजे केवळ भौतिक विस्तार नाही. बँकेच्या अत्याधुनिक सेवांच्या आधारे ग्राहकांच्या आर्थिक सबलीकरणाचे द्योतक आहे. टीजेएसबी बँकेकडे कॉर्पोरेट, रिटेल बँकिंग, फॉरेक्स सेवा तसेच डिजिटल बँकिंग असा विविध बँकिंग सुविधा एकत्र देण्याची व्यवस्था आहे. यातून ग्राहकांच्या निरनिराळ्या आर्थिक गरजांची पूर्तता करून, त्यांच्या प्रगतीत भागीदार म्हणून बँकेचा सहभाग राहतो.


## मध्य रेल्वे

**सोलापुर मंडळ**

**ई-टेंडर सूचना**

डीआरएम (एस अँड टी) कार्यालय, मध्य रेल्वे, सोलापूर राष्ट्रपतींनी रेल्वेच्या ई-खरेदी संकेतस्थळावर www.ireps.gov.in वर सक्षम, नामांकित कंपन्या/कंत्राटदारांकडून खालील कामांसाठी ऑनलाईन ई-निविदा आमंत्रित केल्या आहेत. कामाचे नाव त्याच्या स्थानासहः सोलापूर विभागातील अक्कलकोट रोड आणि मलठन स्थानकांवर लांब-हॉल लूप मार्गांची तरतूद. कामाचा अंदाजे खर्चः ११,१८,४२,३४३.१०. निविदा अर्जाची किंमतः शून्य. बयाणा रक्कमः ७,०९,२००/-. कामाचा कालावधीः १२ महिने निविदा भरण्याची तारीख आणि वेळः २६/११/२०२५ १५.३० तासांनंतर. तपशील IREPS च्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. शुद्धिपत्र/काही सुधारणा असल्यास त्या केवळ वरील ई-खरेदी संकेतस्थळावर अपलोड केल्या जातील. केवळ ऑनलाईन निविदा स्वीकारल्या जातील. मॅन्युअल/पोस्टल/ई-मेल, फॅक्सद्वारे निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत. बोलीदारांना विनंती आहे की त्यांनी कंपनीच्या नावाने तृतीय श्रेणी डिजिटल स्वाक्षरी प्रमाणपत्र प्राप्त करावे आणि www.ireps.gov.in वर नोंदणी करावी. निविदा सादर करण्याच्या अंतिम तारखेपूर्वी निविदा कागदपत्रात दर्शविल्याप्रमाणे नियुक्त केलेल्या अधिकाऱ्याला प्रत्यक्ष येऊन बयाणा रक्कम नेटबँकींग किंवा पेमेंट गेटवेद्वारे किंवा बँक गॅरंटीच्या स्वरुपात स्विकारली जाईल. (i.e. निविदा सादर करण्याची शेवटची तारीख वगळून) अधिक माहितीसाठी www.ireps.gov.in ला भेट द्या.

**DRM(S&T)** सोलापूर
ई-निविदा सूचना क्रमांकः **SUR-N-T-2025-26-23** तारीखः **04/11/2025**

**अनाधिकृत रुप से रेल लाइन को पार करना दंडनीय अपराध है**

Sai/SUR/61



## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

सोलापूर जिल्ह्यातील विशेषतः इतरत्र सर्व जिल्ह्यातील व संपूर्ण महाराष्ट्रातील गावे व तालुके मधील तमाम जनतेस नोटीसीने कळविण्यात येते की डि व सब सोलापूर ता. बार्शीपैकी गाव वैराग येथील बागायत जमीन जिल्हा परिषद, सोलापूर पंचायत समिती बार्शी मे. दुय्यम निबंधक साहेब, वैराग यांचे हद्दीतील ग्रामपंचायत वैराग येथील बागायत जमिनीचे वर्णन पुढीलप्रमाणेः- गट नं. ३०६, क्षेत्र ० हे. ०.६९ आर याचा आकार ०.५६ पैसे असून या जमिनीपैकी आमचे मालकीचे दक्षिणेकडील बाजूची संपूर्ण बागायत शेत जमिन याचे क्षेत्र व चतुःसिमा सदरीलप्रमाणे नमूद असेः- गट नं, ३०६ क्षेत्र ० हे ०.४६ आर त्याचा आकार ०,३८ पैसे इतका असून त्याची चतुःसिमा पूर्वेसः- खेंदाड याची जमिन, दक्षिणेसः- बागवान यांची जमिन, पश्चिमेसः- जुना पंढरपूर रस्ता, व उत्तरेसः- लिहून घेणार मूळ मालक यांची जमिन असे. अशा वर्णनाची वर नमूद चतुःसिमेतील ही शेतजमिन इलियास रजाक डोंगरे, रा. परांडा ता. परांडा जि. धाराशिव यांच्या स्वतंत्र मालकीची व कब्जे वहिवाटीची असून सदर शेत जमीन हि त्यांनी आमचे अशील श्री अंबादास सायप्पा बनसोडे यांना कायम स्वरूपी खुशखरेदीखताने देण्याचे ठरवून त्यांच्याकडून इसारा रक्कम स्वीकारून इसारा पावती करार पत्राने लिहून देऊन कायम खुशखरेदी देण्यात व्यवहार ठरविलेला आहे. तो एकमेकावर बंधनकारक आहे.

सदर शेतजमीन ही निर्वेध व निजोखमी असल्याची व ती त्यांनी यापूर्वी कोणासही विक्री, ट्रान्सफर गहाण, दान, टाच, लिज अथवा अन्य मार्गाने गुंतविलेली नाही अशी हमी त्यांनी आमच्या अशिलांना दिलेली आहे. तरी सदरहू शेतजमीनीवर जर कोणाची मालकी हक्क, हितसंबंध, कब्जा, गहाण, दान, लिज, लिन, इजमेंट राईट, कोर्टाची टांच, वित्त संस्थेचा बोजा अगर इतर बँकेचा बोजा वगैरे तसेच सदर प्रॉपर्टी वरती वक्फ बोर्डामध्ये हि सदरची शेत जमीन अडकलेली नाही याचीही हमी दिलेली आहे. असे काहीही असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झालेपासून १० (दहा) दिवसांचे आत हरकती व तक्रारी नमूद पत्त्यावर नोंदवाव्यात. जर वरील मुदतीत कोणाची हिला हरकत व तक्रार नाही आल्यास आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. तदनंतर कोणाचीही कसल्याही प्रकारची तक्रार अगर हरकत आमचे अशिलावर बंधनकारक असणार नाही याची नोंद तमम नागरिकांनी घ्यावी. तरी कोणाचीही फसगत होवू नये म्हणून ही जाहीर नोटीस दिली असे, ही जाहीर नोटीस दिली. दि. ०५/११/२०२५

**सही/-**
**ॲड. स्वरूपा संगप्पा कवलगी**
BA.M.S.W, LLB
रा.इ-१४९/१५० श्रीशैल नगर
सहस्रअर्जुन प्रशाला जवळ भवानी पेठ, सोलापूर
**मो.नं. ८६२५८०६६८९**



## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस खास करून, मौजे पिंपरी(पा.) बार्शी परिसरातील लोकांस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

डि सोलापूर व सब डि व ता. बार्शी पैकी मौजे पिंपरी (पा) येथील **गट नं. २०९/१** पैकी क्षेत्र क्षेत्र हे. ००-७२ आर आकार रू. ००-७९ पैसे, तसेच **गट नं. २०५/३** यापैकी क्षेत्र हे. ००-३० आर, आकार रू, ००-४८ पैसे, येणेप्रमाणे मिळकत आतील सर्व तदंगभुत वस्तुसह व हक्कासह वर वर्णन केलेली मिळकत ही श्री. प्रफुल्ल मल्लिकार्जुन गावसाने यांची स्वकष्टार्जित मालकीची असून त्यांनी त्यांच्या कायदेशीर अडचणीपोटी विक्रीस काढलेली आहे. सदर मिळकतीचा आमच्या अशिलासोबत खरेदीचा व्यवहार ठरलेला आहे. व आमचे अशिलाने सदर व्यवहारापोटी काही रक्कम इसारापोटी श्री. प्रफुल्ल मल्लिकार्जुन गावसाने यांना दिलेली आहे. व वर नमूद मिळकत आमचे अशिल रजि. खरेदी करणार आहे.

सबब वर वर्णन केलेल्या मिळकतीच्या संदर्भाने जर कोणाची काही हितसंबंध निर्माण झालेले असल्यास किंवा कोणाचे काही हितसंबंध होणार असल्यास तसेच वर वर्णन केलेल्या मिळकतीच्या संदर्भाने जर कोणी इसारपावती, साठेखत, बक्षीसपत्र, मृत्युपत्र, गहाणखत, कर्ज, बोजा, पोटगी इत्यादी स्वरूपाचा त्रयस्थाय हस्तांतरण होईल अशा प्रकारचा दस्त झालेला असल्यास संबंधीत व्यक्तिने ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून खालील पत्त्यावर आपली लेखी तक्रार ७ दिवसाच्या आत नोंदवावी जर कोणाची काही हरकत आली नाही याची खात्री झालेनंतर आमचे अशिल वर नमूद मिळकतीचे खरेदीखत करून घेतील, त्यानंतर कोणाचीही तक्रार आमचे अशिल ऐकून घेणार नाहीत. कोणाचीही फसगत होवू नये म्हणून ही जाहिर नोटीस दिली असे दि. ०४/११/२०२५

**सही/-**
**ॲड. पद्माकर बिभीषण काटमोरे,**
BA.(HON'S)LLB
अति. जिल्हा व सत्र न्यायलय बार्शी
**मो.नं. ९८२२७४३८३४** अशिलातर्फे ॲडव्होकेट



## तहसिल कार्यालय बार्शी

**(कुळ कायदा शाखा)**

दुरध्वनी क्र. (०२१८४) २२२२१३ email-tahbarshi@gmail.com

क्र. कुळकायदा/क. १४,१५/एसआर-१२/२५ दिनांक ०३/११ /२०२५

**जाहिर समन्स/वृत्तपत्राद्वारे**

प्रति,
१. मोहन शहाजी सवने -- **अर्जदार**
रा, चिखर्डे ता.बार्शी
**विरूध्द**
१. गोविंद नरहरी जाधव -- **सामनेवाले**
२. यशवंत निवृत्ती कोंढारे
३. तुकाराम गोविंद कोंढारे
रा. चिखर्डे ता. बार्शी

**मुंबई कुळ वहिवाट व शेतजमीन अधिनियम १९४८चे कलम १४ व १५ अन्वये चौकशी**

**दावा जमीनीचे वर्णन**

| गावाचे नाव | गटनंबर | क्षेत्र हे.आर. | पो.ख. | आकार |
|---|---|---|---|---|
| चिखर्डे | २६५ | १.०२ | ०.०१ | २.७६ |

दावा जमीनीबाबत अर्जदार यांनी दावा मिळकतीच्या इतर हक्कातील गोविंद नरहरी जाधव, यशवंत निवृत्ती कोंढारे, तुकाराम गोविंद कोंढारे स.सा.कुळ म्हणून असलेले नाव कमी करून मिळणेबाबत या कार्यालयाकडे अर्ज सादर केलेले आहे.

दावा जमिनीबाबत मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम १९४८ चे कलम १४ व १५ अन्वये दि, ०९/१०/२०२५ व ३०/१०/२०२५ रोजी चौकशीची तारीख ठेवण्यात आलेली होती. तथापी प्रतिवादी हे गैरहजर राहिलेले असून ग्राम महसूल अधिकारी चिखर्डे ता. बार्शी यांनी यांनी प्रतिवादी हे गावी आढळून येत नसलेबाबत अहवाल सादर केलेला आहे. त्यामुळे जाहिर समन्सद्वारे कळविण्यात येत की, वरील नमूद प्रतिवादी अथवा त्यांचे वारस हे जिथे कोठे असतील तेथून सदर केसच्या संदर्भाने तुम्ही जातीने अगर तुमच्या अधिकृत अभिकर्त्यांमार्फत आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह सदर जाहीर समन्स प्रसिद्धीपासून एक महिन्याचे आत हजर रहावे. जर तुमचे म्हणणे प्राप्त झाले नाही तर आपले गैरहजेरीत एकतर्फी सुनावणी घेतली जाईल व उपलब्ध कागदपत्राआधारे योग्य तो निर्णय देणेत येईल याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**एफ.आर.शेख**
**तहसिलदार बार्शी**



**नमुना १**
**(नियम ४ व ५ पहा)**

## जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर

जा.क्र./तवि-७/कावि/९०४/२०२५ दि. ०५/११/२०२५

**आदेश**

मा. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र मुंबई यांचेकडील आदेश क्र. रानिआ-२०२५/निका/नप/प्र.क्र.१४/का-६ दि.०४/११/२०२५ व महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ यातील नियम ४ व ५ व इतर सर्व अनुषंगिक तरतुदीप्रमाणे अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करून मी, कुमार आशीर्वाद जिल्हाधिकारी, सोलापूर या सोबत जोडलेल्या अनुसूचीच्या स्तंभ १ मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या मतदार प्रभागातून अक्कलकोट नगरपरिषदेच्या घेण्यात येणाऱ्या सार्वत्रिक निवडणूकीच्या संबंधात पुढील नेमणुका व तारखा निश्चित करीत आहे.

**अनुसूची**

| | | |
|---|---|---|
| १ | प्रभागाचे नाव किंवा क्रमांक | प्रभाग क्र. १ ते १२ व अध्यक्षपदाची थेट निवडणूक |
| २अ | निर्वाचन अधिकाऱ्याचे नाव पदनाम | श्री. सुमित शिंदे, उपविभागीय अधिकारी, सोलापूर क्र. २ सोलापूर |
| २ब | सहाय्यक निर्वाचन अधिकाऱ्याचे नाव पदनाम | श्री. रमाकांत डाके, मुख्याधिकारी, अधिकारी नगरपरिषद |
| २क | अतिरिक्त सहाय्यक निर्वाचन अधिकाऱ्याचे नाव पदनाम | श्री. विनायक मगर, तहसीलदार, अक्कलकोट |
| ३ | नामनिर्देशकपत्र राज्य निवडणूक आयोगाने निश्चित केलेल्या वेबसाईटवर भरण्याकरीता उपलब्ध असल्याचा कालावधी. | दि. १०/११/२०२५ ते दि. १७/११/२०२५ (दि. १७/११/२०२५ रोजी दुपारी ०२.०० पर्यंत) |
| ४ | वरील नामनिर्देशनपत्रे स्विकारण्याचा कालावधी | दि. १०/११/२०२५ ते दि. १७/११/२०२५ (दि.१७/११/२०२५ रोजी दुपारी ०३.०० पर्यंत) रविवार या सुट्टीच्या दिवशी नामनिर्देशनपत्र स्विकारण्यात येणार नाहीत. |
| ५ | नामनिर्देशनपत्रे दाखल करण्याची जागा | अक्कलकोट नगरपरिषद कार्यालय, अक्कलकोट |
| ६ | नामनिर्देशनपत्राची छाननी व वैधरित्या नामनिर्देशित झालेल्या उमेदवारांची यादी प्रसिद्ध करण्याचा दिनांक | १८/११/२०२५ (मंगळवार) सकाळी ११.०० वाजल्यापासून |
| ७ | नामनिर्देशनपत्र छाननी व मागे घेण्याची जागा | अक्कलकोट नगरपरिषद कार्यालय, अक्कलकोट |
| ८ | नामनिर्देनपत्र मागे घेण्याचा अंतिम दिनांक अपील नसेल तेथे | दि. १९/११/२०२५ ते दि. २१/११/२०२५ दुपारी ३.०० वाजेपर्यंत |
| ८अ | अपील असल्यास, १) वैधरित्या नामनिर्देशित केलेल्या उमेदवारांची यादी प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून तीन दिवसाच्या आत, जिल्हा न्यायाधीशाकडे अपील करता येईल. २)निवडणूक निर्णय अधिकारी यांनी अपिलाचा निर्णय लवकरात लवकर प्राप्त करून घेणयासाठी प्रयत्न करावेत. | दि. २१/११/२०२५ ते दि. २५/११/२०२५ अपिलाचा निर्णय ज्या तारखेस करण्यात येईल त्या तारखेनंतर तिसऱ्या दिवशी किंवा तत्पूर्वी. मात्र दि. २५/११/२०२५ पर्यंत |
| ९ | निवडणूक चिन्ह नेमून देण्याचा तसेच अंतिमरित्या निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिद्ध करण्याचा दिनांक | दि. २६/११/२०२५ |
| १० | आवश्यक असल्यास, मतदानाचा दिनांक | दि.०२/१२/२०२५ सकाळी ७.३० पासून ते सायंकाळी ५.३० पर्यंत |
| ११ | मतमोजणी व निकाल जाहीर करण्याचा दिनांक | ०३/१२/२०२५ सकाळी १०.०० वाजल्यापासून |
| १२ | मतमोजणी ठिकाण | प्रियदर्शिनी सांस्कृतिक भवन, कमलाराजे चौक, अक्कलकोट |
| १३ | शासन राजपत्रात निकाल प्रसिद्ध करणे | दि. १०/१२/२०२५ पूर्वी कलम १९ मधील तरतुदीनुसार |

तारीख : ०५/११/२०२५
ठिकाण : सोलापूर

सही
(कुमार आशीर्वाद, भा.प्र.से.)
जिल्हाधिकारी,
सोलापूर




# बाजार समितीचे संचालक मनिष देशमुख यांचा वाढदिवस उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ५ नोव्हेंबर-**

श्री सिधदेश्वर कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक मनिष देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त विविध क्षेत्रातील मान्यवरांनी भेटून शुभेच्छा दिल्या.

शहर उत्तरचे आमदार विजयकुमार देशमुख, शहर अध्यक्षा रोहिणी तडवळकर, किरण देशमुख यांच्यासह शहर जिल्हा पदाधिकारी, विविध संघटना, विविध पक्षाचे पदाधिकारी यांनी शुभेच्छा दिल्या. मनिष भैय्या देशमुख मित्रपरिवार तर्फे लोकमंगल अन्नपूर्णा योजनेस धान्य भेट देण्यात आले. याप्रसंगी मनिष भैय्याचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी विशाल गायकवाड, महेश देवकर, राम जाधव, अतुल गायकवाड, अमोल गायकवाड, महेश नांदगावकर, शिवराज सरतापे, सांगप्पा केरके, आनंद बिराजदार, परमेश्वर माळगे, श्रीनिवास बुरूडकर, अनंता चव्हाण, सोमनाथ केंगनाळकर, दीपक जमादार, श्रीकांत ताकमोगे, मधुसुदन जंगम, राहुल वाघमोडे, प्रभाकर पडवळकर, श्रीशैल् हिरेपाट, आदित्य हुच्चे, आनंद गादगे, प्रवीण पवार, गोपाळ पवार आदीसह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### कनिष्ठ पुरुष हॉकी विश्वचषकाचे अनावरण



**चेन्नई** : तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम.के. स्टॅलिन यांनी बुधवारी सचिवालयात आयोजित समारंभात आगामी एफआयएच हॉकी कनिष्ठ पुरुष विश्वचषक २०२५ च्या ट्रॉफीचे अनावरण केले. या कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री आणि युवा कल्याण आणि क्रीडा विकास मंत्री थिरु उदयनिधी स्टॅलिन, मुख्य सचिव एन. मुरुगनंदम, अतिरिक्त मुख्य सचिव अतुल्य मिश्रा व क्रीडा विकास प्राधिकरणाचे (एसडीएटी) सदस्य सचिव आणि सीईओ जे. मेघनाथ रेड्डी, आयएएस उपस्थित होते. हॉकी इंडियाचे अध्यक्ष दिलीप तिर्की, हॉकी इंडियाचे महासचिव भोलानाथ सिंग व हॉकी इंडियाचे कोषाध्यक्ष आणि तामिळनाडूच्या हॉकी संघटनेचे अध्यक्ष थिरु सेकर जे. मनोहरन हे देखील उपस्थित होते. हॉकी कनिष्ठ पुरूष ज्युनियर विश्वचषक स्पर्धा आगामी २८ नोव्हेंबर ते १० डिसेंबर २०२५ या कालावधीत चेन्नई आणि मदुराई येथे होणार आहे. या स्पर्धेत २४ संघांचा सहभाग असेल. यजमान भारताने २००१ आणि २०१६ मध्ये दोनदा ही स्पर्धा जिंकली आहे आणि तिसऱ्यांदा घरच्या मैदानावर ट्रॉफी जिंकण्याची आशा बाळगेल.

### यवतमाळच्या समीक्षाची सांगलीत भरारी



**यवतमाळ** : अँग्लो हिंदी हायस्कूलची विद्यार्थिनी समीक्षा जगदीश राठोड हिने मल्लखांबमध्ये कौतुकास्पद कामगिरी केली आहे. तिने अमरावती जिल्हा क्रीडा कार्यालयाने आयोजित केलेल्या जिल्हास्तरीय स्पर्धेत यश मिळवत सांगली येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेत स्थान निश्चित केले आहे. समीक्षा राठोड हिने आपल्या उत्कृष्ट मल्लखांब खेळाच्या कौशल्याच्या जोरावर जिल्हा स्तरावर हे यश संपादन केले. या चमकदार कामगिरीमुळे आता ती संपूर्ण अमरावती जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करण्याचा मान मिळवणार आहे. राज्यस्तरीय मल्लखांब स्पर्धेसाठी तिची झालेली निवड अँग्लो हिंदी हायस्कूलसाठीही गौरवास्पद बाब ठरली आहे. ही प्रतिष्ठीत राज्यस्तरीय स्पर्धा ११ ते १३ नोव्हेंबर २०२५ दरम्यान मिरज, जिल्हा सांगली येथील तालुका क्रीडा संकुल येथे होणार आहे. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी समीक्षासह सर्व पात्र खेळाडूंना ११ नोव्हेंबरला संध्याकाळी ५ वाजेपर्यंत स्पर्धेच्या ठिकाणी उपस्थित राहण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. स्पर्धेच्या आयोजनासाठी बाळाजी वरकडे, बापू सुमेलवाले आणि नरेश सावळे यांची संपर्क अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

### कोको गॉफचे आव्हान कायम

**रियाध** : गतविजेत्या कोको गॉफने जास्मिन पाओलिनीवर ६-३, ६-२ असा विजय मिळवून डब्ल्यूटीए फायनल्स टेनिस स्पर्धेत ागेकूच करण्याच्या आपल्या आशा पुन्हा जिवंत केल्या. गॉफने तिच्या सर्व्हिंगमध्येही सुधारणा केली, केवळ तीन डबल-फॉल्ट मारले. जेसिका पेगुलाविरुद्धच्या आपल्या पहिल्या सामन्यात तिने फार कमी चुका केल्या. निश्चितपणे माझ्या पहिल्या सामन्यातील हा एक बदल आहे. हे या स्पर्धेचे सौंदर्य आहे आणि स्वतःला सिद्ध करण्याची आणखी एक संधी आहे, असे गॉफ म्हणाली. कोको गॉफचा पुढील सामना अव्वल क्रमांकाच्या आर्यना सबालेन्काशी होईल आणि ती अव्वल आठ खेळाडूंसाठी हंगामाच्या अखेरच्या स्पर्धेत पुढे जाईल की नाही हे ठरवेल, तर पाओलिनीला दोन पराभवांसह स्पर्धेतून बाहेर पडावे लागले. पेगुलाला ६-४, २-६, ६-३ असा पराभव करून सबलेन्का गटात आघाडीवर आहे. या स्पर्धेत पाओलिनी देखील जोडीदार सारा एरानीसोबत दुहेरीत खेळत आहे.

### रोहित, विराट भारताचे रोनाल्डो, मेस्सी : लतीफ

**नवी दिल्ली** : भारतीय दिग्गज विराट कोहली आणि रोहित शर्मा हे भारताचे एकदिवसीय क्रिकेटमधील ख्रिस्तियानो रोनाल्डो व लियोनेल मेस्सी आहेत, असे मत पाकिस्तानचे माजी कर्णधार रशीद लतीफने व्यक्त केले. २०२७ च्या विश्वचषकात या दोघांचा सहभाग हा भारतीय व्यवस्थापनाचा निर्णय असेल, परंतु भारतीय संघ मजबूत करण्यासाठी या दोघांपैकी कोणीही संघात असले पाहिजे असा विश्वास ५७ वर्षीय लतिफने व्यक्त केला. निवडकर्त्यांनी आणि व्यवस्थापनाने संघ निवडताना अनेक घटकांचा विचार केला पाहिजे, त्यामुळे प्रतिभेच्या खोलीमुळे काही पात्र खेळाडूंना संधी मिळू शकते. रोहित व कोहलीला विश्वचषकात सहभागी करून घेतले पाहिजे आणि संघाने त्यांच्यापैकी किमान एकाला, जर दोघांनाही नाही तर, अंतिम एकादशमध्ये बसवण्याचा प्रयत्न केला पाहिजे, असेही तो म्हणाला. अजून एक संपूर्ण वर्ष शिल्लक आहे.

# ऑस्ट्रेलियाविरुद्ध भारत आक्रमक खेळणार

**भारत-ऑस्ट्रेलिया चौथा टी-२० सामना आज**
**स्थळ** : पिपल फर्स्ट स्टेडियम, कॅरारा
**वेळ** : दुपारी १.४५ वाजतापासून
**थेट प्रसारण** : स्टार स्पोर्ट्सवर

◆ **कॅरारा, ५ नोव्हेंबर**

गुरुवारी कॅरारा स्टेडियमवरग भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यादरम्यान चौथा टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामना खेळला जाणार आहे. आत्मविश्वासाने भरलेल्या भारतीय संघाने निराशाजनक ऑस्ट्रेलियाविरुद्ध एक-एक अशी आघाडी घेण्याचे लक्ष्य ठेवले असून शुभमन गिल मोठी खेळी करून संघाला पुढे नेण्याचा प्रयत्न करेल.



सूर्यकुमार यादव



मिचेल मार्श

तीन सामन्यांनंतर टी-२० मालिका १-१ अशी बरोबरीत आहे आणि गत सामन्यात जोश हेझलवूडच्या अनुपस्थितीमुळे ऑस्ट्रेलियाच्या १८६ धावांच्या मानक धावसंख्येच्या बचावात फरक पडला.

चौथ्या सामन्यात ऑस्ट्रेलियासाठी कोणताही ट्रॅव्हिस हेड नसेल, कारण सलामीवीर ॲशेसच्या तयारीसाठी शेफील्ड शिल्डमध्ये खेळणार आहे.

प्रतिस्पर्धी संघाचे दोन आधारस्तंभ उपलब्ध नसल्यामुळे गॅब्बा येथे होणाऱ्या अंतिम सामन्यापूर्वी २-१ अशी आघाडी घेऊन मालिका जिंकण्याची ही भारताला सर्वोत्तम संधी आहे.

गत सामन्यात भारताने अखेर आठव्या क्रमांकावर अष्टपैलू खेळाडूला संधी देण्याचा प्रयत्न केला. तथापि, भारतीय संघ व्यवस्थापनाला थोडीशी अडचण येईल, ती म्हणजे कर्णधार शुभमन गिलचा मालिकेतील फॉर्मची चिंता आहे. त्याने आता सहा सामने खेळले आहेत व एकही अर्धशतक झळकावले नाही. मात्र कॅरारा येथे तो उत्कृष्ट आक्रमक खेळा करण्याची अपेक्षा आहे. त्याला काही धावा मिळाल्यास त्याचा निश्चितच खूप आत्मविश्वास वाढेल.अभिषेक शर्मा मालिकेत उत्तम अर्धशतक आणि दोन जलद सुरुवात केली आहे.

कर्णधार सूर्यकुमार यादवने पहिल्या व तिसऱ्या सामन्यात दोन चांगल्या सुरुवातीसह आपल्या जुन्या स्वभावाची काही झलक दाखवली आहे. पण दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या पुढील मालिकेपूर्वी एक महिन्याचा ब्रेक असल्याने तो काही धावाही करू इच्छितो. दरम्यान, सूर्यकुमार मुंबईचा पुडुचेरीविरुद्धचा रणजी करंडक सामना खेळेल अशी अपेक्षा आहे.

कुलदीप यादवला दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या कसोटी मालिकेसाठी तयारीसाठी परत पाठवण्यात आले असले तरी. अर्शदीप सिंगच्या समावेशासह गोलंदाजी विभाग खूपच संयमी दिसत आहे. (वृत्तसंस्था)

# भारत अ -दक्षिण आफ्रिका अ कसोटी आजपासून

### सिराज, राहुल, कुलदीप, बावुमाचे कामगिरीवर लक्ष

◆ **बंगळूरू, ५ नोव्हेंबर**

गुरुवारपासून येथे ऋषभ पंतच्या नेतृत्वाखालील भारत अ संघ आणि टेम्बा बावुमाच्या नेतृत्वाखालील दक्षिण आफ्रिका संघ यांच्यादरम्यान दुसरा चार दिवसीय अनधिकृत कसोटी क्रिकेट सामना खेळला जाणार आहे.

पंत पहिल्या सामन्यातील कामगिरीवर भर देण्याचा प्रयत्न करेल, तर मोहम्मद सिराज व कुलदीप यादवसारखे खेळाडू आपल्या गोलंदाजीचा प्रभाव वाढविण्यावर लक्ष केंद्रित करतील.

पंतने यष्टिरक्षक म्हणून १३९.३ षटके सहज खेळली व फलंदाज म्हणून १३३ चेंडू खेळले, यात बीसीसीआय सेंटर ऑफ एक्सलन्स (सीओई) मैदानावर गत आठवड्यात झालेल्या पहिल्या चार दिवसीय सामन्यात त्याच्या ९० धावांचा समावेश होता. तंदुरुस्तीच्या चिंता त्याच्या पाठीमागे असल्याने, डावखुरा फलंदाज पंत आता १४ नोव्हेंबरपासून सुरू होणाऱ्या दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेपूर्वी पुन्हा एकदा कठीण परिस्थितीतून बाहेर पडण्यास उत्सुक असेल.



ऋषभ पंत



टेम्बा बावुमा



कुलदीप यादव

सिराज, केएल राहुल व कुलदीप हे मायदेशी परतण्यापूर्वी भारताच्या चालू ऑस्ट्रेलिया दौऱ्याचा भाग होते, आता ते दक्षिण आफ्रिका अ संघातील स्पर्धात्मक प्रतिस्पर्ध्याविरुद्ध आपले कौशल्य दाखवू शकतात.

पहिल्या सामन्यात यजमानांनी तीन गड्यांनी विजय मिळवल्यानंतर पाहुणे संघ मालिका बरोबरीत आणण्यास उत्सुक असेल.

फलंदाजांच्या दृष्टिकोनातून दक्षिण आफ्रिका अ संघाच्या वेगवान गोलंदाजांनी पहिल्या सामन्याच्या शेवटच्या दिवशी आखुड टप्प्याच्या गोलंदाजीची व्यूहरचना अवलंबून भारतीयांना धक्का दिला. वरिष्ठ दक्षिण आफ्रिकेचा संघही असाच मार्ग अवलंबतो का हा वादाचा विषय आहे.

सीओईची खेळपट्टी वेगवान गोलंदाजांना सातत्याने उसळी देत असल्याने, दक्षिण आफ्रिकेच्या अ गोलंदाजांना पुन्हा एकदा ती व्यूहरचना अवलंबण्याचा आणण्याचा मोह होऊ शकतो. तेव्हा भारतीय फलंदाजांना कॅगिसो रबाडा व मार्को जॅन्सनसारख्या फलंदाजांविरुद्धच्या लढतीपूर्वी चांगली कसरत करावी लागेल.

भारत अ संघात प्रसिध कृष्णासारखे वेगवान गोलंदाज आहे व आकाश दीप कसोटी संघात परत येण्याचा प्रयत्न करत आहेत. वेस्ट इंडीजविरुद्धच्या घरच्या मालिकेसाठी भारतीय संघात असलेल्या प्रसिध व आकाश यांचा शेवटचा कसोटी सामना ओव्हल येथे इंग्लंडविरुद्धच्या पाचव्या कसोटी सामन्यात होता. या दरम्यान, प्रसिध ऑस्ट्रेलियाविरुद्ध एक परदेशात एकदिवसीय सामना खेळला, तर आकाश रणजी करंडकात बंगालसाठी सातत्याने कसरत करत आहे. जसप्रीत बुमराह व सिराजनंतर दक्षि आफ्रिका अ विरुद्ध चांगली कामगिरी करून राष्ट्रीय संघात तिसऱ्या वेगवान गोलंदाजाची जागा मिळविण्यासाठी ते उत्सुक असतील. (वृत्तसंस्था)

### कोहली ३७ वर्षांचा झाला, शुभेच्छांचा वर्षाव

**नवी दिल्ली** : भारताचा दिग्गज फलंदाज विराट कोहली बुधवारी ३७ वर्षांचा झाला आणि त्याच्या भारतीय संघातील खेळाडूंनी आधुनिक काळातील सर्वात प्रतिष्ठित क्रिकेटपटूंपैकी एकाच्या खास दिवसाचे सेलिब्रेशन करण्यासाठी मनापासून शुभेच्छा दिल्या. वन-डे क्रिकेटवर लक्ष केंद्रित करण्यासाठी कसोटी आणि टी-२० मधून निवृत्ती जाहीर करणाऱ्या कोहलीने आयसीसी जागतिक कसोटी अजिंक्यपद वगळता जवळजवळ प्रत्येक आयसीसी स्पर्धा जिंकली आहे. कोहलीच्या खास दिवशी शुभेच्छा देणाऱ्यांमध्ये माजी स्टार अष्टपैलू युवराज सिंग, फिरकी गोलंदाज युजवेंद्र चहल आणि इतर आहेत. 'एकेकाळी राजा, नेहमीच राजा. वाढदिवसाच्या शुभेच्छा पुढील वर्षासाठी तुम्हाला खूप खूप प्रेम पाठवत आहे !, असे युवराज सिंगने एक्सवर शेअर केले.

# लुधियानात कबड्डीपटूची गोळ्या घालून हत्या

◆ **लुधियाना, ५ नोव्हेंबर**

पंजाबमधील लुधियाना जिल्हा पुन्हा एकदा दहशतीने हादरला आहे. समराला तालुक्यातील मानकी गावात बुधवारी रात्री अज्ञात हल्लेखोरांनी कबड्डीपटू २२ वर्षीय गुरिंदर सिंग याची गोळ्या घालून हत्या केली. या हल्ल्यात त्याचा साथीदार धर्मवीर सिंग गंभीर जखमी झाला असून, त्याला चंदीगड येथील रुग्णालयात हलविण्यात आले आहे.

गुरिंदर व धर्मवीर हे दोघेही मानकी गावातील एका मेडिकल स्टोअरच्या बाहेर बसले होते. त्याचवेळी काही अज्ञात व्यक्तींनी अचानक त्यांच्यावर गोळीबार केला. गोळीबारात गुरिंदर सिंगचा जागीच मृत्यू झाला, तर धर्मवीर गंभीर जखमी झाला.

ग्रामस्थांनी तत्काळ दोघांना समराला सिव्हिल हॉस्पिटलमध्ये नेले, मात्र गुरिंदरला वाचवता आले नाही. डॉक्टरांनी धर्मवीरला प्रकृती गंभीर असल्याने चंदीगडला पाठविण्याचा सल्ला दिला.

लुधियानामध्ये कबड्डी खेळाडूंवरील हा आठवड्यातील दुसरा हल्ला आहे. यापूर्वी ३१ ऑक्टोबर रोजी जगराव परिसरात कबड्डीपटू तेजपाल सिंग याची दिवसाढवळ्या गोळ्या झाडून हत्या करण्यात आली होती. त्या घटनेत पाच ते सहा जणांच्या टोळीने तेजपालवर आधी मारहाण करून नंतर गोळीबार केला होता. त्या प्रकरणात पोलिसांनी गगनदीप सिंग आणि हरप्रीत सिंग उर्फ हनी या दोघांना अटक केली आहे.

सलग दोन कबड्डीपटूंच्या हत्यांमुळे क्रीडा क्षेत्रात आणि लुधियानातील स्थानिक समाजात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. पोलिसांनी दोन्ही घटनांमध्ये कोणताही संबंध आहे का, याचाही शोध सुरू केला आहे. (वृत्तसंस्था)

### झिम्बाब्वेचा माजी कर्णधार विल्यम्सला व्यसनामुळे संघातून कायमचे वगळले

◆ **हरारे, ५ नोव्हेंबर**

झिम्बाब्वे संघाचा माजी क्रिकेट कर्णधार शॉन विल्यम्स ड्रग्जच्या व्यसनामुळे काही सामने वगळल्याचे उघड झाल्यानंतर त्याची पुन्हा त्याच्या देशासाठी निवड होणार नाही, असे झिम्बाब्वे क्रिकेट मंडळाने म्हटले आहे.

सप्टेंबरमध्ये झालेल्या टी-२० विश्वचषक पात्रता स्पर्धेच्या पूर्वसंध्येला विल्यम्सने अचानक संघातून माघार का घेतली याची चौकशी झिम्बाब्वे क्रिकेटने केली. चौकशीदरम्यान, विल्यम्सने खुलासा केला की तो ड्रग्जच्या व्यसनाशी झुंजत आहे व स्वेच्छेने पुनर्वसनात प्रवेश केला आहे, असे झिम्बाब्वे क्रिकेट मंडळाने एका निवेदनात म्हटले आहे. विल्यम्सने स्पर्धेत संभाव्य ड्रग्ज चाचण्यांमुळे माघार घेतली असावी, असे मंडळाने म्हटले आहे. पुढील वर्षी भारत आणि श्रीलंकेत होणाऱ्या टी-२० विश्वचषकासाठी पात्र होण्यासाठी झिम्बाब्वेने आठ संघांच्या आफ्रिकन स्पर्धेत यजमानपद भूषवले आणि जिंकले. (वृत्तसंस्था)

# अर्शदीप सिंगकडे पुरेसा अनुभव : मॉर्केल

◆ **कॅरारा, ५ नोव्हेंबर**

निवडीच्या बाबतीत कदाचित कठीण परिस्थिती आली असेल, पण भारतीय संघ व्यवस्थापन मोठ्या चित्राकडे पाहता वेगवेगळे संयोजन करण्याचा प्रयत्न करत आहे हे समजून घेण्यासाठी अर्शदीप सिंगकडे पुरेसा अनुभव आहे, असे गोलंदाजी प्रशिक्षक मोर्ने मॉर्केल यांनी बुधवारी सांगितले.

होबार्टमध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या तिसऱ्या टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यात अंतिम एकादशमध्ये पुनरागमन करताना अर्शदीपला सामनावीर म्हणून निवडण्यात आले.



तथापि, पहिल्या दोन सामन्यांमध्ये त्याला निवडण्यात आले नव्हते. आता तो व कुलदीप यादव एकत्र खेळू शकत नाही. १०० पेक्षा जास्त टी-२० बळी घेणारा अर्शदीप हा एकमेव भारतीय गोलंदाज आहे.

अर्शदीप अनुभवी आहे व तो भारताच्या मोठ्या विजयाकडे बघत आहे, याची आम्हाला कल्पना आहे. तो एक जागतिक दर्जाचा गोलंदाज आहे, त्याने पॉवरप्लेमध्ये सर्वाधिक बळी घेतले आहे, असे मोर्केलने गुरुवारी येथे झालेल्या चौथ्या टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यापूर्वी पत्रकारांना सांगितले.

खेळाडूंनी दबावाच्या परिस्थितीत सर्वोत्तम कामगिरी करावी, असा सल्ला मॉर्केल आणि प्रशिक्षक कर्मचाऱ्यांनी खेळाडूंना दिला आहे. तसेच कठोर परिश्रम करण्यास आणि संधी मिळाल्यावर सज्ज राहण्यास सांगितले आहे. (वृत्तसंस्था)





# राष्ट्रीय गोल शॉट बॉल स्पर्धेत महाराष्ट्राला तृतीय स्थान

### सिंहगड पब्लिक स्कूलच्या दोघींचा समावेश

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ५ नोव्हेंबर-**

महाराष्ट्र ज्युनियर मुलींच्या गोल शॉट बॉल संघाने उडान इंटरनॅशनल स्कूल, बेगूसराय (बिहार) येथे झालेल्या स्पर्धेत तृतीय स्थान मिळविले. यात सिंहगड पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज केगावच्या राजश्री सोमनाथ भालेकर व समृद्धी ज्योतीराम शिंदे या दोन विद्यार्थिनींचा सहभाग होता. त्यांना क्रीडा शिक्षक राजू ठाकूर व गोल शॉट बॉल असोसिएशन ऑफ महाराष्ट्रचे सेक्रेटरी योगेश पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल सिंहगड इन्स्टिट्यूटचे कॅम्पस डायरेक्टर संजय नवले, मुख्याध्यापिका शाहिन शेख, उपप्राचार्य प्रकाश नवले आदींनी अभिनंदन केले.



# ह.दे. प्रशालेत भारतीय महिला संघाचा विजयोत्सव साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ नोव्हेंबर-**

भारतीय महिला संघाने वर्ल्ड कप जिंकल्यानिमित्त हरिभाई देवकरण प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयाच्या महिला खेळाडूंच्या वतीने केक कापून विजयोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी मुख्याध्यापक दीपा फाटक, पर्यवेक्षक श्री. सर्वगोड, श्री.शहाणे, श्री. नेवरे, क्रीडा शिक्षक प्रमोद चुंगे, श्री माणिक साळस्कर, अक्षय गवळी व प्रकाश कंपली उपस्थित होते. उपस्थित महिला क्रिकेट खेळाडूः अमृता गव्हाणे, स्नेहा शिंदे, आस्था राजपूत, हर्षदा व्हनमाने, अनुष्का देशमुख, अद्विका देशमुख, लास्या दासरी, श्रुती चन्ना, नक्षत्रा कोंकत्ती, श्रद्धा गुणकी, मानसी गोटीवाले, श्रुती सावंत, काजल राठोड, वरदा कोर्टीकर, सना शेख, सावली पवार , प्रतीक्षा वाघमारे, जान्हवी साळसकर, संस्कृती, स्मृति तोरणे.



# श्लोक आळंदला दुहेरी मुकुट

### दुबईतील आंतरराष्ट्रीय लॉन टेनिस स्पर्धा

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ५ नोव्हेंबर-**

दुबई येथे झालेल्या आंतराराष्ट्रीय लॉन टेनिस स्पर्धेत येथील श्लोक आंळदने १० वर्षांखालील गटात अजिंक्यपद व ११ वर्षांखालील गटात उपविजेतेपद दुहेरी मुकुट संपादिला. दहा वर्षांखाली गटातील अंतिम फेरीत त्याने आर्यलंडच्या सेबस्ट्रीयन पिगॉटचा ६-०, ६-१ असा पराभव केला. सुरुवातीला त्याला येथील राजीव देसाई व इम्रान शेख यांचे मार्गदर्शन लाभले. सध्या तो पुण्यातील मेट्रोसिटी क्लबला प्रसन्नजित पॉल व आकाश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करतो.



सांगोला : पुणे शहर विरुद्ध पिंपरी चिंचवड या मुलींच्या अंतिम सामन्यातील टिपलेला क्षण.

# चौदा वर्षांखालील गटातही पुण्याचे वर्चस्व

### पुणे विभागीय शालेय बास्केटबॉल : सोलापूरचे केएलई स्कूल तृतीय

**तभा वृत्तसेवा**
**सांगोला, दि. ५ नोव्हेंबर-**

पुणे विभागीय शालेय बास्केटबॉल स्पर्धेत १४ वर्षांखाली ल मुले व मुलींच्या गटातही पुण्यातील शाळांनी वर्चस्व मिळविले.

मुलांच्या गटात सोलापूरच्या केएलई स्कूलने तृतीय स्थान संपादिले. सांगोला विद्यामंदीरच्या बास्केटबॉल कोर्टवर ही स्पर्धा सुरू आहे. बुधवारी १४ वर्षांखालील मुले व मुलींच्या गटाची स्पर्धा झाली. या स्पर्धेत खेळाडू व प्रेक्षकांना ताजा गुणफलक पाहता यावा यासाठी इलेक्ट्रॉनिक स्कोरबोर्ड लावला होता.

**अंतिम निकाल (प्रथम तीन)**

**१४ वर्षांखालील मुले** : अमनोरा स्कूल हडपसर (पुणे शहर), रिसे पिंपळे सौदागर (पिंपरी चिंचवड), केएलई स्कूल (सोलापूर शहर).

**मुली** : सरदार दस्तूर नोशेखान गर्ल हायस्कूल (पुणे शहर), इंदिरा नॅशनल स्कूल (पिंपरी चिंचवड), ध्रुव ग्लोबल स्कूल (पुणे ग्रामीण).

# कबड्डी स्पर्धेत सेंट जोसेफ स्कूलला विजेतेपद





**सोलापूर, दि. ५ नोव्हेंबर-**

शालेय शहर कबड्डी स्पर्धेत सेंट जोसेफ स्कूलने १७ वर्षांखालील मुलांच्या गटात विजेतेपद पटकाविले. या कामगिरीवर संघाची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली. संघास क्रीडा शिक्षक सनी भोसले व प्रशिक्षक सनी शशिकांत जाधव यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे मुख्याध्यापक फादर आनंद गायकवाड यांनी अभिनंदन केले.

**विजेता संघ** : वसंत वाघमोडे, अथर्व गायकवाड, मुन्नावर चंदेरकी, सिद्राम भोगा, धैर्य गाडगे, विश्व बोघडे, प्रज्वल मब्रूखाने, श्रेयस, सौरभ जाधव, गौरव जाधव, अथर्व खोबणे, अनन्य पटोले.

## महत्वाचे...



### ग्रंथालय कर्मचाऱ्यांचे प्रलंबित प्रश्न सोडवा : परिषदेची मागणी

**सोलापूर, दि. ५ नोव्हेंबर-**

राज्यातील ग्रंथालय कर्मचाऱ्यांचे प्रलंबित प्रश्न सोडवा, अशी मागणी राज्य सार्वजनिक ग्रंथालय कर्मचारी विकास परिषदने केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना केली आहे. विकास परिषदेचे अध्यक्ष सदाशिव बेडगे व सचिव धोंडिराम जेवूरकर यांनी केंद्रीय मंत्री गडकरी यांची ऑरेंज सिटी हॉस्पिटल येथील त्यांच्या कार्यालयात भेट घेऊन त्यांना निवेदन दिले. ग्रंथालय कर्मचारी यांना किमान वेतन मिळाले पाहिजे यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याबाबत लक्ष घालून प्रश्न मार्गी लावण्यासाठी त्यांना निवेदन दिले. ग्रंथालय अधिनियमात सुधारणा करून ग्रंथालय कर्मचारी यांच्या सहा तास ऐवजी आठ तास कामाची वेळ करा, ग्रंथालय कर्मचाऱ्यांचे किमान वेतन दरमाह त्यांच्या खात्यात जमा करा आणि ग्रंथालयाचे ४०% अनुदान वाढ व दर्जा बदल शासन निर्णय त्वरित काढावा या मागण्या त्यांनी दिलेल्या निवेदनात नमूद आहेत.

# शहरातील ५४ मीटर रस्त्यांचे काम संथ गतीने

**शिवसेना उबाठा पक्षाने दिला होता आंदोलनाचा इशारा**

## विलंबाबाबत मक्तेदारास दंडाची नोटीस देण्याचे आयुक्तांचे आदेश







**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ नोव्हेंबर-**

शहरातील ५४ मीटर रस्त्यांचे अवंती नगर ते रेल्वे ब्रीज दरम्यानच काम संथ गतीने सुरू असल्याने मक्तेदारास विलंबाबाबत दंडाची नोटीस देण्याचे आदेश महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी दिले आहेत.

या संदर्भात शिवसेना उबाठा पक्षाच्या वतीने महापालिका आयुक्तांना निवेदन देण्यात आले होते. तसेच मध्य रेल्वे सोलापूरच्या विभागीय व्यवस्थापक यांना निवेदन देण्यात आले होते. प्रसंगी आंदोलन करण्याचा ईशाराही देण्यात आला होता. गेल्या १५ ते २० वर्षांपासून शहरातील ५४ मीटर रस्त्याचे काम प्रलंबित आहे. गेल्या सहा महिन्यांपूर्वीच या रस्त्याला अडथळा होणाऱ्या जवळपास १०/१५ घरांना महानगरपालिकेने काढले. अडथळा दूर झाला असला तरी रस्त्याचे काम मात्र पूर्ण करण्यास महानगरपालिका किंवा रेल्वे प्रशासन यांनी सुरवात केलेली नाही. पालिका आयुक्तांनी याची कार्यवाही तातडीने सुरु केली आहे. रेल्वे प्रशासनाने अद्याप कार्यवाही केली नाही.

निवेदन देताना यावेळी शिवसेना सोलापूर शहर संघटक सुरेश जगताप, दत्ता खलाटे, शिवसेना सोलापूर उपशहर प्रमुख लहू गायकवाड, शिवसेना सोलापूर शहर समन्वयक निरंजन बौद्धूल, शिवसेना शहर मध्य समन्वयक तुषार खंदारे, उपशहर प्रमुख मध्य आबा सावंत, विभाग प्रमुख शिवसेना बाळासाहेब माने, महिला उपशहर प्रमुख वैशाली सातपुते, बाळासाहेब सातपुते यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

**सौंदर्यीकरण व विकासकामे गतीने व दर्जेदार करा**

सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने शहरातील विविध भागांमध्ये स्वच्छता, रस्ते, देवस्थान,उद्यान आणि विकासकामांच्या अनुषंगाने आयुक्त डॉ. ओम्बासे यांनी पाहणी केली. त्यावेळी त्यांनी हे आदेश दिले.

बाळीवेस चौक परिसरातील स्वच्छता एमएसईबी ट्रान्सफॉर्मर जवळील झुडपे तातडीने काढून परिसर स्वच्छ ठेवा. किल्ला बगीचा व इतर उद्यानांचे कामकाज राहिलेली कामे १० नोव्हेंबरपर्यंत पूर्ण करून, ११ नोव्हेंबरपासून मक्तेदाराकडे देखभाल सोपविण्याचे आदेश दिले. लेकफ्रंट, सिद्धेश्वर तलाव, ॲडव्हेंचर पार्क अशा इतर ठिकाणीही नियमित पाहणी व देखभाल सुनिश्चित करण्याचे निर्देश दिले. बाळे नागरी आरोग्य केंद्र या ठिकाणीही भेट दिली. सहा कमानी येथे खोलीकरण व रुंदीकरणाचे काम चालू असून त्या ठिकाणीही पाहणी केली.

यावेळी उपायुक्त आशिष लोकरे, उपायुक्त तैमुर मुलाणी, प्र. नगर अभियंता सारिका आकुलवार, विभागीय अधिकारी जावेद पानगल, विभागीय अधिकारी श्याम कन्ना, मुख्य सफाई अधिक्षक नागनाथ बिराजदार तसेच संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

**बाळे रोडवरील खडड्यांची दुरुस्ती त्वरीत करा**

बाळे येथील श्री खंडोबा देवस्थानसंदर्भात तीर्थक्षेत्र घोषीत करण्याबाबत लागू होत असलेल्या वर्गात (क वर्ग) दर्जा प्राप्त होणेसाठी आवश्यक ते नाहरकत देवस्थानकडून घेवून प्रस्ताव सात दिवसांत सादर करावे. शहरातील प्रवेशद्वार परिसरांची स्वच्छता मोहीम, पुणे रोड व तूळजापूर रोड परिसरातील गवत, झुडपे व कचरा तातडीने साफ करण्याच्या सूचना दिल्या. बाळे रोडवरील खडड्यांची दुरुस्ती त्वरीत पूर्ण करून रस्त्यावरील वाहतुकीस अडथळा येणार नाही याची काळजी घेण्याचे निर्देश दिले.

# हसापूरे व माने यांचा भाजप प्रवेश रखडला

## हसापूरे वळसंग गटातून कॉंग्रेसकडून लढणार?



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.५ नोव्हेंबर-**

सोलापूर बाजार समिती निवडणूक पार पडल्यापासून काँग्रेसचे माजी आमदार दिलीप माने व माजी जिल्हा परिषद सदस्य सुरेश हसापूरे भाजपमध्ये प्रवेश करणार असल्याची चर्चा सुरू आहे. श्री.माने यांच्या प्रवेशाला भाजपाकडून विरोध होत असल्याने तूर्तास त्यांचा प्रवेश थांबविण्यात आला आहे. तर सुरेश हसापूरे यांचा अद्याप विचार झाला नाही. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूकीआधी प्रवेश न झाल्यास त्याचा परीणाम निवडणूकीवर होणार असल्याची चर्चा सुरू आहे. हसापूरे यांनी काँग्रेस नेत्यासोबत संपर्क वाढविल्याने वळसंग जिल्हा परीषद गटासाठी काँग्रेसकडून इच्छुक असल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे माने व हसापूरे यांचा लांबलेला पक्षप्रवेश भाजपसाठी धोकादायक ठरू शकतो अशी शक्यता वर्तविण्यात येत आहे.

सोलापूर बाजार समिती सर्वपक्षीय नेत्यांनी एकत्र येऊन लढल्यावर भाजपची ताकद वाढविण्यासाठी दिलीप माने व सुरेश हसापूरे यांना भाजपमध्ये प्रवेश देण्याचा निर्णय झाला. त्यासाठी पालकमंत्री , आमदार सचिन कल्याणशेट्टी व देवेंद्र कोठे यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांची भेट घडवून आणली. मात्र माने यांच्या प्रवेशाला भाजप कार्यकर्त्यांकडून विरोध होत असल्याने त्यांचा प्रवेश तूर्तास थांबविण्यात आला आहे. तर हसापूरे वळसंग गटातून भाजपकडून इच्छुक असताना त्यांच्याकडे दुर्लक्ष करण्यात येत असल्याने ते पुन्हा दक्षिणमध्ये सर्वपक्षीय आघाडी करून कॉंग्रेस बळकट करण्यासाठी सरसावले आहेत.

हसापूरे यांचा भंडारकवठे गट अनूसूचित जमाती महिला प्रवगासाठी आरक्षित आहे. त्यामुळे त्यांना बोरामणी व वळसंग गटातून जिल्हा परिषद निवडणूक लढवावी लागणार आहे. वळसंग गटासाठी त्यांच्या कार्यकर्त्यांकडून मागणी होत आहे. याठिकाणी भाजपाकडून रामप्पा चिवडशेटी यांच्या नावाची चर्चा सुरू आहे. त्यामुळे भाजपविरूद्ध कॉंग्रेस अशी लढत होण्याची शक्यता नाकारता येत नाही. वळसंग गटात हसापूरे यांना मानणाऱ्या कार्यकर्त्यांची संख्या मोठ्या प्रमाणावर आहे. शिवाय सोसायटीच्या माध्यमातून प्रत्येक गावात संचालक मंडळासह संपर्कातील मतदारांची संख्या अधिक आहे. सर्वपक्षीय आघाडी झाल्यास भाजपसाठी ही निवडणूक धोक्याची ठरू शकते. त्यादृष्टीने हसापूरे रणनीती आखत असल्याचे सांगण्यात येत आहे. आमदार कल्याणशेट्टी यांच्या सहकार क्षेत्रातील प्रवेशासाठी हसापूरे यांनी मोलाची मदत केली आहे. शिवाय सोलापूर बाजार समितीवर भाजपचा झेंडा फडकविण्यासाठी हसापूरे यांचे योगदान आहे. महणून आ. कल्याणशेट्टी यांनी हसापूरे यांना वळसंग गटातून उमेदवारी देण्याची मागणी कार्यकर्त्यांकडून होत आहे.

हसापूरे यांनी कॉंग्रेस पक्षवाढीसाठी तालुक्यात मोलाची भूमिका बजावली आहे. शिवाय लोकसभा निवडणूकीत कॉंग्रेसच्या प्रणिती शिंदे यांच्या विजयासाठी त्यांचे योगदान आहे. त्यामुळे त्यांना कॉंग्रेकडून उमेदवारी मिळाल्यास कार्यकर्त्यांना बळ मिळणार आहे. हसापूरे सध्या चाणाक्ष नीतीचा वापर करीत दक्षिणमधील सर्वपक्षीय व समविचारी नेत्यांना एकत्र करून भाजपाविरूद्ध योजना आखत आहेत. त्यामुळ दक्षिणमधील कॉंग्रेसच्या दोन दिग्गज नेत्यांच्या पक्षप्रवेश व भूमिकेकडे जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# सोलापुरात सेवानिवृत्त अधिकारी, माजी सैनिकांचा मेळावा उत्साहात



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ नोव्हेंबर-**

जिल्हयातील व शेजारील जिल्ह्यातील बॉम्बे इंजिनियर ग्रुप. (खडकी) पुणे मधून सेवानिवृत्त झालेले अधिकारी, माजी सैनिक व वीर नारी/वीर माता-पिता, माजी सैनिकांच्या विधवा पत्नी आणि त्यांचे अवलंबित, इतर रेजिमेंटमधून आणि भारतीय नौसेना आणि भारतीय वायुसेनेमधून सेवानिवृत्त झालेले अधिकारी, यांच्या अडी-अडचणी सोडविण्यासाठी बहुउद्देशिय सभागृह, जुने जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर येथे मेळावा उत्साहात पार पडला. या मेळाव्याचा २६८ माजी सैनिकांनी लाभ घेतला असून, या मेळाव्यात उपस्थित अधिकाऱ्यांनी मार्गदर्शन केले.

या मेळाव्यासाठी सेवानिवृत लेफ्टनंट जनरल एस एस हसबनिस, सेवानिवृत्त ब्रिगेडियर एस आर मजगांवकर, कर्नल मुलचंद गुर्जर, कर्नल रेकार्डस, ले. कर्नल प्रकाश पाटील, मेजर मोरे डि एच रेकार्डस आफिसर, कर्नल सतिश रनधिर, मेजर विपुल पाटील, मेजर हसिता मनस्वी, मेजर मिलिंद देवदत्त तुगार, ३ जेसीओ व २३ सेवारत अन्य रँकमधील जवान यांचेसह सोलापूर व शेजारील जिल्हयातील २६८ माजी सैनिक, वीर पत्नी वीर माता-पिता, माजी सैनिकांच्या विधवा पत्नी व त्यांचे अवलंबित उपस्थित होते.कर्नल प्रकाश पाटील, चीफ रेकार्डस आफिसर, बॉम्बे इजिनियर ग्रुप, (खडकी) पुणे यांनी सूत्रसंचलन करुन आभार मानले.

मेळाव्यामध्ये अभिलेख कार्यालय चॉम्बे इजिनियर ग्रुप, (खडकी) पुणे यांच्यामार्फत उपस्थित एकुण वीस माजी सैनिकांच्या पत्नीचे नांव पूर्ण करुन देण्याची कार्यवाही जागेवरच करुन दिली व संबंधितांस त्याची प्रत सुपूर्द करण्यात आली. यावेळी बँकेशी निगडीत बाबींचे निराकरण करणेसाठी येथील स्टेट बँक ऑफ इंडिया, ट्रेझरी शाखा व बँक ऑफ महाराष्ट्र कॅम्प शाखा येथील प्रतिनिधी उपस्थित होते.



## माजी नगरसेवक गायकवाड यांनी प्राथमिक सदस्यत्वाचा दिला राजीनामा

### भाजपासह राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ नोव्हेंबर-**

सोलापूर महापालिकेची सार्वत्रिक निवडणूक तोंडावर असतानाच इतर पक्षातील पदाधिकारी व माजी लोकप्रतिनिधींना भाजपमध्ये घेऊ नये म्हणून भाजप कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांचा तीव्र विरोध आणि आंदोलने होत आहेत तर दुसरीकडे भाजपचे माजी नगरसेवक असलेले रवी गायकवाड यांनी थेट भाजपच्या प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा दिला आहे. यामुळे भाजपासह राजकीय वर्तुळात उलट - सुलट चर्चा होत आहे.

भाजपाचे माजी नगरसेवक रवी गायकवाड यांनी भाजप पक्षातील प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा दिला आहे. शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर यांची भेट घेऊन त्यांनी आपल्या राजीनाम्याचे पत्र दिले आहे. आज बुधवारी सकाळी ते भाजपा पक्ष कार्यालयात दाखल झाले. शहराध्यक्ष रोहिणी तडवळकर यांची भेट घेऊन त्यांनी आपल्या राजीनाम्याचे पत्र त्यांच्याकडे दिले.

भारतीय जनता पार्टीचा सन २०१७ पासून नगरसेवक म्हणून कार्य करीत होतो. गेल्या कांही वर्षापासून भाजपाचे केंद्रीय मंत्री अमीत शहा, राज्याचे मंत्री चंद्रकांत पाटील वगैरे नेते संविधान निर्माते विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर व इतर मागासवर्गीय नेत्यांवर अपशब्दात अपमान करीत आहेत. हे आमच्या मनाला पटत नसल्याने भारतीय जनता पार्टीच्या प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा सादर करीत आहे, असे माजी नगरसेवक रवी गायकवाड यांनी राजीनामा पत्रात म्हटले आहे.

महापालिकेच्या रणधुमाळीपूर्वी दिलेल्या या राजीनामामुळे राजकीय वर्तुळात उलट - सुलट चर्चा होत आहे. अंतर्गत मतभेद आहेत का? याबाबत सध्या तरी अधिकृत भूमिका समोर आलेली नाही. पण या निर्णयामुळे मागासवर्गीय समाजातील प्रभागात नक्कीच फटका बसणार असे बोलले जात आहे.यावर आता भाजपाचे नेते काय तोडगा काढणार? याकडे लक्ष लागले आहे.

# अक्कलकोटमध्ये अतिवृष्टीची नुकसान भरपाई अद्याप नाही

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.५ नोव्हेंबर-**

दिवाळी संपली तरी अनेक शेतकऱ्यांच्या खात्यावर अतिवृष्टी नुकसानीचा एक दमडाही पैसा बँक खात्यावर जमा झाला नाही. सरकाराच्या जीवावर दिवाळी सण साजरा करणाऱ्या अनेक शेतकऱ्यांना अक्षरशः काळी दिवाळी साजरी करावी लागली.

शेतकऱ्यांचा आर्थिक कणा मोडला आहे. पोकळ घोषणाबाजीने शेतकरी संतप्त प्रतिक्रिया व्यक्त करीत आहेत. दिवाळीपूर्वी अतिवृष्टी नुकसान भरपाई देण्याचे सरकारने आश्वासन दिले. अतिवृष्टी पावसामुळे हात उसने कर्ज बाजरी करून जोपासलेले पिके मातीमोल झाली, पिकांसह शेतीही वाहून गेली, सर्वत्र पाणीच पाणी झाले. यंदा पिके बहरली असतांनाच अचानक अस्मानी संकट कोसळले. होत्याचे नव्हते झाले. शासकीय पातळीवरून मदतीची मोठी घोषणाही करण्यात आली. दिवाळीच्या आत पैसे शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्याचे सरकारने आश्वासन दिल्याने लवकरच मदत मिळेल, असा आशेचा किरण मनात ठेऊन बसलेला शेतकरी निराशेच्या अंधारात बुडाला आहे. बँकांची कोणत्याही कर्जाला नकार घंटा आहे. खर्चासाठीही त्यांची ओढाताण सुरू असून शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत. सरकारच्या दुर्लक्षामुळे अनेक शेतकऱ्यांच्या कुटुंबाची दीपावली सण अंधारात गेला आहे. रब्बी पेरणी पण रखडली आहे.

> दिवाळीपूर्वी अतिवृष्टी नुकसान भरपाई देण्याचे सरकारने आश्वासन दिले. परंतु दिवाळी संपली तरी माझ्या खात्यावर अतिवृष्टीचा एक दमडाही बँक खात्यावर अद्याप जमा झाला नाही.
>
> **- शिवाजी बेडगे,** शेतकरी, कुरनुर ता. अक्कलकोट.

> माझी बोरी उमरगेत अडीच एकर शेती आहे. दिवाळी झाल्यानंतर आठ दिवसांनी मला फक्त ६८०० रु मिळाले. वास्तविक शासन निर्णयानुसार अडीच एकर शेती असणाऱ्या शेकऱ्यांना १८,५०० रु पैकी पहिला हप्ता ८५०० मिळावा. परंतु मला फक्त ६,८०० रु जमा झाले आहेत.
>
> **- लक्ष्मीपुत्र वागदरी,** शेतकरी, बोरी उमरगे ता. अक्कलकोट.



## आगामी निवडणुकीत तरुणांना देणार संधी

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि.५ नोव्हेंबर-**

आगामी निवडणुकीत ७० टक्के तरुणांना संधी देण्याचे पक्षाचे धोरण आहे. त्याचबरोबर स्थानिक स्तरावर आघाड्या जरी झाल्या तरी आपापल्या चिन्हावर लढणार आहोत, या सर्वांना आपण ताकद देऊन पाठिंबा द्यायचा आहे. आपल्याला सगळीकडे स्पष्ट बहुमत मिळवायचे आहे, असे आदेश माढयाचे खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी दिले.

आगामी सर्व निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचा मेळावा मोहोळ मध्ये झाला. यावेळी खासदार ते बोलत होते. यावेळी माजी आमदार रमेश कदम, संजय (आण्णा) क्षीरसागर, ॲड. पवन गायकवाड, जिल्हाध्यक्ष वसंतनाना देशमुख, महिला जिल्हाध्यक्ष शिवपुरे ताई, युवती जिल्हाध्यक्ष विनंती कुलकर्णी, ओबीसी जिल्हाध्यक्ष अरुण तोडकर, मोहोळचे माजी सरपंच अशोक देशमुख आदी उपस्थित होते.

# शिवाजी महाराज पुतळा परिसर सुशोभीकरणाचे काम १० जानेवारीपर्यंत करा

## वेळेत काम पूर्ण न केल्यास ब्लॅकलिस्टमध्ये टाकण्याची मक्तेदारास महापालिकेची नोटीस

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ नोव्हेंबर-**

सोलापूर शहरातील श्री छत्रपती शिवाजी महाराज पुतळा व परिसर सुशोभीकरणाचे काम दि. १० जानेवारी २०२६ अखेरपर्यंत पूर्ण करावे. ठरविलेल्या मुदतीत काम पूर्ण न केल्यास टेंडरमधील अटी व शर्तींनुसार मक्तेदारावर कारवाई करण्यात येईल.

प्रती दिन १० हजार रुपये दंड आकारण्यात येईल. तसेच मक्तेदारांनी वेळेत काम पूर्ण न केल्यास त्यांना ब्लॅकलिस्टमध्ये कायम स्वरूपी टाकण्यात येईल.कुठल्याच निविदा प्रक्रियेमध्ये त्यांना सहभाग घेता येणार नाही, अशी नोटीस महापालिका प्रशासनाने संबंधित मक्तेदाराला बजावली आहे. सोलापूर महानगरपालिकेच्या नावीन्यपूर्ण योजना सन २०२२-२३ अंतर्गत श्री छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे श्री छत्रपती शिवाजी महाराज पुतळा व परिसर सुशोभीकरणाचे काम मंजूर करण्यात आले असून, सदर कामाची ई-निविदा प्रक्रिया पूर्ण करून हे काम ठेकेदार सुरज दादासाहेब शिंदे (रा. दिघी, ता. हवेली, जि. पुणे) यांच्या नावे मंजूर करण्यात आले आहे. या कामाची वर्कऑर्डर दिनांक ४ मार्च २०२४ रोजी देण्यात आली असून, ठरविलेल्या अटींनुसार कामाची मुदत ६ महिने निश्चित करण्यात आली होती. तथापि, या कालावधीत काम समाधानकारकरीत्या पूर्ण झाले नसल्याचे आढळून आले. दि. २९ मे २०२५ रोजी मनपाच्या अधिकाऱ्यांनी केलेल्या पाहणीत काम बंद असल्याचे निदर्शनास आले. त्यानंतरही काम अत्यंत संथ गतीने सुरू असल्यामुळे संबंधित ठेकेदारास नोटीस क्र.०१ व क्र.०२ देण्यात आल्या असून, काम गतीने पूर्ण करण्याचे निर्देश वारंवार देण्यात आले होते.

दरम्यान, दिनांक १४ ऑक्टोबर २०२५ रोजी शिवजन्मोत्सव मध्यवर्ती मंडळाचे पदाधिकारी यांनी स्वतः भेट देऊन पाहणी केली असता, कामाची गती अत्यंत मंद असल्याचे मत त्यांनी नोंदविले. हे काम लवकरात लवकर पूर्ण करण्यात यावे, अशी मागणी केली होती. स्थानिक नागरिक व लोकप्रतिनिधींकडूनही या कामाबाबत सातत्याने पाठपुरावा सुरू आहे.या परिस्थितीचा विचार करता सोलापूर महानगरपालिकेच्या बांधकाम विभागाने संबंधित ठेकेदारास तातडीने युद्धपातळीवर काम पूर्ण करण्याचे आदेश दिले आहेत.

सोलापूर महानगरपालिका प्रशासनाने कामाच्या गुणवत्तेवर आणि वेळेत पूर्णतेवर भर देत, नागरिकांना उत्तम दर्जाचे आणि आकर्षक सार्वजनिक ठिकाण उपलब्ध करून देण्याचे स्पष्ट केले आहे.

**संबंधित ठेकेदाराने तातडीने काम पूर्ण करणे आवश्यक : आयुक्त डॉ. ओम्बासे**

महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी या संदर्भात सांगितले की, ''श्री छत्रपती शिवाजी महाराज पुतळा व परिसर सुशोभीकरणाचे काम हे शहराच्या ऐतिहासिक व सांस्कृतिक ओळखीशी निगडीत महत्त्वाचे आहे. या कामात होणारा विलंब नागरिकांना अस्वस्थ करणारा असून, संबंधित ठेकेदाराने तातडीने काम पूर्ण करणे आवश्यक आहे. महानगरपालिकेच्या वतीने कामाच्या प्रगतीवर सातत्याने लक्ष ठेवले जाईल.''


प्रशांत माने | कुलदीप जंगम | डॉ. सई गुंड | डॉ.संदीप तांबारे | विनय गोवर्धन | दिलीप ढेरे | अनिता सराटे

# एकता महिला मंचचे राज्यस्तरीय उत्कृष्ट सेवा गौरव पुरस्कार जाहीर

- दैनिक तरुण भारतचे मुख्य संपादक प्रशांत माने यांचा समावेश
- वैराग येथे रविवारी पुरस्कार वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.५ नोव्हेंबर-**

बार्शी तालुक्यातील वैराग येथील एकता महिला मंचच्या वतीने विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांना राज्यस्तरीय उत्कृष्ट सेवा गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.

दैनिक तरुण भारतचे मुख्य संपादक प्रशांत माने यांच्यासह अन्य सहा जणांस या पुरस्काराने गौरवण्यात येणार आहे. रविवार ९ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता साई कॉलेज हॉल, वैराग येथे पुरस्कार वितरण सोहळा होणार आहे, अशी माहिती मंचचे निमंत्रक प्रभाकर क्षीरसागर यांनी पत्रकार परिषदेत दिली. सन्मानचिन्ह, शाल व पुष्पगुच्छ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. एकता महिला मंचच्या वतीने सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक यासह विविध उपक्रम राबविण्यात येतात. यावर्षी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांना गौरविण्यात येणार आहे. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून खा. ओमराजे निंबाळकर, आ. दिलीपराव सोपल, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या पत्रकार परिषदेस कविता दसवंत, वसुधा कुंभार, रीना गुरव, मथुरा दसवंत, लक्ष्मी सुतार, नूरजहा शेख आदी उपस्थित होते.

**यांचा होणार पुरस्काराने गौरव**

दैनिक तरुण भारतचे मुख्य संपादक प्रशांत माने, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, स्त्रीरोग तज्ञ डॉ. सई गुंड, व्यसनमुक्ती तज्ञ डॉ. संदीप तांबारे, उद्योजक विनय गोवर्धन, सहायक पोलीस निरीक्षक दिलीप ढेरे, सोलापूर कृषी विज्ञान केंद्रातील शास्त्रज्ञ अनिता सराटे-शेळके.

# सोलापुरात 'आयटी पार्क' अन् 'नाईट लँडिंग'ची गरज

**भावी पिढीसह बुजुर्ग नागरिकांचीही अपेक्षा**

**तभा वृत्तसेवा । अविनाश गायकवाड**
**सोलापूर, दि. ५ नोव्हेंबर-**



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या सूचनेनुसार सोलापुरातील आयटी पार्कसाठी जागा पाहणी काही दिवसापुर्वीच करण्यात आली. यात अनेक ठिकाणच्या जागाही पाहण्यात आल्या असून, यातील होटगी येथील जलसंपदा विभागाची ५० एकर जागा जिल्हाधिकाऱ्यांनी पसंद केली आहे. कारण या जागेत केवळ ५० कोटीच्या निधीतून आयटी पार्क उभारणे शक्य होणार आहे. तर सोलापूर-मुंबई विमानसेवा उद्घाटन दौऱ्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी येत्या काळात नाईट लँडींग सुविधा निर्माण करण्याचे सुतोवाच केले आहे.

या दोन्ही महत्वाकांक्षी कामांसाठी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद हे सातत्याने प्रयत्न करीत आहेतच मात्र यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनीही त्यांना साथ देण्याची तितकीच गरज असल्याचे मत शहरातील जाणकार नागरिकांनी दैनिक तरूण भारतशी संवाद साधताना मांडले. जिल्हाधिकाऱ्यांनी आयटी पार्कसाठी सोलापुरातील जुनी मिल परिसराची जागा पाहणी प्रथम केली होती मात्र ही जागा अपुरी असल्याचे आयटी पार्क मधील तज्ज्ञांनी व्यक्त केले. हिरज येथील जागेचीही यासाठी पाहणी करण्यात आली. हिरज येथील जागा योग्य होती, मात्र ही जागा माळढोक क्षेत्रात येत असल्याने ही जागा अडचणीची ठरली. त्यामुळे आयटी पार्कसाठी होटगी रोडवरील जागेस पसंती दिली आहे आणि त्याचा अहवाल शासनाकडे गेलाही आहे; आता या अहवालाला गती येण्याची गरज आहे.

यापूर्वी सोलापूरच्या चोहोबाजुंनी महामार्ग निर्माण झाले असून, वंदे भारत या एक्स्प्रेसचीही जोड मिळाली आहे. यामुळे आता डे बरोबर नाईट विमानसेवेची तितकीच गरज आहे. आयटी पार्क लवकर सुरू झाल्यास या सेवेमुळे सोलापूरच्या उच्च शिक्षित युवा वर्गाला सोलापुरातच नोकरी मिळून स्थलांतर होण्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे.सोलापूर-गोवा या विमानसेवेनंतर सोलापुरात नव्याने सुरू करण्यात आलेल्या सोलापूर- मुंबई विमानसेवेमुळे सोलापूर परिसरातील औद्योगिक विकासाला गती मिळणार आहे. धार्मिक पर्यटनक्षेत्रालाही चालना मिळून रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होतील.

येत्या काळात सोलापूरला नाईट लँडींग सुविधा आणि मोठे बोईंग विमानसेवा सुरू करण्याचे प्रयत्न करण्यात येतील, त्यासाठी नागरिकांनी सहकार्य करावे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री फडणवीस यांनी नुकतेच केले आहे. यासाठी जिल्हाधिकारी आशीर्वाद हेही विशेष प्रयत्न करीत आहेत. इतकेच कायतर बोरामणी विमानतळासाठीसुध्दा दुसऱ्यांदा शासन स्तरावर जिल्हाधिकाऱ्यांनी पाठपुरावा केला होता मात्र माळढोकमुळे केंद्रीय वनविभागाचा या विमानतळास विरोध होत आहे. यासाठी स्थानिक नेत्यांनीही केंद्रात राजकीय वजन वापरणे गरजेचे आहे. किमान जुन्या विमानतळावर नाईटलँडिंगची सुविधाही निर्माण झाल्यास शहराचा विकास, रोजगार निर्मिती आणि औद्योगिक विकासासाठी ही हवाई सेवा महत्वाची ठरणार आहे. उद्योजक डे-नाईट हवाई सेवेची उपलब्धता पाहून गुंतवणुकीचा निर्णय करतात. जगाच्या बाजाराशी जोडले जात असतांना नाईटचीही विमानसेवा असणे महत्वाचे आहे. विमानसेवेचे महत्व लक्षात घेवून केंद्र सरकारने आरसीएससारखी योजना सुरू केली. नाईट लँडिंग सुविधेमुळे पंढरपूर, तुळजापूर, सोलापूर, अक्कलकोट, गाणगापूर ही धार्मिक स्थळे मुंबईशी जोडली जावून भाविकांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढून रोजगारही वाढणार आहे.

**वस्त्रोद्योगालाही मिळणार चालना :** सोलापूर राज्यातील दक्षिण-पश्चिमेकडील महत्वाचा जिल्हा आहे. देवभूमी म्हणून या जिल्ह्याची ओळख आहे. वस्त्रोद्योगासाठी हा जिल्हा प्रसिद्ध आहे. विमानसेवेच्या माध्यमातून सोलापूर देशाच्या आर्थिक राजधानीला जोडले जात असल्याने उद्योग-शेती विकासाला चालना मिळून रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. सोलापूर चादर-टॉवेल, सोलापुरी शेंगा चटणीचेही चांगले मार्केटिंग होणार आहे. येत्या काळात हैद्राबाद आणि तिरुपतीसारख्या शहरांना जोडणारी विमानसेवा सुरू करण्यात येणार आहे. यामुळे सध्या शहरात आयटी पार्क, नाईट लँडिंग सुविधा झाल्यास औद्योगिक विकासाला गती मिळेल, असा विश्वास सर्वांनाच सध्यातरी वाटत आहे.

# भगवतगीतेतील सखोल ज्ञानामुळेच मनुष्य कल्याण शक्य

**हभप श्री चैतन्य महाराज देगलूरकर : विकास सहकारी बँकेतर्फे वाग्यज्ञ प्रारंभ**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ५ नोव्हेंबर-**



भगवान श्रीकृष्णांनी अर्जुनाला सांगितलेली भगवद्गीता समस्त मानवाच्या उत्थानासाठी आहे. त्यातील सखोल ज्ञानामुळेच म नुष्य कल्याण शक्य असल्याचे प्रतिपादन ज्ञानेश्वरीचे ज्येष्ठ उपासक व प्रवचनकार ह.भ.प. चैतन्य महाराज देगलूरकर केले.

विकास सहकारी बँकेतर्फे येथील हेरिटेज लॉन्सवर तीन दिवसीय 'वाग्यज्ञ' ला बुधवारी प्रारंभ झाला. यावेळी ह. भ. प. चैतन्य महाराज देगलूरकर 'म्हणोनि जेथ श्री श्रीमंतु' (कर्तुत्व आणि कृपा) या श्री ज्ञानेश्वरीतील १८ व्या अध्यायातील ओवीवर सलग तीन दिवस प्रवचन करत आहेत.या वाग्यज्ञाचे उद्घाटन दीपप्रज्वलनाने झाले. यावेळी व्यासपीठावर विकास सहकारी बँकेचे अध्यक्ष कमलकिशोर राठी, ज्येष्ठ संचालक राजगोपाल मिणियार, राजगोपाल चांडक, हरीनिवास जाजू, पांडुरंग मंत्री, मनीष बलदवा, ज्योती आसावा, प्रवीण बजाज, सुनील माहेश्वरी यांची उपस्थिती होती.

ह.भ.प. चैतन्य महाराज देगलूरकर म्हणाले, ''जो व्यक्ती विचार करून बोलतो, तो भक्त असतो आणि जो केवळ ऐकून बोलतो, तो श्रोता. भगवद्गीता ऐकल्यानंतर केवळ अर्जुनाच्या मनात संशय निर्माण झाला, कारण त्याला आत्मिक ज्ञान मिळवायचे होते. याउलट, धृतराष्ट्र आणि संजय यांच्या मनात संशय आला नाही. अज्ञानातून निर्माण झालेला मोह अज्ञान दूर झाल्यावरच नष्ट होतो आणि अंतःकरणातील मोह व संशय निघून गेल्यावरच जीवनाचे कल्याण होते, असेही त्यांनी सांगितले.

ते म्हणाले, गीतेचा पहिला श्लोक धृतराष्ट्राच्या मुखातून आला, जो गीतेचे सार कुरुक्षेत्र आणि धर्मक्षेत्र या दोन शब्दांत सांगतो. यात आपण जीवनात कोणते कर्तृत्व गाजवले पाहिजे, याचा उल्लेख आहे. संजयसाठी देखील हाच उपदेश आहे. संपूर्ण गीतेमध्ये श्रीकृष्णाने अर्जुनाला स्वतःची भूमिका ओळखून धर्ममार्ग ओळखण्याची आणि त्याचे पालन करण्याची सूचना केली. ''माझे चांगले व्हावे, मलाच ज्ञान मिळावे, हे चांगले लक्षण नाही. आपला धर्म नक्की काय आहे हे ओळखण्याची गरज आहे,'' असे त्यांनी स्पष्ट केले.

संजयच्या एका श्लोकात संपूर्ण गीतेचे तत्त्वज्ञान व्यासांनी दिलेल्या वरदानामुळे संजयने धृतराष्ट्राला सर्व काही जसेच्या तसे सांगितले. तरीही सैन्यसंख्या आणि कर्तृत्वाच्या बळावर धृतराष्ट्राला कौरव विजयी होतील, असे वाटत होते. जेव्हा धृतराष्ट्राने याबाबत संजयला विचारणा केली, तेव्हा संजयने ''जिकडे योगेश्वर श्रीकृष्ण आणि धनुर्धर अर्जुन आहेत, तिकडे विजय निश्चित आहे,'' असे ठामपणे सांगितले. संजयाच्या मुखातील हा एक ओळीचा श्लोक संपूर्ण गीतेतील तत्त्वज्ञान सांगून जातो. सव्वा लाख श्लोकांचे सार केवळ ३२ अक्षरात सांगणे, ही संत श्री ज्ञानेश्वरांनी संजयला दिलेली एकप्रकारे शाबासकी आहे, विस्तारापेक्षा संकोचाला बुद्धी अधिक लागते. म्हणूनच कमी बोलणाऱ्याला जगात महत्त्व आणि त्यांच्या बोलण्याला वजन असते, हे देखील महाराजांनी जाणवून दिले.यावेळी विकास बँकेचे कर्मचारी वर्ग व नागरिक उपस्थित होते. सूत्रसंचालन संजीव कुसुरकर यांनी केले.

**सोलापूरकरांना उपस्थित राहण्याचे आवाहन**
ह. भ. प. चैतन्य महाराज देगलूरकर यांचे रसाळ वाणीतून होणारे प्रवचन गुरुवारी आणि शुक्रवारी दररोज सायंकाळी ६.३० वाजता गांधीनगर येथील हेरिटेज लॉन्स येथे होणार असून सोलापूरकरांनी उपस्थित रहावे, असे आवाहन विकास सहकारी बँकेतर्फे करण्यात आले आहे

# निवडणुकीच्या तोंडावर शहरात झळकू लागले बॅनर

**महापालिकेचे मात्र होतेय दुर्लक्ष**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ नोव्हेंबर-**



राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे बिगुल वाजेल आहे. पहिल्या टप्प्यात नगरपरिषद आणि नगरपालिकांच्या निवडणूका होणार आहेत. तर म हापालिका निवडणुकीचे आरक्षण सोडत दि.११ नोव्हेंबर रोजी जाहीर होणार असून त्या अनुषंगाने सोलापूर शहर परिसरात इच्छुकांची भाऊगर्दी वाढली आहे.

शहराच्या चौका चौकात बॅनर झळकत आहेत. कोणत्या ना कोणत्या निमित्ताने मतदारांना हे बॅनर आकर्षित करण्यासाठी लावण्यात आल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. दरम्यान, आगामी निवडणुका डोळ्यासमोर ठेवून इच्छुक आणि आजी-माजी नगरसेवक तयारीला लागलेले दिसत आहेत. वास्तविक पाहता नो बॅनर झोन असताना देखील हे बॅनर लावलेले दिसून येत आहेत. महापुरुषांच्या जयंतीनिमित्त काही ठिकाणी बॅनर लावलेले आहेत. त्यावर पक्षांचे चिन्ह तसेच इच्छुकांचे फोटो लावलेले दिसत आहेत. काहींनी जुना पक्ष सोडून भाजप प्रवेश केल्याने आपले बॅनर लावून पोस्टरबाजी करताना दिसत आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे वेळापत्रक जाहीर झाले असून आचारसंहिता देखील लागू झालेली आहे. असे असतानाही महापालिका प्रशासनाचे याकडे सातत्याने दुर्लक्ष होत आहे.

सोलापूर शहरातील जुळे सोलापूर भागात, गुरुनानक चौक तसेच अंत्रोळीकर नगर परिसरात हे पोस्टर लावलेले दिसत आहेत. वाढदिवसानिमित्त तसेच महापुरुषांच्या जयंती उत्सवानिमि त्त शहरातील प्रमुख चौकात बॅनर झळकत असल्याने महापालिका प्रशासनाच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे.



## पद्मश्री स्व. मारुती चित्तमपल्ली यांची जयंती साजरी

**सोलापूर, दि. ५ नोव्हेंबर-**

तेलुगु भाषा अभिवृद्धी सार्वजनिक ग्रंथालयम येथे पद्मश्री स्व. मारुती चित्तमपल्ली यांची ९४ वी जयंती साजरी करण्यात आली. चितमपल्ली यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन पद्मशाली शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ॲड. श्रीनिवास क्यातम तसेच चित्तमपल्ली यांच्या परिवाराचे सदस्य व मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे ॲड. श्रीनिवास क्यातम यांनी मारुती चित्तमपल्ली यांच्या आठवणी विशद केल्या. कवयित्री रेणुका बुधारम यांनी एक तेलुगू गीत सादर करून अभिवादन केले. कवी प्रा.नरेंद्र गुंडेली यांनी त्यांच्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष पद कार्यक्रमाच्या स्मृती जागृत केल्या. कार्यक्रमाचे अध्यक्षीय समारोपात मल्लिकार्जुन कमटम यांनी निसर्ग, पशुपक्षी यांचा त्यांच्या सेवेच्या कार्यकाळात केलेले निरीक्षण, नोंदी, सेवा व योगदान याबद्दल आपले मत व्यक्त केले. ग्रंथालयाचे सहसचिव प्रभाकर भिमनाथ यांनी आभार मानले.

# कवीतेत जन्म झाला कवीतेत अंत झाला...

**सोबतीचा करार कार्यक्रमाने तीन दिवसीय गझल महोत्सवाचा समारोप**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ नोव्हेंबर-**



मी एवढेच केले हसलो मनाप्रमाणे, रडलो मनाप्रमाणे, जगलो मनाप्रमाणे, कवितेत जन्म झाला कवीतेत अंत झाला. या व अन्य कविता सादर करीत सोबतीचा करार या कार्यक्रमातून गायक दत्तप्रसाद रानडे, कवी वैभव जोशी यांनी तीन दिवसीय गझल महोत्सवाचा समारोप केला.

महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक कार्य विभाग सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीने सोलापूरच्या हुतात्मा स्मृती मंदिरात तीन दिवशीय गझल महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. सोलापूरचे सुपुत्र कवी वैभव जोशी यांनी आपल्या कविता सादर करताना कवीचे आयुष्य सोपे असते असे सांगून शब्द माझा कबीर झाला. ही कविता त्याच बरोबर प्रेमी युगलांवरील अनेक कविताही त्यांनी सादर केल्या. खरे हसणे कुठे गेले ऋतुचा हात धरूनी आपले फुलणे कुठे गेले जुन्या फोटोत दिसणारे खरे असणे कुठे गेले स्वतःचा वाटणारा चेहरा हा चेहरा नाही अरे या आरशातील कालचे असणे कुठे गेले ही कविता सादर केल्यानंतर रसिक श्रोत्यांनी चांगलीच दाद दिली. तर गायक दत्तप्रसाद रानडे यांनी हसलो मनाप्रम ाणे, काय सांगायचे, तू धुक्यासारखी मी उन्हासारखा, आठवण., शेवटी काही, आई, धीरे धीरे, मोजकी उन्हे, गझल ऐकून ती म्हणते, त्या क्षणी, शेवटी शेवटी आणि विठ्ठल ही गीते सादर करून सभागृहात महौल तयार केला. या कवी आणि गायकांच्या कार्यक्रमासाठी संगीत दिग्दर्शन आशिष मुजुमदार यांनी केले तर हार्मोनियमवर निनाद सोलापूरकर, गिटार मिलिंद शेवारे, तबला समीर शिवगार, ढोलक अमोद कुलकर्णी यांनी साथ संगत केली तर या कार्यक्रमाचे निर्माते शैलेश नांदुरकर होते.

प्रारंभी राज्यगीताने कार्यक्रमाची सुरूवात झाली त्यानंतर ज्येष्ठ मराठी हिंदी कलावंत भारतीताई आचरेकर यांचा रंगभूमी दिनानिमित्त सांस्कृतिक कार्य विभागाचे सहदेव खैरे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन लक्ष्मीकांत वेदपाठक यांनी केले तर आभार प्रदर्शन कार्यक्रमाचे समन्वयक अमोल धाबळे यांनी केले. सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांच्या संकल्पनेतून सचिव डॉ. किरण कुलकर्णी आणि संचालक विभिषण चवरे यांच्या प्रयत्नातून हा गझल महोत्सव सोलापूर येथे पार पडला. पहिल्या दिवशी अक्षर अक्षर तुझेच आहे आणि गझल रंग हा कार्यक्रम अपूर्व राजपूत, अविनाश काठवटे, सारंग पांपटवार आणि नैनेश तांबे यांनी सादर केले. तर संगीत संयोजन राग आणि प्रकाश योजना ईशान- गार्गी यांनी केले. दुसऱ्या दिवशी गझल नवाज भीमराव पांचाळे आणि त्यांची कन्या डॉ. भाग्यश्री पांचाळे- गायकवाड यांनी गझल सादर करून रसिक श्रोत्यांची वाहवा मिळवली आणि या कार्यक्रमाचा समारोप कवी वैभव जोशी आणि गायक दत्तप्रसाद रानडे यांनी केला. रसिक श्रोत्यांनी गर्दी केली होती. आयोजन आणि रंगमंचावरील सजावट समन्वयक अमोल धाबळे यांनी केले. सांस्कृतिक विभागाच्या अधिक्षक जानव्ही जानकर, उद्योगपती दत्ताआण्णा सुरवसे, सहाय्यक पोलीस आयुक्त राजन माने, पोलीस निरीक्षक नामदेव शिंदे, यांच्यासह अनेक मान्यवरांनी हजेरी लावली.

# सुवर्णकाळ समृद्ध अन् जाज्वल्य मराठी रंगभूमीचा!

- व्यवसायिक नाटकांना सोलापूरच्या रसिक प्रेक्षकांमधून मिळतोय उत्स्फूर्त प्रतिसाद; सोलापूरच्या नाट्यकलावंतांमधून व्यक्त केला जातोय आत्मविश्वास

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.५ नोव्हेंबर**




मराठी रंगभूमीचा इतिहास हा जाज्वल्य असा आहे. तसेच तो आपल्या संस्कृतीचा अभिमानाचा एक महत्वपूर्ण भाग आहे. ५ नोव्हेंबर हा मराठी रंगभूमी दिन म्हणून साजरा केला जातो. या दिवशी इ.स. १८४३ मध्ये विश्रामभाऊ भाऊसाहेब किर्लोस्कर यांनी सादर केलेले ''सीता स्वयंवर'' हे पहिले मराठी नाटक रंगभूमीवर आले. त्यातून मराठी नाट्यकलेचा सुवर्ण प्रवास सुरू झाला. त्यामुळेच राज्यभरात आजचा हा दिवस सुवर्ण अक्षरांनी कोरला असून राज्यात हा दिवस जागतिक मराठी रंगभूमी दिन म्हणून एक नाट्य कलावंत अभिमानाने साजरा करत आहे.

प्रारंभीच्या काळात नाटके धार्मिक, पौराणिक आणि संगीतप्रधान स्वरूपाची होती. किर्लोस्करांच्या पावलावर पाऊल ठेवत बालगंधर्व, विष्णुदास भावे, अण्णासाहेब किर्लोस्कर, खाडिलकर, गोविंदाग्रज (राम गणेश गडकरी) या थोर कलाकारांनी आणि लेखकांनी मराठी रंगभूम ीला वेगळी ओळख दिली. १९व्या शतकात संगीत नाटकांचा युग आले. ''संगीत शाकुंतल'', ''संगीत मानापमान'', ''संगीत सौभद्र'' यांसारख्या नाटकांनी मराठी रसिकांना मंत्रमुग्ध केले. बालगंधर्वांनी स्त्री भूमिका अप्रतिमपणे साकारून मराठी रंगभूमीला अमरत्व दिले. त्यापुढे पारसी थिएटरचा प्रभाव, सामाजिक नाटकांची परंपरा आणि राजकीय जाणीवेची नाटके या माध्यमातून मराठी नाट्यविश्वाने समाजात जागृती घडवली. ''संगीत नाटकांपासून प्रयोगशील रंगभूमीपर्यंत'' हा प्रवास अत्यंत समृद्ध आणि सर्जनशील राहिला आहे.

आधुनिक काळात विजय तेंडुलकर, महेश एलकुंचवार, पुलं देशपांडे, रत्नाकर मतकरी, विजय केंकरे अशा अनेक दिग्गजांनी नाटकांच्या आशयात व स्वरूपात नवे प्रयोग केले. आजही मराठी नाटक समाजमनाशी जोडलेले आहे आणि नव्या पिढीतील कलाकार त्याला नव्या रूपात सादर करीत आहेत. मराठी रंगभूमी ही केवळ मनोरंजनाचे साधन नसून ती समाजाचे आरसे आहे. ती विचार घडवते, संस्कार घडवते आणि संस्कृती जपते. म्हणूनच ५ नोव्हेंबर हा दिवस सर्व नाट्यप्रेमींसाठी अभिमानाचा आणि प्रेरणेचा दिवस ठरतो.

**व्यवसायिक नाटकांना उत्स्फूर्त प्रतिसाद**



सोलापुरात जवळपास १० नवीन व्यवसायिक नाटके सादर झाली आहेत. या सर्व व्यवसायिक नाटकांना सोलापूर नाट्य रसिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला आहे. याचा आम्हाला विशेष आनंद आहे. यापैकी संकर्शन कऱ्हाडे व वंदना गुप्ते यांचे कुटुंब कीर्तन हे नाटक तर ॲडव्हान्स मध्येच हॉउसफुल्ल झाले आहे. एकंदरीत या नाट्य व्यवसायला सोलापुरात आलेली मरगळ आता दूर झालेली आहे. असे चित्र दिसत आहे, त्यामुळे आगामी काळात देखील सर्व सोलापूरच्या नाट्य रसिक प्रेक्षकांना एकाहून एक दर्जेदार नाटके पाहाव्यास मिळतील.

**- शिवाजी उपरे, नाट्य वितरक आणि व्यवस्थापक**

**उत्तम नाट्य कलेची रसिकांना जाण**



सोलापूर शहरातील नाट्य कलावंतांना उत्कृष्ट आणि दर्जेदार नाट्यकलेची चांगली जाण आहे. आगामी काळात सोलापूर शहरात सयाजी शिंदे यांचे एक नाटक होणार आहे. त्यासाठी रसिक प्रेक्षकांमधून उत्सुकता आहे. दर्जेदार आणि गुणवत्तापूर्ण नाटक पाहण्यासाठी प्रेक्षक येतात. त्याचप्रमाणे शासनाच्या राज्य नाट्य स्पर्धेच्या माध्यमातून कलावंत घडत आहेत. मराठी रंगभूमी इतर राज्यांच्या तुलनेने अधिक समृद्ध आहे. मात्र नाटक सादर करताना नाट्यगृहाची अवस्था नीटनेटकी आणि व्यवस्थित असावी. नाट्यकलावंतांना आपली सादर करताना वातावरण प्रसन्नमय असावे. जेणेकरून इतर जिल्ह्यातून आलेल्या नाट्य कलावंतांना कमतरता जाणवणार नाही.

**- गुरु वठारे, सदस्य रंगभूमी प्रयोग परि निरीक्षण मंडळ महाराष्ट्र शासन मुंबई.**

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, श्री. मसलेकर निवास, जिल्हा न्यायालय पाठीमागे, समर्थ नगर, धाराशिव (उस्मानाबाद) ४१३५०१, कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ९७६७०९९७११ / ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. RNI No. MAHMAR/2023/86468. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003.**Publised at** TARUN BHARAT OFFICE Mr. Maslekar Residence, Behind District Court, Samarth Nagar, Dharashiv. PIN - 413501 |**RNI No. MAHMAR/2023/86468**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

CMYK

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## ऑनलाईन कामाच्या आमिषाने फसवणूक : बनावट आयडी तयार करून कर्ज घेतले

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ नोव्हेंबर -**
घरबसल्या ऑनलाईन काम देण्याचे आमिष दाखवून एका व्यक्तीची फसवणूक केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी आनंदनगर पोलीस ठाण्यात आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी पवन जाधव (रा. लोहारा, ता. लोहारा, जि. धाराशिव) याने फिर्यादी विलास मधुकर देशमुख (वय ४२, रा. पोहनेर, ता. व जि. धाराशिव) यांचा विश्वास संपादन केला. त्याने फिर्यादीस सांगितले की, कंपनीचे घरबसल्या ऑनलाईन काम आहे, त्यासाठी इंस्टाग्रामवर कंपनीचा आयडी काढावा लागेल. असे सांगून त्यांना विश्वासात घेतले.

यानंतर आरोपीने बजाज फायनान्स धाराशिव येथे बनावट आयडी तयार करून २५ हजार ९७५ रूपयांचे कर्ज मंजूर करून घेतले आणि फिर्यादीची फसवणूक केली.

या घटनेबाबत फिर्यादी विलास देशमुख यांनी दि.४ नोव्हेंबर रोजी आनंदनगर पोलिसांकडे तक्रार दाखल केली. त्यावरून पोलिसांनी आरोपी पवन जाधव याच्याविरुद्ध गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.



## ▶▶ संक्षिप्त वृत्त...



### भारतीय किसान संघातर्फे जनावरांसाठी होमिओपॅथी औषधांचे वाटप

**धाराशिव, दि.५ नोव्हेंबर -**
भारतीय किसान संघ शेतकऱ्यांच्या जनावरांच्या मदतीसाठी पुन्हा होमिओपॅथीच्या औषधांचे किटचे तुळजापूर तालुक्यातील किलज, जवळगा, वडगाव, सलगर (दि.), काक्रंबा येथील शेतकऱ्यांना वाटप करण्यात आले. भारतीय किसान संघाने यापूर्वी कोल्हापूर सांगलीच्या महापुरामध्ये जनावरांसाठी होमिओपॅथी औषधे उपलब्ध करून दिली होते. या औषधांच्या किटची किंमत ३२० रुपये आहे. भारतीय किसान संघाकडून ते विनामूल्य उपलब्ध करून देण्यात आले आहे. औषधांच्या वितरण भारतीय किसान संघ जिल्हा अध्यक्ष नितीन घुले वाशी यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी तुळजापूर तालुकाध्यक्ष अभिजित पांढरे सिंदफळ, अमोल सोमवंशी, प्रल्हाद सगर किलज व कार्यकर्ते उपस्थित होते.



### नंदकुमार तेललवार यांचा सेवानिवृत्ती सन्मान सोहळा संपन्न

**अणदूर, दि.५ नोव्हेंबर -**
जवाहर माध्यमिक व उच्च विद्यालय, अणदूर येथे व्हर्टिकल्चर विभागातील शिक्षक नंदकुमार तेललवार यांच्या सेवानिवृत्ती निमित्त त्यांचा संस्थेच्या वतीने सन्मान करण्यात आला. या प्रसंगी संस्थेचे सचिव रामचंद्र आलुरे, आण्णा महाराज घोडके, मुख्याध्यापक गोपाळ कुलकर्णी, सुरेश ठोंबरे आदी मान्यवर उपस्थित होते. तेललवार यांचा सपत्नीक सन्मान, भरपेहराव, आहेर व विठ्ठल-रुक्मिणी मूर्ती भेट देऊन करण्यात आला. कार्यक्रमात सुरेश ठोंबरे, देवदत्त पाटील, गोपाळ कुलकर्णी, विजय तेललवार यांनी त्यांच्या कार्याची प्रशंसा केली. तेललवार यांनी स्व. सि. ना. आलुरे गुरूजींप्रती कृतज्ञता व्यक्त करत, शिक्षण क्षेत्रातील अनुभव मांडले. अध्यक्षीय समारोपात रामचंद्र आलुरे यांनी त्यांची निष्ठा, प्रामाणिकपणा व परोपकारी वृत्ती यांचे कौतुक करून, शिक्षक कधीही माजी होत नाही; तो समाजाचा मार्गदर्शक असतो, असे सांगितले. कार्यक्रमास बालाजी घुगे, भागवत स्वामी, कोळी, बाशा शेख यांच्यासह शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन रोहित मोरे यांनी केले तर आभार सिध्देश्वर मसुते यांनी मानले.



### डॉ. संपदा मुंडे आत्महत्या प्रकरणी दोषींवर कारवाईची मागणी

**नळदुर्ग, दि.५ नोव्हेंबर -**
फलटण येथील महिला आरोग्य अधिकारी डॉ. संपदा मुंडे यांच्या आत्महत्येस कारणीभूत असलेल्या व्यक्तींवर तात्काळ कठोर कारवाई करावी, अशी मागणी धन्वंतरी डॉक्टर्स असोसिएशन नळदुर्ग, जळकोट, अणदुर व इटकळ यांच्या वतीने नळदुर्ग पोलिस ठाण्याचे निरीक्षक यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली. निवेदनात म्हटले आहे की, काही लोकांच्या मानसिक छळामुळे डॉ. मुंडे यांनी आत्महत्या केली. दोषींवर त्वरित गुन्हा दाखल करून कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. या निवेदनावर डॉ. सिद्रामप्पा खजुरे, डॉ. व्यंकटेश घुगे, डॉ. जितेंद्र पाटील, डॉ. अमरदीप कंदले यांच्यासह एकूण ३० डॉक्टरांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

### ▶▶ वाशी तालुक्यात शिंदे गटात खळबळ; काही कार्यकर्त्यांच्या पक्षबदलाच्या चर्चेला उधाण?

# धनुष्यबाण सोडून 'मशाल' हाती घेण्याची शक्यता?

**तभा वृत्तसेवा / सुधीर घोलप**
**वाशी, दि.५ नोव्हेंबर -**
वाशी तालुक्यातील आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुका जसजशा जवळ येत आहेत तसतसे राजकीय वातावरण तापू लागले आहे. सर्वच राजकीय पक्ष आता ॲक्शन मूडमध्ये असून उमेदवार निश्चिती, मतदारसंघनिहाय गणिते आणि आंतरिक गटबाजी या सगळ्यामुळे तालुक्यातील राजकारण चांगलेच रंगत आले आहे. पक्षनिहाय बैठका, कार्यकर्त्यांच्या हालचाली, प्रचाराच्या तयारीला सुरुवात झाली आहे.




सोशल मीडियावर अनेक ठिकाणी भावी जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य आणि सभापती पदाचे इच्छुक कार्यकर्ते सक्रिय होताना दिसत आहेत.

कार्यकर्त्यांकडून नेत्यांच्या भेटीगाठी, तिकीट मिळवण्यासाठी प्रयत्न आणि शक्तिप्रदर्शनाचा खेळ सुरू झाला आहे. धाराशिव जिल्ह्यातील परंडा विधानसभा मतदारसंघात सुद्धा राजकीय समीकरणे वेगाने बदलत आहेत. जरी युतीचे अधिकृत चित्र स्पष्ट नसले तरी महायुती आणि महाविकास आघाडीतील काही नेते एकाच मंचावर आल्याने चर्चेला उधाण आले आहे.

पक्षांतर्गत असंतोष, कुरघोडी आणि संभाव्य पक्षप्रवेशाच्या हालचाली यामुळे स्थानिक राजकारणात गती निर्माण झाली आहे. सूत्रांच्या माहितीनुसार वाशी तालुक्यातील शिंदे गटातील काही नेते आणि कार्यकर्ते धनुष्यबाणाची साथ सोडून मशालच्या दिशेने वाटचाल करू शकतात.

> वाशी तालुक्यात शिंदे सेनेत कोणतेही मतभेद नाहीत. सर्व कार्यकर्ते पक्षाशी निष्ठावान आहेत आणि एकदिलाने पक्षाच्या मागे उभे आहेत. काही जण स्वार्थासाठी वेगळा विचार करू शकतात पण त्यातून पक्षाला धक्का बसत नाही. आमचा विश्वास जनतेवर आहे, तिकीटावर नाही. शिंदे सेना वाशी तालुक्यात मजबूत आहे आणि पुढील निवडणुकीत आपली ताकद दाखवेल. काही लोक अफवा पसरवून गोंधळ निर्माण करत आहेत, पण आम्ही त्यांच्या दबावाला बळी पडणार नाही.
> **- सत्यवान गपाट,** तालुका प्रमुख, शिंदे सेना वाशी

काही ठिकाणी या कार्यकर्त्यांचे विरोधी पक्षांशी संपर्क वाढल्याची चर्चा राजकीय वर्तुळात जोर धरू लागली आहे. यामुळे शिंदे गटाला तालुक्यात खिंडार पडण्याची शक्यता निर्माण झाली असून पुढील काही दिवसांत काही राजकीय पक्षप्रवेश होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

वाशी तालुक्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या वेळी राज्याच्या लक्षवेधी निवडणुकांपैकी एक ठरण्याची शक्यता आहे.

कारण येथे सत्ताधारी आणि विरोधक दोघेही ताकदीने मैदानात उतरणार आहेत. पक्षांतर्गत असंतोष, उमेदवारांची लढाई आणि कार्यकर्त्यांची धावपळ यामुळे तालुक्यातील राजकीय वातावरण अजून अधिक तापले आहे.

दरम्यान, वाशी तालुक्यात शिंदे सेनेचा कोणता नेता खरोखरच पक्ष सोडून जाणार आणि कोण ठामपणे बाणाशी निष्ठा ठेवणार हे येत्या काही दिवसांत स्पष्ट होईल.

## केंद्रीय पथकाकडून धाराशिव जिल्ह्यातील पूरग्रस्त भागाची पाहणी

### ▶▶ पूरबाधित शेतकऱ्यांशी थेट संवाद... ▶▶ नुकसानीचा अहवाल केंद्र सरकारकडे जाणार...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ नोव्हेंबर -**
सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टी आणि पुरामुळे धाराशिव जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर शेती, जनावरं आणि मालमत्तेचे नुकसान झाले. या नुकसानीचा आढावा घेण्यासाठी केंद्र सरकारच्या पथकाने आज (५ नोव्हेंबर) जिल्ह्याचा दौरा करून पूरग्रस्त भागाची पाहणी केली आणि शेतकऱ्यांशी थेट संवाद साधला.

या केंद्रीय पथकाचे नेतृत्व ऊर्जा मंत्रालयाचे उपसंचालक करण सरीन यांनी केले. पथकात वित्त मंत्रालयाचे उपसचिव कंदर्प पटेल, ग्रामीण विकास मंत्रालयाचे उपसचिव अभिषेक कुमार राज, आणि जलशक्ती मंत्रालयाचे संचालक सतेंद्र प्रताप सिंग यांचा समावेश होता. पथकाने परंडा तालुक्यातील खासगाव व वागेगव्हाण या गावांना भेट दिली.

खासगाव येथे पुरामुळे नुकसान झालेल्या शेतकरी दत्तात्रय सातपुते आणि प्रदीप शहा यांच्या शेतजमिनीची पाहणी करण्यात आली. उल्फा नदीच्या पूरामुळे शेतीचे नुकसान झाल्याची माहिती ग्रामस्थांनी पथकाला दिली. तसेच पथकाने नदीपात्र आणि पुलाची प्रत्यक्ष पाहणी केली.

यानंतर पथकाने वागेगव्हाण गावात जाऊन नुकसान झालेल्या शेती व घरांचे निरीक्षण केले. तसेच सीना नदीकाठावरील ग्रामस्थांकडून पुरपरिस्थितीची माहिती घेतली. या भेटीदरम्यान जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष, अपर जिल्हाधिकारी ज्योती पाटील, भूम उपविभागीय अधिकारी रेवैयाह डोंगरे, कृषी विभागाचे प्रभारी जिल्हा अधीक्षक महादेव आसलकर, वीज वितरण कंपनीचे अधीक्षक अभियंता आडे, तहसीलदार मनिष काकडे आणि गटविकास अधिकारी मोहन राऊत उपस्थित होते.

भेटीनंतर परंडा येथील शासकीय विश्रामगृहात जिल्हाधिकारी पुजार यांनी पथकास जिल्ह्यातील अतिवृष्टी, पूरपरिस्थिती व केलेल्या उपाययोजनांची सविस्तर माहिती दिली. केंद्रीय पथक जिल्ह्याच्या नुकसानीचा संपूर्ण अहवाल तयार करून केंद्र सरकारकडे सादर करणार असल्याचे सांगण्यात आले.

## बेकरी मशिनरीच्या नावाखाली साडेबारा लाखांची फसवणूक

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ नोव्हेंबर -**
येथील एका महिलेला बेकरी मशिनरी पुरविण्याचे आमिष दाखवून तब्बल १२ लाख ५० हजार रूपयांची फसवणूक झाल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी आनंदनगर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी बिजली मेहतो (रा. सोलापूर) याने फिर्यादी भाग्यश्री विठ्ठल लांडगे (वय २६, रा. पाडोळी, ता. धाराशिव) यांचा विश्वास संपादन करून त्यांना बेकरी मशिन पुरवण्याचे आश्वासन दिले. आरोपीने यासाठी २३ मे रोजी दुपारी ३ ते ५ या वेळेत फिर्यादीकडून आरटीजीएस आणि फोनपे द्वारे एकूण १२ लाख ५० हजार रूपये इतकी रक्कम घेतली. मात्र, पैसे घेतल्यानंतरही त्याने कोणतीही मशिनरी न देता गायब झाला.

या फसवणुकीबाबत फिर्यादी भाग्यश्री लांडगे यांनी ४ नोव्हेंबर रोजी आनंदनगर पोलिसांकडे तक्रार दाखल केली. पोलिसांनी आरोपी बिजली मेहतो याच्याविरुद्धगुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू केला आहे.

## परंड्यात निर्दयपणे जनावरांची कत्तल

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.५ नोव्हेंबर -**
परंडा शहरातील सिकलकर गल्ली परिसरात गोवंशीय जनावरांची निर्दयपणे कत्तल केल्याचा प्रकार उघडकीस आला असून पोलिसांनी तिघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अपशान रशीद कुरेशी (वय २०), मोहम्मद युनुस मोहम्मद इब्राहिम बागवान (वय ३६, दोघे रा. इंदापूर, जि. पुणे, ह.मु. परंडा) आणि फाजील सौदागर (रा. परंडा) यांनी ४ नोव्हेंबर रोजी सायंकाळी सुमारे ५ वाजता परंडा-कुर्डुवाडी रस्त्यालगत सिकलकर गल्ली येथे गोवंशीय जनावरांची निर्दयपणे कत्तल केली.

> **१५६५ किलो मांस जप्त**

यावेळी पोलिसांना घटनास्थळी १५६५ किलो गोमांस, दोन लोखंडी चाकू असे एकूण ३ लाख १३ हजार रुपयांचे साहित्य मिळून आले. या कारवाईनंतर पोलिसांनी संबंधित तिघांविरुद्ध महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम अंतर्गत गुन्हा नोंदवला आहे.

परंडा पोलीस ठाण्याच्या पथकाने ही कारवाई केली असून पुढील तपास सुरू आहे.

## होळकर चौकातील सभा ठरणार व्यापाऱ्यांची डोकेदुखी!

### निवडणुकीच्या सभांमुळे पुन्हा ठप्प व्यापार... कळंबच्या व्यापाऱ्यांमध्ये नाराजी... दिवाळीनंतर गती घेतलेला व्यापार पुन्हा मंदावणार?



**सोलापूर तरुण भारत विशेष...**

**तभा वृत्तसेवा / परवेज मुल्ला**
**कळंब, दि.५ नोव्हेंबर -**
उसनवारी, कुणी रान विकून, तर कुणी बँक किंवा सावकाराकडून कर्ज घेऊन कळंब शहरात मोठ्या थाटामाटात दुकाने सुरू केली. मात्र ग्रामीण भागातून येणाऱ्या ग्राहकांना पार्किंगची सोय नसल्याने वाहनांची गोंधळलेली वर्दळ आणि पावसाळ्यातील मंदीमुळे व्यापाऱ्यांचे हाल झाले. महिनोनमहिने दुकानाचे भाडेही निघत नव्हते. आता दिवाळीनंतर कुठे व्यापार पूर्ववत सुरू झाला होता, तेवढ्यातच निवडणूक लागल्याने व्यापाऱ्यांसमोर पुन्हा अडचणी निर्माण झाल्या आहेत.

कळंब नगरपालिकेच्या निवडणुकीत नगराध्यक्षासह २० नगरसेवक निवडण्यासाठी मतदान होणार आहे. शहरातील होळकर चौक ही गजबजलेली बाजारपेठ म्हणून प्रसिद्ध असून, कोणताही कार्यक्रम असो वा उत्सव - येथेच मोठमोठी मंडपे टाकून सभा घेतल्या जातात. त्यामुळे व्यापार ठप्प होतो आणि नुकसान होते.

गेल्या काही महिन्यांपासून सततच्या पावसामुळे व्यापाऱ्यांचे आधीच मोठे नुकसान झाले आहे.

> **▶▶ नगरपालिका निवडणूक कार्यक्रम**
> उमेदवारी अर्ज दाखल सुरवात दि.१० नोव्हेंबर २०२५ ते १७ नोव्हेंबर २०२५, उमेदवारी अर्ज माघार घेण्याचा शेवट दि.२१ नोव्हेंबर, उमेदवारांना चिन्ह वाटप दि.२६ नोव्हेंबर, नगर परिषद निवडणूक दि.२ डिसेंबर, निवडणूक निकाल दि.३ डिसेंबर २०२५.

आता निवडणुकीच्या प्रचारसभांमुळे सकाळ-दुपार-संध्याकाळ दुकाने बंद ठेवण्याची वेळ येईल, अशी व्यापाऱ्यांची भीती आहे.

व्यापाऱ्यांची मागणी आहे की, प्रशासनाने सभा घेण्यासाठी मोकळ्या, सुटसुटीत जागांचा पर्याय उपलब्ध करून द्यावा, जेणेकरून बाजारपेठेतील व्यापारावर परिणाम होणार नाही. या समस्येकडे प्रशासन लक्ष देणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## आ. प्रविण स्वामींचा उपक्रम : उमरगा नगर परिषदेचा 'माझा वार्ड, माझी जबाबदारी' उपक्रम राज्यासाठी आदर्श

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.५ नोव्हेंबर -**
उमरगा नगर परिषदेने राबविलेला माझा वार्ड, माझी जबाबदारी हा अभिनव उपक्रम शहराच्या सर्वांगीण विकासासाठी वरदान ठरला आहे. आमदार प्रविण स्वामी यांच्या संकल्पनेतून साकारलेली ही योजना नागरिकांच्या सक्रिय सहभागातून उमरगा शहराला स्वच्छता, सुव्यवस्था आणि पारदर्शक प्रशासनाच्या दिशेने नेणारा आदर्श मॉडेल ठरत आहे.





या उपक्रमात शहरवासीयांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित प्रश्नांना प्राधान्य देत प्रभावी उपाययोजना केल्या जात आहेत. गटारींची नियमित स्वच्छता, रस्त्यांवरील साफसफाई, सार्वजनिक पथदिव्यांची तातडीने दुरुस्ती, मोकाट जनावरांवर बंदोबस्त, वाहतूक नियंत्रण, आठवडी बाजाराचे नियोजन आणि पाणीपुरवठा योजनेतील त्रुटींवर तातडीने कार्यवाही, अशा अनेक बाबींमुळे शहराचे रूप पालटले आहे.

या योजनेचे सर्वात मोठे यश म्हणजे नागरिकांसाठी तयार करण्यात आलेला विशेष व्हॉट्सअ‍ॅप ग्रुप. नागरिकांना आता कार्यालयीन चकरा मारण्याची गरज उरलेली नाही.

परिसरातील समस्या जसे की, रस्त्यावरचा कचरा, गटार तुंबणे, पाणी साचणे इत्यादींचे फोटो नागरिक थेट या ग्रुपवर पाठवतात, आणि दुसऱ्याच दिवशी संबंधित विभाग कार्यवाही करतो.

अलीकडेच झालेल्या अतिवृष्टीत पाणी घरात घुसल्याच्या अनेक तक्रारी या ग्रुपवर आल्या होत्या. नगर परिषदेच्या स्वच्छता कर्मचाऱ्यांनी तत्परतेने प्रतिसाद देत नागरिकांना मोठा दिलासा देत या उपक्रमाच्या कार्यक्षमतेचे उत्तम उदाहरण ठरले.

या उपक्रमामुळे उमरगा शहरातील नागरिकांचा नगर परिषदेवरील विश्वास अधिक दृढ झाला आहे.

नगर परिषद कर्मचारी, पोलीस प्रशासन, महावितरण, आरोग्य विभाग, महामार्ग प्राधिकरण, पत्रकार, डॉक्टर आणि नागरिक यांच्यातील संवाद अधिक प्रभावी झाला आहे. पूर्वी आठवड्याभर लागणारी कामे आता एक-दोन दिवसांत पूर्ण होत आहेत, हे या योजनेचे यश मानले जात आहे.

उमरगा नगर परिषदेचे नेतृत्व, नागरिकांचा सहभाग आणि प्रशासनाची तत्परता या त्रिसूत्रीमुळे हा उपक्रम केवळ उमरगा पुरता मर्यादित न राहता जिल्हाभर आदर्श ठरत आहे.

या लोकसहभागाच्या पॅटर्नमुळे संपूर्ण लोकसभा मतदारसंघात स्वच्छता आणि सुशासनाच्या दिशेने नवा अध्याय सुरू होणार आहे.

> **जिल्हाभर विस्तार होणार...**
> माझा वार्ड, माझी जबाबदारी या उपक्रमाच्या यशाची दखल खासदार ओमराजे निंबाळकर यांनी स्वतः घेतली आहे. जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या बैठकीत त्यांनी जिल्ह्यातील सर्व नगर परिषदा आणि नगरपंचायतींनी हा उपक्रम तातडीने राबवावा, अशा सूचना दिल्या आहेत.

> **समस्यांवर तोडगा; आमदारांचे सचिव ॲक्शन मोडमध्ये!**
> उमरगा शहरातील विविध नागरी समस्यांवर तातडीने तोडगा निघावा, यासाठी आमदारांचे सचिव शिवकांत पतगे यांनी स्वतः पुढाकार घेतला आहे. या ग्रुपवरील तक्रारींवर ते थेट संबंधित अधिकाऱ्यांना जाब विचारत आहेत. मुख्याधिकारी तसेच विभागप्रमुखांना ही समस्या आजच मिटली पाहिजे अशा सूचना देत ते तातडीने कारवाईचे आदेश देत आहेत. परिणामी, अधिकाऱ्यांवर कामाचा दबाव निर्माण होत असून समस्यांचे निराकरण वेगाने होत आहे. शहरवासीयांच्या समस्या तत्काळ सोडविणारा हा ग्रुप आता शहराचा आधार ठरत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

# केंद्रीय पथकाचा बीड जिल्हा दौरा अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची पाहणी

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.५ नोव्हेंबर**

अतिवृष्टी आणि पूरस्थितीमुळे बीड जिल्ह्यात झालेल्या मोठ्या नुकसानीची पाहणी केंद्रीय पथकाने आज (५ नोव्हेंबर) केली. पथकात एसव्हीएसपी शर्मा, विशाल पांडे यांचा समावेश होता.

पथकाने विविध गावांमधील नुकसानीची पाहणी करत शेतकऱ्यांशी संवाद साधला आणि नुकसानीचा अंदाज घेतला. पथकाच्या दौऱ्यात नोंदवलेल्या नुकसानीच्या प्रकारानुसार, अनेक ठिकाणी शेतीचे आणि मालमत्तेचे मोठे नुकसान झाले आहे.

दौऱ्याची सुरुवात बीड तालुक्यातील लिंबा रुई येथून झाली, जिथे शेती, पीक आणि जमीन खरडून जाणे, तसेच विहिरी गाळाने भरणे अशा स्वरूपाचे नुकसान आढळले. शिरूर कासार तालुक्यातील येवलवाडी येथे पूल आणि रस्ता वाहून गेल्यामुळे दळणवळणाचे मोठे नुकसान झाले आहे. कारेगाव (ता. शिरूर), घाटपिंपरी, देवळाली (ता. आष्टी)येथे देखील जमीन खरडून जाणे आणि शेती पिकाचे मोठे नुकसान झाल्याची नोंद घेण्यात आली. घाटापिंप्री येथे जमीन खरडून जाण्याचे तर देवळाली येथे फळबाग नुकसानीचे प्रमाण मोठे असल्याचे पथकाच्या निदर्शनास आले.

पाहणी दौऱ्या दरम्यान उपविभागीय अधिकारी कविता जाधव, वसीमा शेख,



तहसीलदार चंद्रकांत शेळके, वैशाली पाटील, सुरेश घोळवे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुभाष साळवे आदींसह सर्व विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

पथकाने आज बीड, आष्टी आणि शिरूर कासार तालुक्यांतील अतिवृष्टीग्रस्त भागांना भेट देत गावांमध्ये शेतजमिनीवरील गाळ, रस्त्यांवरील भगदाडे, नाले-ओढ्यांचे तुटलेले बांध, तसेच घरांची पडझड, विद्युत पुरवठा नुकसान आदी प्रकार पाहिले. पथकातील अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांशी संवादही साधला.

राज्यातील खरीप हंगाम २०२५ मध्ये अतिवृष्टी, पूरस्थिती आणि नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या नुकसानीचे मूल्यमापन करण्यासाठी हे पथक जिल्ह्यात आले होते. जिल्ह्यात झालेल्या नुकसानीमध्ये शेतजमीन वाहून जाणे, धरणांचे पाणी ओसंडून वाहणे, दगावलेली जनावरे, घर व रस्ते यांचे नुकसान या सर्व बाबींची माहिती सकाळी शासकीय विश्रामगृह येथे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन , निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी , जिल्हा अधीक्षक सुभाष साळवे यांनी केंद्रीय पथकास सविस्तर दिली .

जिल्ह्यात मोठ्याप्रमाणात नुकसान

जिल्ह्यातील ८ लाख ६ हजार शेतकऱ्यांचे सुमारे ७ लाख १३ हजार हेक्टर क्षेत्र पावसाने बाधित झाले असून, आतापर्यंत ५ लाखांहून अधिक शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळाली आहे तर ४४५ कोटी रुपयांपेक्षा अधिक रक्कम वितरित करण्यात आली आहे . अतिवृष्टीमुळे जिल्ह्यात १ ,००० पेक्षा अधिक जनावरांचे प्राण गेले, १,३१३ घरांचे संपूर्ण किंवा अंशतः नुकसान झाले आणि ७,४७२ सार्वजनिक मालमत्तांचे नुकसान झाल्याचे जिल्हा अहवालात नमूद आहे .सार्वजनिक मालमत्तांना देखील मोठी झळ बसली आहे. बांधकाम विभागाचे रस्ते आणि पुलांचे, महावितरणचे खांब व वीजवाहिन्यांचे तर महामार्ग, शिक्षण, आरोग्य, पाणीपुरवठा, अंगणवाडी व ग्रामपातळीवरील पायाभूत सुविधा या सर्वांचे मोठ्याप्रमाणात नुकसान झाले आहे.

# आज बालाजी भगवान शेष वाहन शोभायात्रा



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.५ नोव्हेंबर**

बालाजी मंदिर संस्थान बीड येथे सुरू असलेल्या ब्रम्होत्सवाच्या निमित्ताने आज (गुरुवार, दि. ०६ नोव्हेंबर २०२५) रोजी बालाजी भगवानांचे शेष वाहन शोभायात्रा मोठ्या उत्साहात निघणार आहे.

ही शोभायात्रा सायंकाळी ७:३० वाजता निघणार असून, रात्री ९:०० वाजता आरती होईल. आरतीनंतर सर्व भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

या धार्मिक सोहळ्याचा सर्व भक्तांनी लाभ घ्यावा, असे बालाजी मंदिर संस्थान बीड व ब्रम्होत्सव समिती यांनी केले आहे.

# खा.सोनवणेंनी लक्ष घातले अन् सोयाबीन खरेदीबाबत निघाले आदेश

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.५ नोव्हेंबर**

यावर्षी बीड जिल्ह्यात अतिवृष्टी झाली. यामुळे शेतातील पिके मातीत मिसळली. यातूनही सोयाबीनसारखी पिके काही प्रमाणात हाती लागली आहेत, परंतु शासनाने अद्याप खरेदी केंद्रे सुरू केलेली नाहीत. यामुळे शेतकरी अडचणी सापडलेला असून शेतकऱ्यांचे तातडीने कापूस केंद्र सुरू करावेत, असे काळजीचे पत्र खा.बजरंग सोनवणे यांनी पणन मंत्री जयकुमार रावल यांना दि.२८ ऑक्टोबर रोजी दिले होते. यानंतर सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाने सोयाबीन, मुग, उडीद पिकांची हमीभावाने खरेदी करण्याबाबत प्रक्रिया सुरू करण्याचे आदेश काढले आहेत.

बीड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात सोयाबीनचे क्षेत्र आहे. सदरील सोयाबीनची काढणी, मळणी झालेली असून आता शेतकऱ्यांना हमीभावाप्रमाणे दर मिळाला पाहिजे, यासाठी सोयाबीन खरेदी केंद्र सुरू असणे आवश्यक आहे. ही बाब लक्षात घेवून खा.बजरंग सोनवणे यांनी दि.२८ ऑक्टोबर रोजी पणन मंत्री जयकुमार रावल यांना पत्र दिले होते. या पत्रात म्हटले होते, बीड जिल्ह्यातील बहूतांश शेतकरी वर्ग हा सोयाबीन उत्पादक आहे. सदर हंगामात पावसाचे प्रमाण अनियमित असूनही शेतकऱ्यांनी मोठ्या कष्ठाने सोयाबीन पीक घेतले असून सद्या बाजारभावात घसरण सुरू आहे. यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाचे योग्य दराने (टरढ) विक्री करण्यासाठी शासनाने खरेदी केंद्रे सुरू करावीत, असे म्हटले होते. खा.बजरंग सोनवणे हे राज्यभरात शेतकरीपुत्र म्हणून ओळखले जातात. ते कायम शेतकऱ्यांच्या विषयावर पोटतिडकीने संसदेतही देखील प्रश्न मांडतात. जिल्ह्यातील शेतकरी जेव्हा जेव्हा अडचणीत असतात, तेव्हा ते सर्वात अगोदर त्याठिकाणी धावून जात असतात, असा जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा अनुभव आहे. जिल्ह्यात मागील महिन्यात अतिवृष्टी झाली. यामुळे शेतीचे आणि पिकांचेही अतोनात नुकसान झालेले आहे. यातूनही जे सोयाबीन हाती लागले आहे, त्याला योग्य दर मिळावा, यासाठी खरेदी केंद्र सुरू करण्याची मागणी केली होती. यानंतर सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाने हंगाम २०२५-२६ मध्ये सोयाबीन, मुग, उडिद पिकांची हमीभावाने खरेदी प्रक्रिया राबविण्याकरीता शासनाने मंजूरी दिली आहे. त्यानूसार हमीभाव योजनेंतर्गत दि.३० ऑक्टोबर २०२५ पासून दि.३१ डिसेंबर २०२५पर्यंत शेतकऱ्यांची ऑनलाईन नोंदणी व दि.१५ नोव्हेंबरपासून केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनेनूसार पुढील ९० दिवसांसाठी खरेदी करण्याचे करण्याचे आदेश दिले आहेत.

# ब्रह्माकुमारीज बीड यांच्या द्वारे 'स्वास्थ्य, समृद्धि आणि खुशीचे रहस्य' विशेष कार्यक्रम

**समाजसेवेत कार्यरत ९० महानुभावांचा सन्मान**

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.५ नोव्हेंबर**



प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय, आंतरराष्ट्रीय आध्यात्मिक संस्था असून आजतागायत समाजात आध्यात्मिक जागृती, नैतिक मूल्यांचा प्रसार आणि तणावमुक्त जीवनासाठी कार्यरत आहे. ही संस्था २१ प्रभागांद्वारे (ऊशरिीिं-ाशपीं) कार्यरत आहे, ज्यामध्ये समाज सेवा प्रभाग हा एक भाग आहे. ब्रह्माकुमारीज बीड सेवाकेंद्र यांच्या वतीने स्वास्थ्य, समृद्धि आणि खुशीचे रहस्य या विषयावर भव्य आध्यात्मिक व सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात समाजसेवेत योगदान देणाऱ्या ९० महानुभावांचा सन्मान करण्यात येणार आहे.कार्यक्रमाचे मुख्य वक्ते राजयोगी बी.के. प्रो. ई. व्ही. गिरीश (मुंबई) असून ते स्वास्थ्य, समृद्धी आणि आनंद यामधील आध्यात्मिक संबंध स्पष्ट करतील. हा कार्यक्रम बुधवार, ५ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी १०.३० ते दुपारी १.३० वाजेपर्यंत, सम्राट लॉन्स, उत्तम नगर, कॉलनी रोड, बीड येथे भव्य स्वरूपात पार पडणार आहे होणार आहे.या सोहळ्यास अनेक मान्यवरांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. त्यात मा. श्री. अंबादासजी दानवे (विरोधी पक्ष नेते, विधान परिषद), मा. श्री. बजरंग बप्पा सोनवणे (खासदार, बीड), मा. श्री. संदीप क्षीरसागर (आमदार, बीड), मा. श्री. विवेक जॉन्सन (जिल्हाधिकारी, बीड), मा. श्री. नवनीत कावत (पोलीस अधीक्षक, बीड), मा. श्री. जयदत्त अण्णा क्षीरसागर (माजी मंत्री, महाराष्ट्र राज्य) आणि डॉ. ईशा अग्रवाल (मिस इंडिया, अभिनेत्री, मुंबई) यांचा समावेश आहे.या कार्यक्रमाचे आयोजन संस्थेच्या समाज सेवा प्रभागाच्या माध्यमातून करण्यात आले असून, या उपक्रमाचा उद्देश समाजसेवकांना प्रोत्साहन देणे आणि सर्वांसाठी अंतरिक शांती, आरोग्य व आनंदाचा संदेश पोहोचवणे हा आहे.



**सराफा**

| | | |
|---|---|---|
| **सोने** (स्टॅण्डर्ड/१० ग्रॅम) | रु. १,२१,३०० | |
| **चांदी** (प्रतिकिलो) | रु. १,५१,२०० | |




सोलापूर ३३.२ २३.० ाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय एकता दिवसानिमित्त परळी भारतीय जनता पक्षाच्या वतीने आयोजित 'एकता दौड' (रन फॉर युनिटी) उत्साहात संपन्न झाली.

# श्री संत मन्मथस्वामी भक्त कपिलधारहून परळीच्या प्रभू वैद्यनाथाकडे





## वीरशैव लिंगायत समाज व श्री मन्मथस्वामी सेवा संघ यांच्या वतीने हजारो भाविकांना खिचडी प्रसाद वाटप

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.५ नोव्हेंबर**

श्री क्षेत्र कपिलधार येथील श्री संत शिरोमणी मन्मथस्वामींच्या संजीवन समाधीचे दर्शन घेवून आपआपल्या गावी परतणार्या वीरशैव लिंगायत बांधवांची पाऊले बुधवार दिनांक पाच नोव्हेंबर रोजी परळीतील बारा ज्योतिर्लिंगापैकी एक असलेले श्री क्षेत्र वैद्यनाथ प्रभूंच्या दर्शनासाठी वळत असून परळीत यावे श्रीं चे दर्शन घ्यावे असे समिकरणच आता रूढ झाले आहे. एकीकडे भाविकांची गर्दी वाढत असतांना त्यांना आपल्याला घडेल त्या श्रद्धेतून त्यांच्यासाठी खिचडी, चहा, पाणी व अन्य अन्न पदार्थाचा महाप्रसादही परळीतील वीरशैव लिंगायत समाजाच्या श्री मन्मथ स्वामी सेवा संघाचे सर्व पदाधिकारी, व सदस्य गेल्या १८ वर्षापासून करीत आहेत. श्री व सौ भाग्यवंत आप्पा यांच्या हस्ते श्रींचे पूजन करण्यात आले.

श्री संत श्री संत मन्मथ स्वामी सेवा संघाचे शिवराजआप्पा बोटूळे रघुनाथ आप्पा भाग्यवंत व उज्वला भाग्यवंत यांच्या हस्ते पूजा करण्यात आली.शिवराज आप्पा बोटुळे, रामकिशन आप्पा साखरे, सोमनाथ आप्पा ओपळे, प्रकाश धोकटे, बालाजी सेलुकर, रघुनाथ आप्पा भाग्यवंत, संदीप हालगे, महादेव मोडीवाले, शिवाजी बुद्रे व सहकाऱ्यांच्या पुढाकाराने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. श्रीक्षेत्र कपिलधारहुन दर्शन घेऊन परत येणार्या भाविकांसाठी बुधवार दिनांक ५ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजल्यापासून येथील श्री संत गुरुलिंग स्वामी मठ संस्थान बेलवाडीमध्ये येथे वीरशैव लिंगायत समाजाच्या श्री मन्मथ स्वामी सेवा संघाच्या वतीने खिचडी प्रसादाचा कार्यक्रम दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी ठेवण्यात आला. श्री मन्मथ स्वामींच्या यात्रेत सहभागी झालेल्या भाविकांची पाऊले आता आपआपल्या घराकडे वळत असतांना श्री क्षेत्र परळी येथे वैद्यनाथ प्रभूंच्या दर्शनाकडेही वळाली आहेत.

आज दिवसभर भाविक मोठ्या संख्येने परळीत दाखल झाले आहेत. मागील १८ वर्षापासून ही परंपरा परळीमध्ये वीरशैव समाज व श्री मन्मथ स्वामी सेवा संघ हे जपत आहेत. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून वीरशैव महासभेचे बीड जिल्हा अध्यक्ष दत्ताप्पा इटके गुरुजी, ॲड. मनोजआप्पा संकाये, पत्रकार श्री संजय खाकरे, संतोष जुजगर, संपादक बालाजी ढगे आदी उपस्थित होते.

## बेलवाडी परिसराला आले जत्रेचे स्वरूप

श्रीक्षेत्र कपिलधार येथील श्री संत मन्मथ स्वामी यांच्या पवित्र समाधी स्थळाचे दर्शन घेऊन आंध्रप्रदेश कर्नाटक, तामिळनाडू व महाराष्ट्रातील विविध भागातून आलेले हजारो भाविक भक्तांनी आज बुधवारी परळी येथील बारा ज्योतिर्लिंगापैकी एक असलेले प्रभुवैद्यनाथाचे दर्शन घेतले. परळीत आलेल्या भाविकांची महाप्रसादाची व्यवस्था वीरशैव लिंगायत समाज, श्री मन्मथ स्वामी सेवा संघ यांच्या वतीने करण्यात आली होती. महाप्रसादाचा लाभ घेण्यासाठी हजारो भावीक भक्तांनी गर्दी केल्याचे दिसून आले. दरम्यान बेलवाडी परिसरात बेल, फुल, नारळ आदी प्रसादालयाची दुकाने मोठ्या संख्येने घातली गेली होती त्यामुळे वैजनाथ मंदिर परिसराला जणू काही जत्रेचे स्वरूप आल्याचे दिसून आले.

# जिल्हास्तरीय तंबाखू नियंत्रण कार्यशाळा बीड येथे संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.५ नोव्हेंबर**

राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमांतर्गत जिल्हा व तालुका स्तरावरील महत्त्वाच्या अधिकाऱ्यांसाठी 'District Block Level Key Officials Orientation on NTCP COTP--2003' या विषयावर एक महत्त्वपूर्ण कार्यशाळा बीड येथे आयोजित करण्यात आली होती.



जिल्हा तंबाखू नियंत्रण कक्ष, जिल्हा रुग्णालय बीड आणि मराठवाडा ग्रामीण विकास संस्था (MGVS) छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने ही कार्यशाळा जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन सभागृहात पार पडली.

मार्गदर्शक अधिकाऱ्यांची उपस्थिती

या कार्यशाळेला मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हास्तरीय तंबाखू नियंत्रण समन्वय समिती श्री. विवेक जॉन्सन सर, मा. जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय राऊत सर, मा. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. उल्लास गंडाळ सर, तसेच मा. निवासी वैद्यकीय अधिकारी (बा. सं.) डॉ. एल. आर. तांदळे सर यांचे मार्गदर्शन लाभले.

मार्गदर्शन आणि विषय

कार्यक्रमात श्री. अप्पासाहेब उगले, संचालक, MGVS यांनी अधिकाऱ्यांशी संवाद साधला. त्यांनी जिल्हा व तालुका स्तरावरील समन्वय समितीची रचना, सदस्यांच्या जबाबदाऱ्या, तंबाखू नियंत्रण कायदा COTP--2003 आणि WHO-FCTC -rticle ५.३ यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर सखोल माहिती देत मार्गदर्शन केले.

अधिकारी आणि मान्यवर उपस्थित

या कार्यशाळेला सर्व वैद्यकीय अधीक्षक, सर्व तालुका आरोग्य अधिकारी, तसेच पोलीस उपअधीक्षक श्री उमाशंकर कस्तुरे सर, डॉ. सतेंद डबडगावकर, डॉ. अभिजित भालेकर, डॉ. अशोक मते, डॉ. निकिता गायकवाड, श्री. नागनाथ भडकुंबे, श्री. सुरेश दामोधर, श्री. श्रीकांत उजागिरे आदी मान्यवर अधिकारी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. अशोक मते यांनी केले, तर समन्वय व आयोजनाची जबाबदारी जिल्हा तंबाखू नियंत्रण कक्षाने यशस्वीरित्या पार पाडली. या कार्यशाळेमुळे तंबाखू नियंत्रणाच्या अंमलबजावणीला जिल्हा व तालुका स्तरावर अधिक बळकटी मिळणार आहे.

# पदवीधर मतदार नोंदणी करण्याकरिता कालावधी वाढवून देण्यात यावा

## महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद व अखिल भारतीय शैक्षिक महासंघ ची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.५ नोव्हेंबर**

छत्रपती संभाजीनगर पदवीधर मतदार संघ निवडणूक-२०२६ करिता मतदार नोंदणी दिनांक ३०-०९-२०२५ ते ०६-११-२०२५ हा कालावधी दिलेला आहे, परंतु मराठवाडा विभागात एकूण आठ जिल्हे व ७६ तालुके असून हा मतदार संघ फार मोटा आहे, पदवीधर मतदार हा शहरी भागासह ग्रामीण भाग व वाडी-तांड्यासह दुर्गम भागात विभागला गेलेला आहे. या नोंदणी दरम्यान मराठवाडा विभागात होत असलेल्या अतिवृष्टी मुळे बहुतेक पदवीधरांना नोंदणी करता आली नाही.

तसेच दिपावली सणाच्या दिर्घकालीन सुट्ट्या मुळे बहुतेक मतदार कुटुंबासह बाहेरगावी प्रवासात असल्याने नोंदणी करु शकले नाहीत, त्यामुळे नोंदणी करण्याकरिता अतिशय अल्प कालावधी मिळाला व नोंदणी अतिशय कमी झाल्याचे समजते, करिता आपणास विनंती करण्यात येते की, पदवीधर मतदार नोंदणी करण्याकरिता अजून कालावधी वाढवून देण्यात यावा, ही विनंती अशा प्रकारचे जिल्हाधिकारी बीड यांना महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद बीड वतीने निवेदन देण्यात आले व वरील मागणी भगवान चाटे जिल्हा



अध्यक्ष महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद, बीड पदाधिकारी प्रा. बाळासाहेब साळवे विभागीय अध्यक्ष महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद, मराठवाडा विभाग नंदकिशोर झरीकर शशिकांत पसारकर , प्रा डॉ गणेश आडगांवकर प्रा डॉ लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर ज्योती महाजन, प्रा डॉ रुपाली कुलकर्णी श्री. गणेश वाघ, राजाराम जमजाळ, कमलाकर झोडगे अविनाश भवर दशरथ गीते, राकेश मोरे ,नवनाथ खेडकर विष्णु मिसाळ श्री. बापुराव घुले पदाधिकारी सभासद यांनी केली आहे

# सरकारच्या दगाबाजीचं सत्य महाराष्ट्रासमोर आणणार : उद्धव ठाकरे

**▶▶ शिवसेना पक्षप्रमुखांचा धाराशिव जिल्ह्यातील अतिवृष्टीग्रस्त भागांचा दौरा; शेतकऱ्यांशी थेट बांधावर जाऊन संवाद... ▶▶ शेतकऱ्यांना दिला धीर...**





**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ नोव्हेंबर -**

धाराशिव जिल्ह्यातील अतिवृष्टीग्रस्त भागांच्या दौऱ्यावर आलेले शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी परांडा आणि भूम तालुक्यातील विविध गावांना भेट देत नुकसानग्रस्त शेतकऱ्यांशी थेट संवाद साधला.

परांडा तालुक्यातील शिरसाव येथे ग्रामस्थांशी बोलताना उद्धव ठाकरे यांनी राज्य सरकारवर तीव्र शब्दात टीका केली. ते म्हणाले, बळीराजा आज आक्रोश करतोय, कारण सरकारनं त्याच्या भावनांशी खेळ केला आहे. या दगाबाजीचं सत्य महाराष्ट्रासमोर आणण्यासाठीच आम्ही आलो आहोत.

यानंतर ठाकरे यांनी भूम तालुक्यातील पाथरुड आणि उळूप गावांना भेट दिली. पाथरुड येथे त्यांनी शेतकऱ्यांच्या समस्या ऐकून घेतल्या आणि त्यांना धीर देत म्हणाले, विश्वासघातकी महायुती सरकार आणि त्यांच्या पोकळ आश्वासनांमुळे बळीराजा खचला आहे. पण आम्ही नुकसानभरपाई आणि कर्जमुक्ती मिळवून घेणारच. उळूप गावात ठाकरे यांनी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पिकांची नुकसानीची पाहणी केली. ते म्हणाले, जितक्या वेदना या शेतकरी मायबापाला होताहेत, तितक्याच वेदना मुक्या जनावरांनादेखील होत आहेत. ही वेदना मिटवण्यासाठी शिवसेना एकजुटीने लढत राहील. या दौऱ्यादरम्यान शिवसेना नेते चंद्रकांत खैरे, विधानपरिषद विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, शिवसेना सचिव आ. मिलिंद नार्वेकर, खा. ओम राजे निंबाळकर, आ. कैलास पाटील, आ. प्रविण स्वामी यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

उद्धव ठाकरे यांच्या या दौऱ्यामुळे अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांमध्ये नवचैतन्य व आत्मविश्वास निर्माण झाला, असे चित्र जिल्ह्यात पाहायला मिळाले.

## राष्ट्रवादी काँग्रेसच्या (शरदचंद्र पवार गट) जिल्हाध्यक्षपदी प्रतापसिंह पाटील यांची नियुक्ती



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ नोव्हेंबर -**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्रजी पवार पक्ष) च्या धाराशिव जिल्हाध्यक्षपदी प्रतापसिंह पाटील यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या निवडीमुळे जिल्ह्यातील कार्यकर्त्यांमध्ये उत्साह आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, पाटील समर्थकांनी फटाक्यांची आतषबाजी करत आनंदोत्सव साजरा केला.

या संदर्भात प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी नियुक्तिपत्र जारी केले आहे. पाटील यांनी पक्षासाठी दिलेल्या निष्ठावान, सातत्यपूर्ण आणि प्रामाणिक कार्याची दखल घेत ही नियुक्ती करण्यात आली असल्याचे पत्रात नमूद आहे. या प्रसंगी महिला प्रदेशाध्यक्ष रोहिणीताई खडसे उपस्थित होत्या.

मागील काही काळापासून जिल्हा संघटनेत माजी जिल्हाध्यक्षांविरोधात नाराजीचे वातावरण होते. संघटनात्मक निर्णय घेताना पदाधिकाऱ्यांना विश्वासात न घेता एकतर्फी निर्णय घेतले जात आहेत, अशी तक्रार पक्षाकडे पोहोचली होती. या पार्श्वभूमीवर पक्षाने नव्या नेतृत्वावर विश्वास दाखवत पाटील यांच्या नियुक्तीस मान्यता दिली आहे. प्रतापसिंह पाटील हे धाराशिव जिल्ह्यातील एक समाजसेवी आणि कार्यकर्त्यांमध्ये स्थान असलेले व्यक्तिमत्व आहेत. त्यांनी गेल्या अनेक वर्षांपासून राष्ट्रवादीमध्ये सक्रिय भूमिका निभावली आहे. पक्षात फूट पडल्यावरही ते शरदचंद्र पवार यांच्या प्रति एकनिष्ठ राहिले असून, पक्ष बांधणी आणि कार्यकर्त्यांच्या समन्वयात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

## वॅगनर कारच्या धडकेत महिलेचा मृत्यू

**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.५ नोव्हेंबर -**

राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५२ वर झालेल्या दुर्दैवी अपघातात अनुसया रघुनाथ लोहार (रा. बाबा कलेक्शन दुकानासमोर, येरमाळा) या महिलेला आपला जीव गमवावा लागला.

ही घटना दि. ६ ऑक्टोबर २०२५ रोजी सायं. ८.३० वाजता ज्ञानोदयोग ज्युनिअर कॉलेजजवळ घडली. अनुसया लोहार रस्ता ओलांडत असताना मारुती सुझुकी वॅगनर कार (क्र. एमएच २५ एएस १००२) या वाहनाच्या चालकाने अति वेगाने व निष्काळजीपणे गाडी चालवत पाठीमागून जोरदार धडक दिली.

या अपघातात अनुसया लोहार या गंभीर जखमी होऊन घटनास्थळीच मृत्यू पावल्या. या प्रकरणी प्रकाश रघुनाथ कळसाईत (वय ३३, रा. बाबा कलेक्शन दुकानासमोर, येरमाळा) यांनी येरमाळा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

त्यानुसार पोलिसांनी गुन्हा नोंदवला आहे. पुढील तपास येरमाळा पोलिसांकडून सुरू आहे.

## तेर येथील वैद्यकीय शिक्षणासाठी पात्र विद्यार्थ्यांचा अर्चना पाटील यांच्या हस्ते गौरव

### प्रत्येकी एक लाख रुपयांचे बक्षीस जाहीर




**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ नोव्हेंबर -**

तेर गावातील वैद्यकीय शिक्षणासाठी (एमबीबीएस, बीएएमएस, बीडीएस) यावर्षी पात्र ठरलेल्या नऊ गुणवंत विद्यार्थ्यांचा जिल्हा परिषदेच्या माजी उपाध्यक्षा अर्चनाताई राणाजगजितसिंह पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या प्रसंगी सौ. पाटील यांनी प्रत्येक विद्यार्थ्याला एक लाख रुपयांचे बक्षीस जाहीर करत त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

या गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये वैष्णवी काकासाहेब देवकते, श्रुती गोरोबा सुतार, ओंकार राजेंद्र धुमाळ, वैष्णव दत्ता बनसोडे, प्रणाली बबन कोकरे, आकाश अभिमान कोकरे, मयूर जितेंद्र दीक्षित, आरती नानासाहेब बीटे आणि श्वेता अभिमान राऊत यांचा समावेश आहे.

अर्चनाताई पाटील यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करत सांगितले की, तेर गावातील विद्यार्थ्यांची ही कामगिरी गावाच्या अभिमानाची बाब आहे.

त्यांच्या पुढील शिक्षणात कोणतीही अडचण आली, तर मी नेहमी मदतीस तयार आहे. तसेच, पुढील काळातही तेर येथील जे विद्यार्थी वैद्यकीय शिक्षणासाठी पात्र ठरतील, त्यांना कै. चंद्रकलादेवी पाटील जयंती निमित्त प्रत्येकी एक लाख रुपयांचे बक्षीस देण्यात येईल, अशीही त्यांनी घोषणा केली.

या उपक्रमासाठी गोरोबा पाडुळे, बालाजी पांढरे, सचिन देवकते, इंद्रजीत कोळपे, अनिल टेळे, भुजंग खांडेकर, रमेश लकडे यांनी पुढाकार घेतला.

यावेळी उपस्थित मान्यवरांमध्ये दत्ता देवळकर, श्रीमंत फंड, नवनाथ नाईकवाडी, प्रा. सोमनाथ लांडगे, राम जवान, माधवी लकडे, बेद्रे, हनुमंत कोळपे, नवनाथ पसारे, सुधाकर फासे, अजित कदम, सुमेध वाघमारे, इर्शाद मुलाणी, राम कोळी, संजय लोमटे, काका माळी, बनसोडे, नानासाहेब बीटे, सोमनाथ फासे यांच्यासह आदींचा समावेश होता.

## एसबीएनएम फार्मसी महाविद्यालयाचा सिद्धेश कात्रे अखिल भारतीय आंतरविद्यापीठ योग स्पर्धेसाठी निवड



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ नोव्हेंबर -**

डॉ.व्ही.के. पाटील शैक्षणिक संकुल, छत्रपती संभाजीनगर रोड, धाराशिव येथील एसबीएनएम फार्मसी महाविद्यालयातील विद्यार्थी सिद्धेश महादेव कात्रे याची अखिल भारतीय आंतरविद्यापीठ योग स्पर्धा २०२५-२६ साठी निवड झाली आहे.

ही प्रतिष्ठित स्पर्धा वेल्स इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, चेन्नई (बंगळुरू केंद्र) येथे पार पडणार असून, या स्पर्धेसाठी सिद्धेशची निवड डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे मार्फत झाली आहे. निवड प्रक्रिया १७ ऑक्टोबर २०२५ रोजी श्री विले पार्ले केळवणी मंडळ तंत्रज्ञान संस्था, धुळे येथे झालेल्या आंतर-क्षेत्रीय निवड चाचणी मधून पार पडली.

या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. प्रतापसिंह पाटील व संस्थेचे मार्गदर्शक करण पाटील यांनी सिद्धेशचे अभिनंदन करत शुभेच्छा दिल्या.

तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरज ननवरे, इंजिनिअरिंग प्राचार्य अमरसिंह कवडे, कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील, आर. पी. फार्मसीचे प्राचार्य डॉ. शेख गाझी यांच्यासह प्रा. सतीश केदार, प्रा. शितल कुऱ्हाडे, प्रा. मंदार जोशी, प्रा. अजिंक्य किरदत आणि प्रा. निखिल शेरखाने यांनी सिद्धेशचा सन्मान करून कौतुक केले.

## अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांसाठी धाराशिव जिल्ह्याला १,०९८ कोटींचे अभूतपूर्व अनुदान

**▶▶ आणखी मदतीसाठी पाठपुरावा सुरु : आ. राणाजगजितसिंह पाटील**



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ नोव्हेंबर -**

अतिवृष्टी आणि महापुरामुळे मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेल्या धाराशिव जिल्ह्यातील शेतकरी बांधवांना दिलासा म्हणून आतापर्यंत तब्बल १,०९८ कोटी रुपयांचे अभूतपूर्व अनुदान मंजूर झाले आहे.

रब्बी हंगामासाठी जाहीर करण्यात आलेल्या अतिरिक्त मदतीचा शासन आदेश मंगळवारी निर्गमित झाला असून, त्यानुसार ५७७ कोटी रुपयांची नवीन मदत मंजूर झाली आहे, अशी माहिती आमदार राणा जगजितसिंह पाटील यांनी दिली.

आमदार पाटील म्हणाले की, ऑगस्टमधील नुकसानीसाठी १८९ कोटी, सप्टेंबर महिन्यातील नुकसानीसाठी २९२ कोटी आणि खरवडलेल्या जमिनीसाठी ४० कोटी अशा एकूण ५२१ कोटी रुपयांचे अनुदान पूर्वीच मंजूर झाले होते. त्यात आता ५७७ कोटींची भर पडली असून, जिल्ह्याला एकूण १,०९८ कोटी रुपयांचा दिलासा मिळाला आहे. यापुढेही नुकसानग्रस्त शेतकऱ्यांसाठी अधिक मदत मिळावी यासाठी प्रयत्न सुरू आहेत. त्यांनी सांगितले की, जून ते सप्टेंबरदरम्यान अतिवृष्टीमुळे सहा शासन निर्णयांद्वारे नुकसानभरपाईची घोषणा करण्यात आली आहे.

आतापर्यंत सुमारे २७५ कोटी रुपयांची मदत वितरित करण्यात आली असून, उर्वरित रक्कमही लवकरच शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होईल.

आमदार पाटील यांनी या अभूतपूर्व मदतीबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे जिल्हावासियांच्या वतीने आभार मानले आहेत.

मुख्यमंत्री फडणवीस साहेबांनी अत्यंत संवेदनशीलपणे शेतकऱ्यांच्या मदतीचा निर्णय घेतला आहे. जिल्ह्यातील शेतकरी बांधवांना खऱ्या अर्थाने दिलासा मिळाला आहे, असेही त्यांनी म्हटले.

### धाराशिव-तुळजापूर-सोलापूर रेल्वे प्रकल्पासाठी ३,२९५ कोटींची मान्यता

धाराशिव जिल्ह्याच्या विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या धाराशिव-तुळजापूर-सोलापूर रेल्वेमार्गासाठी ३,२९५ कोटी रुपयांच्या सुधारित कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. या प्रकल्पात राज्य सरकारने पन्नास टक्के हिस्सा उचलण्यास मंजुरी दिली आहे. आमदार पाटील म्हणाले की, ठाकरे सरकारने राज्याचा वाटा वेळेवर दिला असता तर हा प्रकल्प आज पूर्णत्वास आला असता. मात्र, निधीअभावी किंमत ९०४ कोटींवरून ३,२९५ कोटींवर गेली. आता महायुती सरकारने निर्णायक पाऊल उचलून हा रेल्वे मार्ग साकार करण्याचा मार्ग मोकळा केला आहे. आई तुळजाभवानीचे तीर्थक्षेत्र राष्ट्रीय रेल्वे नकाशावर आणण्यासाठी आणि जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी या प्रकल्पाचे महत्त्व अधोरेखित करत, मुख्यमंत्री फडणवीस यांचे आभार आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केले.

## हिरेमठात ६ ते १२ नोव्हेंबरदरम्यान श्री शिवलिंगेश्वर महास्वामीजींच्या पुण्यस्मरण सोहळ्याचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.५ नोव्हेंबर -**

नळदुर्ग येथील सुप्रसिद्ध सुक्षेत्र राजगुरू श्री शिवलिंगेश्वर हिरेमठाचे निर्विकल्प समाधीस्थ राजगुरू श्री. ष. ब्र. १०८ शिवलिंगेश्वर शिवाचार्य महास्वामीजी यांच्या पुण्यस्मरण सोहळ्याचे आयोजन दि.६ ते १२ नोव्हेंबर या कालावधीत करण्यात आले असून, या दरम्यान विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. भाविकांनी या कार्यक्रमांचा लाभ घ्यावा, असे आवाहन हिरेमठाचे मठाधीपती श्री.ष.ब्र. बसवराज शिवाचार्य महास्वामीजी यांनी केले आहे.

या कालावधीत दररोज सायंकाळी ५.३० ते ६.३० वाजेपर्यंत श्री व्याख्यान केसरी वे. प. सोमनाथ स्वामी धोत्री यांच्या रसाळ वाणीतून अध्यात्मिक प्रवचन होणार आहे. दि.११ नोव्हेंबर रोजी रात्री ९ वाजता जागरण व भजन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच दि.१२ नोव्हेंबर रोजी सकाळी ६ वा. महारुद्राभिषेक व दीक्षा अय्याचार हा धार्मिक विधी पार पडणार आहे. पुण्यस्मरणोत्सवाचा मुख्य सोहळा दि.१२ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वा. संपन्न होणार असून, या धर्मसभेस विविध मठांतील पूज्य महास्वामीजी उपस्थित राहणार आहेत. यामध्ये राजशेखर महास्वामीजी (विरक्त मठ, नंदगाव), जय शांतिलिंग महास्वामीजी (विरक्त मठ, हिरेनागाव), मल्लिकार्जुन महास्वामीजी (घटप्रभा), सुतरेश्वर शिवाचार्य महास्वामीजी (अचलेर), हुच्चेश्वर महास्वामीजी (हुच्चेश्वर संस्थान मठ, कमतगी), शंकर राजेंद्र महास्वामीजी (गच्चीन मठ, अमीनगड), मुरूघेंद्र महास्वामीजी (सोमशेखर मठ, मुनवळळी), शिवबसवराजेंद्र महास्वामीजी, शिवयोगी शिवाचार्य महास्वामीजी (अणदुर), गंगाधर महास्वामीजी (जेवळी), शिवानंद शिवाचार्य महास्वामीजी (जळकोट), जयमल्लिकार्जुन शिवाचार्य महास्वामीजी (मुरूम), अभिनव शिवलिंग महास्वामीजी (मादनहिप्परगा), विरंतेश्वर महास्वामीजी (केसरजवळगा), बसवलिंग महास्वामीजी (अक्कलकोट) तसेच हिरेमठाचे मठाधीपती बसवराज शिवाचार्य महास्वामीजी उपस्थित राहणार आहेत.

## धाराशिव जिल्ह्यातील विद्युत वाहिनींच्या दुरुस्ती करिता निधी मिळावा

**▶▶ भारतीय किसान संघ धाराशिवची ऊर्जामंत्र्यांकडे मागणी**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ नोव्हेंबर -**

जिल्ह्यामध्ये अतिवृष्टीमुळे महापूर आला होता. यामध्ये वीज वाहून नेहणाऱ्या वीज तारांसह रोहित्र नुकसान झाले होते. याकरिता त्याची दुरुस्ती करणे, रोहित्र मधील तेल भरणे, विद्युत पोलची नवीन उभारणीसाठी विशेष निधी द्यावा अशी मागणी ऊर्जा राज्यमंत्री मेघना बोर्डिकर यांची भारतीय किसान संघ जिल्हाध्यक्ष नितीन घुले यांनी भेट घेऊन केली.

अतिवृष्टीमुळे धाराशिव जिल्ह्यामध्ये महावितरणचे झालेले नुकसान, जळालेल्या शेतकऱ्यांच्या शेतातील रोहित्र, विद्युत वाहिनी दुरुस्ती कामे गती देणे, RDSS मध्ये नवीन कामांचा समावेश करावा इ. महावितरण कार्यालयातील विविध मागणीबाबत एक लेखी निवेदन दिले. मंत्री महोदयांनी तात्काळ कार्यकारी अभियंता यांना फोनवर संपर्क करून सर्व माहिती जाणून घेतली. व इतर विषयाबाबत कार्यकारी अभियंता महावितरण धाराशिव यांना सदरील निवेदनावर तात्काळ कारवाई करीता लेखी सूचना त्यांच्या स्वाक्षरीने देवून त्यांना सदरील निवेदन प्रत व्हॉट्सप केली.

## निकृष्ट महामार्गाच्या कामाबाबत जनतेचा संताप

### प्रकल्प संचालक व तहसीलदारांची पाहणी



**तभा वृत्तसेवा**
**अणदूर, दि.५ नोव्हेंबर -**

तुळजापूर तालुक्यातील अणदूर येथून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गाच्या अर्धवट आणि निकृष्ट दर्जाच्या कामामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली असून, याच पार्श्वभूमीवर एन.एच.आय. प्रकल्प अधिकारी स्वप्निल कासार आणि तहसीलदार अरविंद बोंळगे यांनी प्रत्यक्ष पाहणी केली.

पाहणीदरम्यान चिवरी पाटी परिसरातील नागरिकांच्या घरांमध्ये महामार्गाच्या कामामुळे झालेल्या नुकसानीची भरपाई देण्याचे आश्वासन अधिकाऱ्यांनी दिले. तसेच बसस्थानकासमोरील उड्डाणपुलाच्या निकृष्ट दर्जाच्या बांधकामाची देखील चौकशी करण्यात आली. स्थानिक नागरिकांनी पुलाचा एक कोपरा ढासळण्याच्या स्थितीत असल्याचे दाखवून दिले आणि गेल्या चौदा वर्षांपासून राष्ट्रीय महामार्गाचे काम सुरू असूनही अद्याप पूर्ण का झाले नाही? असा सवाल उपस्थित केला.

अधिकाऱ्यांनी मधुशाली नगर आणि शिक्षक कॉलनी परिसरातील गटारींची पाहणी करून सध्यस्थिती जाणून घेतली. तथापि, काम केव्हा पूर्ण होणार? हा प्रश्न मात्र अद्याप अनुत्तरितच राहिला आहे.

या पाहणीवेळी कार्यकारी अभियंता एस.जे. केत, भीमा बिराजदार, बसवराज चन्नशेट्टी, तसेच माजी सभापती दिपक आलुरे, माजी पंचायत समिती सदस्य साहेबराव घुगे, माजी सरपंच धनराज मुळे, भाजपा शहराध्यक्ष दीपक घोडके, सिद्धाराम धम्मुरे, बालाजी कुलकर्णी, करबसप्पा धम्मुरे, सोमनाथ शेटे, अनिल अणदूरकर, मकरंद भालकरे, रामेश्वर कबाडे आदींसह अनेक नागरिक उपस्थित होते.

महामार्गाच्या कामाची पाहणी झाली खरी, मात्र हे काम पूर्ण होणार केव्हा आणि कोणत्या दर्जात, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

लातूर
दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## शालेय विद्यार्थ्यांना सायकलींचे वाटप : आ. कराड यांच्या हस्ते उपक्रमाचा शुभारंभ

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.५, नोव्हेंबर -**
`णापूर तालुक्यातील मौजे यशवंतवाडी ग्रामपंचायतीच्या वतीने शिक्षणासाठी दूरवर जाणाऱ्या विद्यार्थ्यांची गैरसोय लक्षात घेऊन पंधराव्या वित्त आयोगांतर्गत दहा शालेय विद्यार्थ्यांना सायकलींचे वाटप करण्यात आले.



या सायकलींचे वितरण लातूर ग्राम ीणचे आमदार आ. रमेशआप्पा कराड यांच्या हस्ते भाजप संवाद कार्यालयात करण्यात आले. शालेय विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर यावेळी आनंद ओसंडून वाहत होता. या कार्यक्रमास सरपंच ओम चव्हाण, तसेच भाजप नेते महेंद्र गोडभरले, अभिषेक आकनगिरे, दशरथ सरवदे, वसंत करमुडे आदींसह पालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शालेय विद्यार्थ्यांसाठी सायकल वाटपाचा हा अभिनव उपक्रम हाती घेतल्याबद्दल ग्रामपंचायतीचे सर्वत्र कौतुक होत आहे.



# अनेक वर्षांच्या प्रतीक्षेनंतर किल्लारीचा गोडवा कायम

## १० नोव्हेंबरला केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते निळकंठेश्वर कारखान्याच्या गळीत हंगामाचा शुभारंभ

**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.५, नोव्हेंबर -**
मराठवाड्यातील पहिला आणि लातूर धाराशिव जिल्ह्यातील सर्वाधिक सभासद असलेला व १५ वर्षापासून बंद पडलेला, बँकेचा बोजा उतरविण्यासाठी विक्री किंवा भाडेतत्वाच्या उंबरठ्यालर अडकलेला तालुक्यातील किल्लारी येथील श्री निळकंठेश्वर शेतकरी सहकारी साखर कारखाना नव्या रूपात, नव्या ऊर्जेसह आणि दुप्पट क्षमतेने गळीत हंगामासाठी सज्ज झाला असून केंद्रीयमंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते सोमवार दि. १० रोजी सकाळी ११.३० वा. या वर्षीच्या गळित हंत हंगामाचा शुभारंभ करण्यात येणार आहे.



सहकार व साखर उद्योग क्षेत्रातील नाम ांकित उद्योजक ज्येष्ठ मार्गदर्शक बी.बी. ठोंबरे अध्यक्षस्थानी राहणार आहेत. राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले महाराज, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर, खासदार डॉ शिवाजीराव काळगे, आमदार विक्रम काळे, आमदार सतीश चव्हाण, म ाजीमंत्री तथा आमदार संभाजीराव पाटील निलंगेकर, माजीमंत्री तथा आमदार संजय बनसोडे, माजीमंत्री तथा आमदार अमित विलासराव देशमुख, आमदार प्रवीण स्वामी, आमदार रमेश कराड, डॉ. संजय कोलते (घा.प्र.से.) तसेच दिपक तावरे (भा.प्र.से.) यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

या सोहळ्यास कारखान्याचे सर्व सन्माननीय सभासद, विगर सभासद, ऊस उत्पादक शेतकरी, व्यापारी, ऊस तोडणी व वाहतूक कंत्राटदार, हितचिंतक आणि शेतकरी बंधू यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आमदार अभिमन्यू पवार यांनी केले आहे.किल्लारी कारखान्याने गेल्या काही वर्षांत अक्षरशः नवजीवन प्राप्त केले आहे. श्री निळकंठेश्वराच्या आशिर्वादाने आणि दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वाच्या मार्गदर्शनाखाली कारखाना अत्याधुनिक मशिनरीने सुसज्ज झाला असून पूर्वीपेक्षा दुप्पट उत्पादन क्षमतेने गाळपासाठी सज्ज आहे. एकेकाळी बंद होण्याच्या उंबरठ्यावर असलेल्या या कारखान्याने आज पुन्हा नव्या उत्साहाने उभारी घेतली आहे.

या पुनरुज्जीवनाच्या प्रवासामुळे लातूर आणि धाराशिव जिल्ह्यातील शेतकऱ्यांमध्ये नवचैतन्य निम ाण झाले आहे. गळीत हंगाम ाच्या प्रारंभी शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असून, हजारो सभासद, ऊस उत्पादक शेतकरी, अधिकारी, कामगार आणि नागरिक या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत.श्री निळकंठेश्वर शेतकरी सहकारी साखर कारखाना, किल्लारीचे सर्व सभासद आणि कार्यक्षेत्रातील ऊस उत्पादक शेतकरी बांधवांना या ऐतिहासिक सोहळ्यास उपस्थित राहण्याचे सस्नेह आमंत्रण देण्यात आले आहे. बऱ्याच वर्षांच्या संघर्षानंतर आज किल्लारी पुन्हा नव्या उत्साहाने गोडवा गाळायला सज्ज झाला आहे हे केवळ कारखान्याचे पुनरुज्जीवन नाही, तर शेतकऱ्यांच्या आशा-आकांक्षांचे नवजीवन आहे. असे मत आ. अभिमन्यू पवार यांनी यावेळी व्यक्त केले.

## संक्षिप्त वृत्त...



### प्रा. डॉ. नितीन देशमुख यांना राष्ट्रीय आदर्श अध्यापक पुरस्काराने गौरव

**अहमदपूर, दि.५ नोव्हेंबर -**
महात्मा ज्योतिराव फुले शिक्षक/प्राध्यापक परिषदेच्या वतीने दि.२८ रोजी रत्नागिरी येथे आयोजित 'शिक्षण व्यवस्थेतील समस्या व उपाय' या विषयावरील शिक्षण परिषदेच्या निमित्ताने महात्मा गांधी महाविद्यालयाच्या भूगोल विभाग प्रमुख प्रा. डॉ. नितीन देशमुख यांच्या शैक्षणिक कार्याची दखल घेण्यात आली. या कार्याबद्दल त्यांना राष्ट्रीय आदर्श अध्यापक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार त्यांना रत्नागिरी येथील वि.दा. सावरकर नाट्य सभागृहात झालेल्या सोहळ्यात सैनिक कल्याण फेडरेशनचे अध्यक्ष व माजी खासदार ब्रिगेडीयर सुधीर सावंत यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.



### एकुर्का रोड समर्थ विद्यालयाच्या मुली राज्य बॅडमिंटन स्पर्धेत प्रथम

**उदगीर, दि.५ नोव्हेंबर -**
एकुर्का रोड येथील समर्थ माध्यमिक व उच्च म ाध्यमिक विद्यालयाच्या १९ वर्षाखालील मुलींच्या संघाने राज्यस्तरीय शालेय बॅडमिंटन स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवत लातूर विभागाला राज्यात मानाचा मुकुट मिळवून दिला. अहिल्यानगर येथे झालेल्या अंतिम सामन्यात समर्थ विद्यालयाने बलाढ्य मुंबई संघाचा पराभव केला. संघाच्या कर्णधार मृणाल पोतदार हिने उत्कृष्ट खेळ केला तर नुपूर मलवाड, राजनंदनी लोहिया, समीक्षा मटके व प्रगती इंगळे यांनीही चमकदार कामगिरी बजावली. या यशाबद्दल खेळाडू, क्रीडा शिक्षक किरण हाळीघोंगडे व प्रशिक्षक नितीन पोतदार यांचे विविध मान्यवरांनी अभिनंदन केले.



### राज्यसेवा परीक्षा उत्तीर्ण साक्षी चाकूरकरचा चाकूर अर्बन बँकेत सत्कार

**चाकूर, दि.५ नोव्हेंबर -**
महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (MPSC) २०२४ च्या परीक्षेत यश मिळवून चाकूर तालुक्याचे नाव उज्ज्वल करणाऱ्या साक्षी सुरेंद्र चाकूरकर हिचा चाकूर अर्बन बँकेच्या वतीने सत्कार करण्यात आला. वयाच्या केवळ २४ व्या वर्षी साक्षीने मेहनत, जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर हे यश संपादन केले आहे. या प्रसंगी बँकेचे चेअरमन युनूस मासुलदार, उमाकांत फुलारी, रज्जाक मासुलदार, रमेश जनवाडे आदी मान्यवर उपस्थित होते. साक्षीने आपल्या यशाचे श्रेय पालक, शिक्षक आणि चाकूरकरांच्या आशीर्वादाला दिले. बँकेच्या वतीने तिचा शाल, हार आणि पेढे भरवून सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाला साक्षीचे वडील सुरेंद्र चाकूरकर, तसेच बँकेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



### केंद्रीय विद्यालयाच्या गुणवंत विद्यार्थिनी मुग्धा चेरेकरचा सन्मान

**अहमदपूर, दि.५ नोव्हेंबर -**
चाकूर केंद्रीय विद्यालयाची विद्यार्थिनी मुग्धा म धुसूदन चेरेकर हिची इयत्ता दहावीच्या परीक्षेत केंद्रीय विद्यालयांच्या गुणवत्ता यादीत निवड झाल्याबद्दल अखिल भारतीय केंद्रीय विद्यालय संघटनेच्या वतीने सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमात मुग्धाला ५,००० रुपयांचा धनादेश आणि विशेष प्रशंसा प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. यावेळी तिने केंद्रीय विद्यालयाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली आणि विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी मार्गदर्शनही केले. कार्यक्रमास केंद्रीय विद्यालय चाकूरचे प्राचार्य हरेश कटारिया, मुख्याध्यापक गोविंद आचार्य, सतीश फुलारी, संतोष नराळे, मोहित कुमार, तसेच डॉ. मेजर मधुसूदन चेरेकर व अन्य मान्यवर उपस्थित होते.

### मुक्तांगण इंग्लिश स्कूलमध्ये गुरु नानक जयंती साजरी

**लातूर, दि.५ नोव्हेंबर -**
लातूर येथील श्री साई मंदिरासमोरील, विशाल नगर परिसरातील मातोश्री कलावती प्रतिष्ठान संचालित मुक्तांगण इंग्लिश स्कूल मध्ये गुरु नानक जयंती साजरी करण्यात आली.याप्रसंगी शाळेच्या प्राचार्या सुमेरा शेख, यांच्या हस्ते गुरु नानक यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. शाळेच्या शिक्षिका माधुरी वाघमारे यांनी गुरु नानक यांच्या जीवनाविषयी विद्यार्थ्यांना माहिती दिली.



## स्पर्धा परीक्षांची तयारी करून कमी वयात अधिकारी व्हा : गणेश हाके



संत ज्ञानेश्वर विद्यालयात गुणवंतांचा सत्कार सोहळा उत्साहात...

**तभा वृत्तसेवा**
**अहमदपूर, दि.५, नोव्हेंबर -**
शालेय शिक्षण घेत असतानाच ग्राम ीण आणि शहरी भागातील विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबरच स्पर्धा परीक्षांची तयारी केली पाहिजे, म्हणजे कमी वयात क्लास वन अधिकारी होण्याचा मार्ग खुला होतो, असे प्रतिपादन भाजपाचे प्रदेश प्रवक्ते गणेश हाके यांनी केले.

ते संत ज्ञानेश्वर विद्यालयात विविध क्षेत्रात यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार सोहळ्यात अध्यक्षस्थानी बोलत होते. या प्रसंगी व्यासपीठावर प्राचार्या रेखाताई तरडे हाके, प्राचार्य शोभाताई टोम्पे, संचालक सुरेंद्र चाकूरकर, सेवानिवृत्त मुख्याध्यापिका एस.बी. कुलकर्णी, मुख्याध्यापक आशा रोडगे व मीना तोवर आदी मान्यवर उपस्थित होते.

शाळेच्या माजी विद्यार्थिनी साक्षी सुजाता सुरेंद्र चाकूरकर हिची राजपत्रित अधिकारी (क्लास वन) पदावर निवड झाल्याबद्दल आणि डॉ. अपर्णा शोभा पांडुरंग टोम्पे यांना हार्वर्ड युनिव्हर्सिटीम धून रेडिओलॉजीमध्ये फेलोशिप मि ळाल्याबद्दल दोघींचा शाळेच्या वतीने शाल, पुष्पहार, मानाचा फेटा आणि ग्रंथ देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

या वेळी सुरेंद्र चाकूरकर, प्राचार्या शोभा टोम्पे, आणि संस्थेच्या सचिव रेखाताई तरडे यांनी मनोगत व्यक्त केले. तसेच साक्षी चाकूरकर आणि डॉ. अपर्णा टोम्पे यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणा देणारे मार्गदर्शनपर भाषण केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक आशा रोडगे-तत्तापुरे यांनी केले, सूत्रसंचालन शारदा तिरुके यांनी तर आभार प्रदर्शन मीना तोवर यांनी केले. या कार्यक्रमाला सुजाता चाकूरकर, डॉ. अश्विनी टोम्पे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारीवर्गाने विशेष परिश्रम घेतले.

## झरी बु. येथे राष्ट्रवादी काँग्रेसचा भव्य सुसंवाद मेळावा

### दयानंद सुरवसे यांना जिल्हा परिषदेच्या तिकिटाचा ग्रीन सिग्नल...

**तभा वृत्तसेवा**
**चाकूर, दि.५, नोव्हेंबर -**
चाकूर तालुक्यातील झरी बु. येथे माजी जिल्हा परिषद सदस्य दयानंद सुरवसे यांच्या वतीने दि. ५ नोव्हेंबर रोजी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या कार्यकर्त्यांचा भव्य असा सुसंवाद मेळावा उत्साहात पार पडला. या मेळाव्याचे अध्यक्षस्थान सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील यांनी भूषविले.



अध्यक्षीय समारोपाच्या वेळी बोलताना मंत्री बाबासाहेब पाटील म्हणाले की, जनतेच्या संपर्कात राहून सातत्याने पक्षाचे कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांना आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये प्राधान्य दिले जाईल. पक्षाने दिलेल्या उमेदवारांना कार्यकर्त्यांनी जोम ाने साथ देऊन प्रचंड बहुमताने विजयी करावे.

यावेळी त्यांनी माजी जि.प. सदस्य दयानंद सुरवसे यांना जिल्हा परिषदेच्या तिकिटाचा ग्रीन सिग्नल दिल्याची घोषणा करताच उपस्थित कार्यकर्त्यांत उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. या मेळाव्यास नगराध्यक्ष करीमसाहेब गुळवे, पद्माकरराव पाटील, अनिल वाडकर, संदीप शेटे, बळीराम पाटील, यशवंतराव जाधव, गणपत कवठे, यादव कर्डिले, भानुदास पोटे, रंजीत पाटील, व्यंकटराव जांभळदरे, विवेक शिंदे, अण्णाराव सोमवंशी, महादू पुणे, बाळासाहेब जाधव, माऊली जाधव, धनंजय धुमाळ, संजय भोसले, कासिम पटेल, युवराज सूर्यवंशी, नारायण राजुरे, विठ्ठल उदगीरे, बाळासाहेब पाटील झरीकर, सचिन तोरे, कांतराव चव्हाण, शेषराव मुंजाणे, नितीन पाटील, तुकाराम पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी नाम देवराव सुरवसे, तुकाराम सुरवसे, दशरथ बंडे, उमाकांत डोंगरे, महबूब पठाण, चांद पठाण, रघुनाथ गुंडरे, आजम सय्यद, तुकाराम कांबळे, भास्कर वाघमारे, विलास वाघमारे, सूर्यकांत शिंदे, दिलीप जाधव, बबन गव्हाणे, प्रशांत सुरवसे, धोंडीराम मुधाळे, गिरजाप्पा इडोरे, खंडू म्हेत्रे, इनुस शेख, शंकर मुधाळे, सैलानी सय्यद, इनुस पठाण आदींसह दयानंदभाऊ मित्र मंडळाचे कार्यकर्ते यांच्यासह आदिंनी परिश्रम घेतले.

## लातूर ग्रामीण मतदारसंघातील १४ गावांना १ कोटी रुपयांचा विकासनिधी

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.५, नोव्हेंबर -**
वसंतराव नाईक तांडा वस्ती सुधार योजनेअंतर्गत भाजपाचे नेते आ. रमेश कराड यांच्या प्रयत्नांना यश मिळाले असून, लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील १४ गावांसाठी तब्बल १ कोटी रुपयांचा निधी राज्य शासनाकडून मंजूर करण्यात आला आहे.

हा निधी ४ नोव्हेंबर रोजीच्या शासन निर्णयानुसार इतर मागास बहुजन कल्याण विभाग मार्फत मंजूर झाला असून, या योजनेत लातूर तालुक्यातील ८, रेणापूर तालुक्यातील ४ आणि भादा सर्कलम धील २ गावांचा समावेश आहे. या अंतर्गत विविध ठिकाणी रस्ते, पेव्हर ब्लॉक बसविणे, सभामंडप बांधकाम अशी कामे होणार आहेत.

त्यात भाडगाव, भातांगळी, बोरगाव बु., मुशिराबाद, वांजरखेडा, कानडी बोरगाव, दर्जी बोरगाव, गरसुळी, भोकरंबा, तळणी, फावडेवाडी, सत्तरधरवाडी आणि भेटा धनगरवस्ती आदी गावांचा समावेश आहे.

या निर्णयामुळे संबंधित वाडी-वस्त्यांतील नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण असून, भाजपचे पदाधिकारी, स्थानिक लोकप्रतिनिधी आणि कार्यकर्त्यांनी आ. कराड यांचे आभार व्यक्त केले आहेत.

## दर्जाहीन सोयाबीन बियाण्यांपासून शेतकऱ्यांची सुटका होणार



### आ. अभिमन्यू पवार यांच्या पुढाकाराने राज्यस्तरीय बैठक

**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.५, नोव्हेंबर -**
राज्यातील शेतकऱ्यांना दरवर्षी भेडसावणाऱ्या दर्जाहीन सोयाबीन बियाण्यांच्या समस्येवर उपाययोजना करण्यासाठी आमदार अभिमन्यू पवार यांनी इंडोसोया डेव्हलपमेंट असोसिएशनच्या शिष्टमंडळासह कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांची भेट घेतली.

या भेटीदरम्यान कृषी विभागाचे प्रधान सचिव विकास रस्तोगी यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या बैठकीत बियाण्यांच्या गुणवत्तेवर नियंत्रण आणण्यासाठी आणि शेतकऱ्यांना योग्य वेळेत दर्जेदार बियाणे उपलब्ध व्हावेत यासाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. राज्यात अनेक ठिकाणी दर्जाहीन सोयाबीन बियाण्यांमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत असल्याने यावर कायमस्वरूपी तोडगा काढण्याची गरज असल्याचे आमदार पवार यांनी बैठकीत स्पष्ट केले. त्यानंतर कृषिमंत्री भरणे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने धोरणात्मक सुधारणा करण्याचे निर्देश दिले. बैठकीत सोयाबीन बियाण्यांची तपासणी प्रणाली अधिक काटेकोर आणि पारदर्शक करण्यावर भर देण्यात आला. बियाणे प्रयोगशाळा पडताळणी व वितरण व्यवस्था सक्षम करण्यासोबतच बियाणे नियंत्रण यंत्रणेची पुनर्रचना करून तिचे बळकटीकरण करण्याचा निर्णय घेण्यात आला.

तसेच कृषी विद्यापीठांकडून होणाऱ्या ब्रिडर बियाण्यांच्या पुरवठा प्रणालीतील त्रुटी दूर करण्याचे ठरविण्यात आले असून, त्यामुळे शेतकऱ्यांना वेळेवर व दर्जेदार बियाणे मिळणार आहेत. याशिवाय बियाणे निरीक्षण व अंम लबजावणी समितीचे सक्षमीकरण करून तिला अधिक अधिकार व जबाबदाऱ्या देण्यात येणार आहेत.

कृषी विद्यापीठांकडील सोयाबीन बियाण्यांचा इंडोसोया संस्थेच्या सभासद शेतकऱ्यांसाठी राखीव कोटा ठेवण्याचेही ठरले असून, भविष्यात या कंपन्यांकडून प्रमाणित बियाणे उत्पादनासाठी याचा उपयोग केला जाणार आहे.

राज्य सरकारने शेतकऱ्यांच्या हितासाठी ठोस धोरण तयार करावे, अशी अपेक्षा आमदार अभिमन्यू पवार यांनी बैठकीत व्यक्त केली. कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिलेल्या सकारात्मक प्रतिसादाबद्दल आणि तातडीने अंमलबजावणीसाठी दाखवलेल्या तत्परतेबद्दल आमदार पवार यांनी त्यांचे आणि कृषी विभागातील अधिकाऱ्यांचे आभार मानले.

## राज्यातील ३१०५ शिक्षण सेवकांच्या वेतनश्रेणीचा प्रश्न मार्गी

### अभिमन्यू पवार यांच्याकडून दिवाळीची गोड भेट....

**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.५, नोव्हेंबर -**
राज्यातील विशेष शिक्षकांना शिक्षण सेवेत कायम केल्यानंतर जिल्हा परिषद अंतर्गत नियुक्ती देण्यात आली. मात्र या शिक्षकांना दोन स्तर कमी करुन प्राथमिक श्रेणीनुसार वेतन देण्याचे आदेश देण्यात आले. याबाबत राज्याचे शालेय शिक्षणचे प्रधान सचिव यांची आ. अभिमन्यू पवार यांनी भेट घेऊन विशेष शिक्षकांच्या वेतनश्रेणीचा प्रश्न मार्गी लावून दिवाळीची गोड भेट दिली आहे. याचा राज्यातील ३१०५ शिक्षकांना फायदा झाला असून विशेष शिक्षकांनी आ. पवार यांचा भव्य सत्कार केला आहे.



आ. अभिमन्यू पवार यांनी एक वर्षापुर्वी विशेष शिक्षकांचा विषय म ार्गी लावत राज्यातील ३१०५ विशेष शिक्षकांना शासन सेवेत कायम केले होते. त्यानंतर राज्यातील जिल्हा परिषद अंतर्गत प्रत्येक केंद्रावर विशेष शिक्षकांना नियुक्ती देण्यात आली. लातूर जिल्हा परिषदमध्ये ऑगस्ट महिन्यात नियुक्तीचे आदेश निर्गमित करण्यात आले होते. परंतु शासन निर्णयात नमूद असल्याप्रमाणे लातूर जिल्ह्यातील विशेष शिक्षकांना शिक्षक वेतनश्रेणी न लावता दोन स्तर कमी करून सरसकट प्राथमिकची वेतनश्रेणीनुसार आदेश देण्यात आले. ही बाब लक्षात आल्यानंतर सचिन वळके यांनी विशेष शिक्षकांच्या वतीने आ. अभिमन्यू पवार यांची भेट घेवून वेतनश्रेणी देताना फार मोठा अन्याय करण्यात आल्याचे निदर्शनास आणून दिले होते. तसेच लातूर जिल्हा परिषदने शासन निर्णयाला फाटा देऊन सामान्य शिक्षकांना देय असलेली वेतनश्रेणी लावल्याचेही यावेळी आमदार महोदयांना सांगितले होते.

लातूर जिल्हा परिषदेच्या या निर्णयाचा परिणाम असा झाला की राज्यातील सर्व जिल्हा परिषदांनी हाच पॅटर्न राबवत सर्वत्र चुकीच्या वेतनश्रेणीनुसार वेतननिश्चित करण्यात आले होते.

आ. अभिमन्यू पवार यांना विशेष शिक्षण सेवकावर वेतनश्रेणीत अन्याय झाल्याचे आ. अभिमन्यू पवार यांच्या लक्षात आल्यानंतर तुम्ही कसलिही काळजी करु नका. शासन निर्णयानुसार जी वेतन श्रेणी देय आहे तीच वेतनश्रेणी तुम्हाला लागू करण्यात येईल.

यासाठी तुमचा प्रतिनिधी म्हणुन मी स्वताः पाठपुरावा करीन. वेळप्रसंगी मुख्यमंत्री यांना भेटून तुम चा प्रश्न मार्गी लावू, असे आश्वासन आ. पवार यांनी दिले होते. त्यानंतर आ. पवार यांनी प्रधान सचिवांना पत्र पाठवून वेतनश्रेणीबाबतची मागणी केली होती. तसेच राज्याचे प्रधान सचिव शालेय शिक्षण यांची भेट घेऊन त्यांच्याकडे हा विषय मांडला. व शालेय शिक्षणचे प्रधान सचिव यांची भेट घेवून विशेष शिक्षकांच्या वेतनश्रेणीचा प्रश्न मार्गी लावला.

याचा राज्यातील तब्बल ३ हजार १०५ विशेष शिक्षकांना फायदा होणार आहे. आ. अभिमन्यू पवार यांच्याकडून विशेष शिक्षकांसाठी ही फार मोठी दिवाळीची भेट असल्याचे, मत लातूर जिल्ह्याचे विशेष शिक्षक संघटनेचे नेते सचिन वळके यांनी व्यक्त केले. तसेच लातूर जिल्ह्यातील नियुक्ती मिळालेल्या सर्व विशेष शिक्षकांचा पहिला पगार देखील आजच जमा झाल्यामुळे संघटनेच्या वतीने सचिन वळके यांनी औसा येथे आमदार अभिमन्यू पवार यांची भेट घेत आभार व्यक्त केले.